# नकुलालङ्कार

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ५९२

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य ५९२

नोंद नं. ७६२०



REFBK-0005908

माधव-जूलियन्

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
नं. काव्य
ता. २५।१२।३
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७८२०
ठाणे

रविकिरणमण्डळाचें ३१ वें पुस्तक

# नकुलालङ्कार

कविभूपण कविकल्पद्रुम दण्डी

म्हणजेच

रा. ब. प्रो. भय्यासाहेब नकुलराव दण्डे कुलकर्णी

यांचें यशस्वी जीवन

भविष्यपुराणावरून

## माधव जूलियन्

REFBK-0005908

मराठी ग्रंथ संग्रहालय

दा. क्र. ५९०८

पुणें, ता. २९ मे १९३९ खिस्ताब्द

मूल्य १ रुपया

प्रकाशक :—
**श्री. वि. दामले**
एन्. के. पब्लिशिंग हाउस,
बुधवार, पुणें २

सर्व अधिकार लेखकाचे स्वाधीन

मुद्रक :—
**गोपाळ बळवंत जोशी**
आनंद मुद्रणालय, १९६/४९ सदाशिव पेठ,
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्थळ प्रत
नं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

तीं० श्री० गङ्गाधर बाळकृष्ण गरुड,

बी. ए.

आणि

तीं० सौ० कमलाबाओ गरुड

यांस

## माधव-जूलियनकृत काव्यें

१ सुधारक

२ विरहतरङ्ग

३ द्राक्षकन्या

४ गज्जलाञ्जलि

५ स्वप्नरञ्जन

६ तुटलेले दुवे

७ नकुलालङ्कार

### पुढील काव्य

८ मधुलहरी

---

## डॉ. प्रा. माधवराव पटवर्धन यांचीं पुस्तकें

१ फार्सीमराठी कोश

२ अुमरखय्यामकृत रुबाया

३ छन्दोरचना

४ भाषाशुद्धिविवेक

५ पद्यप्रकाश

ठाणें.

# सम्पादणी

लटपटया मनुष्य समाजांत कसा लब्धप्रतिष्ठ होतो, आणि तो, आपल्या पायाखाली काय जळत आहे हें न पाहतां शिष्टपणाने दुसऱ्या दुबळ्या लोकांवर कशी आग पाखडूं शकतो हें पाहून कोणाला सन्ताप येणार नाही ? अशाच अेका सन्तापाच्या भरांत या काव्याला आरम्भ झाला; पण जो राग दहा अङ्क मोजीपर्यन्त टिकत नाही तो दहा आर्या रचीपर्यन्त तरी कसा टिकणार ? अति झालें नि हसूं आलें या न्यायाने त्या सन्तापाचें पर्यवसान अेक प्रकारें हसण्यांतच झालें.

हें दीर्घकाव्य परिहासात्मक नसेल, पण हें अुपहासात्मक तरी आहे; आणि अधिक्षेपात्मक तर हें नाहीच नाही. अेखाद्याने केलेला काही दोष पाहून चीड येते, त्याची खरडपट्टी काढावीशी वाटते, आणि तशी खरडपट्टी काढली की मनाला थोडें समाधान वाटतें हें सारें खरें. पण पुढे काय ? त्याच्यामध्ये अिष्ट ती सुधारणा घडून येते का ? बहुशः नाही. अुलट निकराच्या निषेधाने वा अधिक्षेपाने त्याचा स्वाभिमान अुलटतो आणि सुधारणेची आशा पार दुरावते.

अुपहासाचें शस्त्र अधिक प्रभावी आहे असें म्हणतात. मनुष्याला आपल्याला चार-चौघांत कोणी हसूं नये असें अवश्य वाटतें; चारचौघांत हसें झाल्यास त्याला मनस्वी विषादहि वाटतो. अेवढ्याचसाठी आपण चारचौघांसारखेच आहों हें दाखविण्याची त्याची धडपड असते. पण अेखाद्याचा अुपहास केल्याने तरी तो सुधारतो का ? कोणास ठाअूक ? दुबळ्या माणसांत दोष सुधारायला लागणारें सामर्थ्यच नसतें; तर समर्थ माणसें अुपहासाला मुळीच गाठत नाहीत. तेव्हा व्यक्तिविषयक अधिक्षेप वा अुपहास हा त्या व्यक्तीची सुधारणा करण्यासाठी असतो ही प्रौढी ढोङ्गीपणाचीच मानली पाहिजे.

## माधव - जूलियनकृत काव्यें

१ सुधारक

२ विरहतरङ्ग

३ द्राक्षकन्या

४ गज्जलाञ्जलि

५ स्वप्नरञ्जन

६ तुटलेले दुवे

७ नकुलालङ्कार

### पुढील काव्य

८ मधुलहरी

---

## डॉ. प्रा. माधवराव पटवर्धन यांचीं पुस्तकें

१ फार्सीमराठी कोश

२ उमरखय्यामकृत रुबाया

३ छन्दोरचना

४ भाषाशुद्धिविवेक

५ पद्यप्रकाश

ठाणें.

# सम्पादणी

लटपट्या मनुष्य समाजांत कसा लब्धप्रतिष्ठ होतो, आणि तो, आपल्या पायाखाली काय जळत आहे हें न पाहतां शिष्टपणाने दुसऱ्या दुबळ्या लोकांवर कशी आग पाखडूं शकतो हें पाहून कोणाला सन्ताप येणार नाही ? अशाच अेका सन्तापाच्या भरांत या काव्याला आरम्भ झाला; पण जो राग दहा अङ्क मोजीपर्यन्त टिकत नाही तो दहा आर्या रचीपर्यन्त तरी कसा टिकणार ? अति झालें नि हसूं आलें या न्यायाने त्या सन्तापाचें पर्यवसान अेक प्रकारें हसण्यांतच झालें.

हें दीर्घकाव्य परिहासात्मक नसेल, पण हें अुपहासात्मक तरी आहे; आणि अधिक्षेपात्मक तर हें नाहीच नाही. अेखाद्याने केलेला काही दोष पाहून चीड येते, त्याची खरडपट्टी काढावीशी वाटते, आणि तशी खरडपट्टी काढली की मनाला थोडें समाधान वाटतें हें सारें खरें. पण पुढे काय ? त्याच्यामध्ये अिष्ट ती सुधारणा घडून येते का ? बहुशः नाही. अुलट निकराच्या निषेधाने वा अधिक्षेपाने त्याचा स्वाभिमान अुलटतो आणि सुधारणेची आशा पार दुरावते.

अुपहासाचें शस्त्र अधिक प्रभावी आहे असें म्हणतात. मनुष्याला आपल्याला चार-चौघांत कोणी हसूं नये असें अवश्य वाटतें; चारचौघांत हसें झाल्यास त्याला मनस्वी विषादहि वाटतो. अेवढ्याचसाठी आपण चार-चौघांसारखेच आहों हें दाखविण्याची त्याची धडपड असते. पण अेखाद्याचा अुपहास केल्याने तरी तो सुधारतो का ? कोणास ठाअूक ? दुबळ्या माणसांत दोष सुधारायला लागणारें सामर्थ्यच नसतें; तर समर्थ माणसें अुपहासाला मुळीच गाठत नाहीत. तेव्हा व्यक्तिविषयक अधिक्षेप वा अुपहास हा त्या व्यक्तीची सुधारणा करण्यासाठी असतो ही प्रौढी ढोङ्गीपणाचीच मानली पाहिजे.

टीका वा टवाळी ही करणाऱ्याच्या प्रकृतीप्रमाणे आणि त्याच्याच समाधानासाठी असते. अेखाद्याचा काही दोष पाहून सन्ताप येतो, आणि कोणत्या ना कोणत्या तरी रीतीने तो व्यक्त केल्यावाचून, त्या मनुष्याला सन्ताप येअील असे काहीतरी केल्यावाचून, तो शमत नाही. आता अधिक्षेप वा अुपहास हा कोणत्या व्यक्तीचा आहे हें वाचकांना कळल्यावाचून त्या व्यक्तीला तितकीशी चीड येत नाही. म्हणून काव्याला विषयीभूत झालेली व्यक्ति ही अमूकच आहे अशी स्पष्ट ओळख वाचकांना अन्तर्यामीं पटेल अशा प्रकारें लेखन करावें लागतें. आता कोणत्याहि व्यक्तीच्या काही साऱ्याच गोष्टी सदोष नि सन्तापजनक नसतात; तथापि त्या व्यक्तीच्या अङ्गाचा भडका अुडावा हाच हेतु असला म्हणजे विपर्यासाचा, अन्यायाचा अवलम्ब करावा लागतो. अितकें करूनहि व्यक्तिविषयक अधिक्षेपाचें वा अुपहासाचें काव्य हें फारच थोड्या लोकांना रम्य नि गम्य वाटतें. कारण, अेकाद्या व्यक्तीचें मन दुखविण्यांत, घायाळ करण्यांत ज्यांना आनन्द वाटावा असे लोक केव्हाहि फारच थोडे असतात. तशांतून त्या व्यक्तीला अन्याय होत आहे असा संशय आला तर त्या व्यक्तीविषयी अुलट सहानुभूतिच वाटूं लागण्याचा सम्भव असतो. तेव्हा अुपहासात्मक वाङ्मयहि जर तात्कालिक महत्त्वाचें नसावें असें वाटत असेल तर तें व्यक्तिविषयक असतांच कामा नये; कारण, व्यक्ति काय, आज आहे अन् अुद्या नाही.

तेव्हा अुपहास हा अेखाद्या खरोखरीच्या व्यक्तीचा न करितां ती व्यक्ति ओळखली जाणार नाही अशा रीतीने तिच्यांतील दोषांचा, म्हणजे काल्पनिक व्यक्तीचाच करण्यांत आला तर तो अधिक हृदयङ्गम होतो. असें करण्याने लेखकाला कदाचित् सूडाचा आनन्द होणार नाही; पण लेखकाला ज्या वाचकांकडे अगदीच दुर्लक्ष करून भागत नाही, त्या वाचकांना निर्मळ अुपहासाचा आनन्द होअीलच होअील. अुपहासकाव्य हें अशा रीतीने तो दोष ज्या ज्या व्यक्तींत असेल त्या त्या व्यक्तीला तेवढ्यापुरतें

लागू पडतें; आणि आपल्या नाकाकडे न पाहतां लोकांना हासणारे सारेच असल्याने सर्वांनाच अुपहासकाव्यामुळे हसायला मिळतें. पुन्हा, अेखाद्याला, हा अुपहास आपलाच तर नाहीना अशी शङ्का येअून क्षणैक तो अस्वस्थ झाला तरी त्याला, साकल्याने पाहतां, 'छे! भास तो! काव्याची विषयीभूत व्यक्ति मी मुळीच नव्हे' अशी स्वतःची समजूत करून घ्यायला भरपूर आधार सापडतो.

शारीरिक व्यङ्गाकरिता अेखाद्याला हसण्यांत सहृदयता नाही परन्तु हसें हि आल्यावाचून रहात नाही. पात्रें काल्पनिक असलीं म्हणजे मात्र अहृदयतेचा दोष पदरीं न येतां हसतां येतें. डोळ्यापुढे अमुकच अेक अशी व्यक्ति अुभी न राहिल्याने मनाला धक्का बसत नाही; अुलट काल्पनिक पात्रें वास्तव भासायला या व्यङ्गवर्णनाचें चाङ्गलेंच साह्य होतें.

'नकुलालङ्कार' या काव्यांतील पात्रें अगदी काल्पनिक आहेत. जगांत खरोखरच घडलेल्या काही घटनांचे वा चालत्या बोलत्या काही खरोखरीच्या व्यक्तींचें हें छायाचित्र नाही. यांत अितिहास नाही, चरित्र नाही, काव्य आहे. ज्या अगणित लहानसहान गोष्टींच्या संयोजनेने हें संसाराचें नवीनच अेक चित्र रङ्गविण्यांत आलेलें आहे त्या मात्र विविध लहान महान् व्यक्तींच्या जीवनांत प्रत्यक्ष निदर्शनास आलेल्या आहेत हें अमान्य करितां येणार नाही. या काव्यांतील पात्रांसारख्या व्यक्ती जगांत असल्याच पाहिजेत असें तर वाटावें, पण शोधूं गेल्यास तशा त्या सापडूं नयेत अशीच वाङ्मयाची माया असते.

या काव्यांतील पात्रें काल्पनिक आहेत म्हणून वर साङ्गितलेंच; पण हीं वास्तव आहेत, सम्भवनीय आहेत, याच कालांतील नि सृष्टींतील आहेत. ती अत्युक्तिरञ्जित असतील; पण अद्भुत नाहीत, अवास्तव नाहीत. त्यांतून हें काव्य अुपहासात्मक आहे ही गोष्ट लक्षांत ठेविल्यास या काव्यावरून समाजाविषयी भलत्या कल्पनाहि मुळीच होणार नाहीत. समाजाच्या

अमुकच अेका भागाचें वा अङ्गाचें चित्र कां काढलें हा प्रश्न अप्रस्तुत आहे. ज्याविषयी थोडें फ़ार मौलिक ज्ञान होतें त्याविषयीच चित्र काढलें, केवळ कल्पनेला काही तरी भरकटूं दिलें नाही.

लोकांना काय रुचेल याचा, म्हणजे अतृप्त कुतूहलामुळे वा वासनेमुळे त्यांना कशाशी तादाम्य पावतां येअील याचा, विचार करून हें काव्य रचिलेलें नाही. निरीक्षणांत आलेल्या अगणित गोष्टींची संयोजना करितांना समाजघटनेचें अेखादें तत्त्व, अेखादें ध्येय डोळ्यापुढे ठेविलेलें नाही. प्रत्यक्ष समाजाश्रितकाच हा काव्यांतील समाज अपूर्ण नि सदोष आहे; आणि तो तसा आहे म्हणूनच सुधारणेला, निदान अुपहासाला काही वाव आहे. या कलियुगांत कलहावाचून प्रसङ्ग नाही आणि, 'स्थळा'वाचून प्रसङ्गाला घर नाही. स्पर्धा ही कनक नि कान्ता--पैका वा प्रेम याचीं स्थळें—यांविषयीच असते. या काव्यांत या कलहाचें पर्यवसान शोकांत न करितां आनन्दांत केलें आहे, हें मात्र नेहमी घडतेंच असें नाही.

अेखादा आवडता सिद्धान्त, अेखादा जागतिक सन्देश प्रतिपादण्यासाठी नि जगाला कशाचा तरी लाभ करून देण्यासाठी हें काव्य जन्मलेलें नाही. तुम्ही आम्ही जन्मल्यापासून जितका जगाला लाभ होण्याचा सम्भव तितकाच लाभ या काव्यापासून होण्याची आशा आहे; तथापि हट्टाने मन्थन करून काही नवनीत काढायचेंच झालें तर अेवढें निघू शकेल. संसार हा विचित्र आहे. नीट पहा म्हणजे चमत्कृति दिसेल आणि चमत्कृति दिसली की हसूं येअीलच येअीलच. तेव्हा डोळे मिटून पाणी गाळूं नका. डोळे अुघडे ठेवून चाला नि हसा. परिहासाने हसणें शक्य न झाल्यास अुपहासाने हसा पण हसा. धुमसण्यापेक्षा हसणें, विकटपणानेहि हसणें केव्हाहि श्रेयस्कर होय. जें अपरिहार्य आहे तें हसत हसत सहन करण्यानेहि शत्रूवर कडी होते. पुन्हा हसणाऱ्याची सङ्गत कोण चाहात नाही ? रडणाऱ्याची

लोक तोण्डदेखली कीव करितील पण तें त्याला हटकून टाळतील. जो अेकान्तप्रिय आहे त्याने वाटल्यास न हसण्याची शपथ घ्यावी. त्यातें धकेल.

पण या काव्यालाच कोणी हसला तर ? चिन्ता नाही. त्याने हसावें हीच माझी अिच्छा आहे. हें काव्य काही शोचनीय नाही की त्याच्या रडण्याची मी अपेक्षा करावी. जो हसेल त्याचे दातच दिसतील असें नव्हे तर त्याचा स्वभाव अुघडकीस येअील. कोणाला काय हास्यास्पद वाटतें यावरून त्याचा स्वभावहि जितका स्पष्टपणें कळतो तितका दुसऱ्या कशानेहि कळत नाही हें जर्मन कवि ग्युअेटे याचें म्हणणें अगदी खरें आहे.

काव्य आधी झालें नि नावाचा विचार मागाहून झाला. 'जिनालङ्कार' या पाली काव्याच्या नांवावरून हें नांव सुचलें. नकुलाचें चरित्र अलङ्कारिक भाषेने साङ्गण्याचा हेतु अेवढाच की त्यांत काही स्वाभाविक अुणीव असल्यास ती या शृङ्गाराने भरून निघावी, आणि मूळांत अङ्गचें सौन्दर्य असल्यास तें अधिक खुलून दिसावें. रावबहादुरांच्या अेकन्दर प्रौढ प्रतिष्ठित वागणीकडे पाहिलें कीं गम्भीर, प्रौढ, अलङ्कारमन्थर भाषाशैलीचा केलेला अुपयोग अुचितच वाटेल. आधुनिक मराठी कवितेला दागिन्यांचा सोस नसला तरी ती जन्मदरिद्री नाही. तिने मनावर घेतल्यास सणासुदीला ती नखशिखान्त सुवर्णमौक्तिकालङ्कार मिरवूं शकते हेंहि या पद्यप्रयत्नावरून सिद्ध होअील. मोरोपन्ताशीच काय, कोणत्याहि प्राचीन कवीशी या प्रकरणीं स्पर्धा करण्याची माझी इच्छा नाही. बळ ज्याचें त्यास तें!

पण हें काव्य मोरोपन्ताच्या कृतीअितकें चमत्कृतिप्रचुर नाही, तसें तें दुर्बोधहि नाही. याचा अर्थ हें काव्य अगदी बाळबोध आहे असा मात्र नव्हे. हें काव्य थोडें कठिणच आहे. पण ही दुर्बोधता अपरिहार्य आहे. मोरोपन्त तरी दुर्बोध कां ? मोरोपन्ताला का महीपतीच्या सोपेपणाने पौरा-

---

" Men show their character in nothing more clearly than by what they think laughable " Goethe.

णिक कथा साङ्गून तरून जातांच आलें नसतें ? त्याला तरून जर जायचेंच होतें, पण काव्य लिहून, व्युत्पन्न रसिकांकडून म्हणजे 'हरिपण्डितां'च्या समशीलांकडून, मान्यताहि मिळवावयाची होती. त्या काळीं मराठी राज्य स्थापन होअून शम्भरावर वर्षे झालीं होतीं; बहुतेक राज्यव्यवहार मराठींतून होत होता, तरी मराठीची सुसङ्घटना होअून जी सांस्कृतिक प्रतिष्ठा, जी पण्डित-मान्यता तिला मिळायला पाहिजे होती ती तिला मिळालेली नव्हती. पण्ढरींत मराठीचे पवाडे होत असले तरी विद्वद्वृन्दांत मान संस्कृतालाच होता. तेव्हा पौढ, परिणत, शुद्ध आणि डौलदार अशी भाषा लिहावयाची म्हणजे ती संस्कृतप्रचुर, संस्कृतसदृश अशी करून दाखविण्यावाचून दुसरा अुपाय नव्हता. स्वतः मोरोपन्तालाच वाटे की आपला ग्रन्थ मराठी असला तरी अितर मराठी काव्यांसारखा तो वाटू नये. तो म्हणतो:—

ग्रन्थ प्राकृत दिसतो, परि न प्राकृत विलोकितां नीट;
गोपांत गोप भासे कृष्ण परि न येचि पाहतां वीट.'

ग्रन्थ प्राकृत असला तरी तो प्राकृत वाटूं नये म्हणून मोरोपन्ताने संस्कृत शब्दांचा सढळ हाताने उपयोग केला; परन्तु संस्कृताचा विशेष अवलम्ब करायला त्याला आणखीहि अेक अपरिहार्य कारण होतें. लघुगुरूंच्या निर-निराळ्या साच्यांत चपखल बसतील असे अनेक पर्यायवाचक शब्द पाहिजेत तर संस्कृतावाचून दुसरीकडे कोठे हात पसरणार ? सङ्क्षेप हवा म्हणजे समास पाहिजे; आणि सामासिक रचना ही शुद्ध संस्कृत शब्दांचीच शोभून दिसणार; पुन्हा समासप्राचुर्याने ओजाचा बरावाअीट पण सुप्रसिद्ध गुण सहज साध्य होणार. पण यांहूनहि महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे चमत्कृति ! मोरोपन्तच म्हणतो :—

'प्राकृत म्हणूनि निर्भर हासोत अतज्ज्ञ नीच मत्कृतिला,
परि जाणशील बा तू रसिक कविवरा, मनीं चमत्कृतिला.'

चमत्कृतीने अलङ्कृत असें पद्य संस्कृताच्या आश्रयावाचून रचितां येणें तेव्हा

शक्यच नव्हतें; आणि सध्याच्या स्थितींत सुद्धा निर्भेळ मराठींत चमत्कृति विलासाला फारसा वाव नाही. तेव्हा मलाहि मोरोपन्ताप्रमाणे

'गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाहि देखितां थोडी,
यास्तव गुणज्ञ लोकीं याची घ्यावी हळू हळू गोडी.'

अशी विनन्ती केलीच पाहिजे.

परन्तु चमत्कृति म्हणजे काव्य नव्हे, चमत्कृति म्हणजे सरसता नव्हे हें मला प्राञ्जलपणें साङ्गून टाकिलें पाहिजे. काव्य हें बहुशः पद्यांत असतें; पण केवळ पद्य म्हणजे ज्याप्रमाणे काव्य नव्हे त्याचप्रमाणे, काव्यांत बहुशः थोडीफार चमत्कृति असते, नि ती आल्हादकारकहि असते तरी, चमत्कृति म्हणजे काही काव्यतत्त्व नव्हे. चमत्कृति म्हणजे वाङ्मयांतील मसाला होय. मसाला घातला म्हणून ज्याप्रमाणे गोट्यांचें वा ठोकळ्यांचें पक्वान्न होत नाही त्याचप्रमाणे केवळ चमत्कृतीने ललितवाङ्मय सिद्ध होऊं शकत नाही. अतिशय मसाल्याने सुद्धा पदार्थाची रुचि बिघडतेच. चमत्कृतिपरायणतेने काव्याच्या स्वाभाविक ओघाला फार अडथळा होतो. पुन्हा, चमत्कृतिजनक क्लृप्ति ही कष्टसाध्य असते हें मी अनुभवाने साङ्गतों. प्रयत्नाने, अभ्यासाने ज्याप्रमाणे यमकें सुचतात त्याचप्रमाणे या क्लृप्तीहि सुचतात. परन्तु चमत्कृतिविरहितहि जिवन्त सौन्दर्य निर्माण करणारी जी प्रतिभा ती मात्र कष्टसाध्य नाही, ती अङ्गीं मूळचीच असावी लागते.

ज्या ठिकठिकाणीं पाङ्गलेल्या, विविध खरोखरीच्या व्यक्तींच्या जीवनांतून पहायला मिळाल्यामुळेच मला लहानसहान अनेक गोष्टींची निवड नि योजना करितां आली त्यांचें मी मनःपूर्वक सप्रेम आभार मानतों. मी डोळस असलों तरी या गोष्टी जर दृष्टीस पडल्याच नसत्या तर मी तरी काय करूं शकलों असतों ? प्रत्येकाकडून व्यक्तिशः मी फारसें घेतलें नसलें तरी आभार न मानणें कृतघ्नपणाचें होअील; आणि जो अेकच दुर्गुण मी हसण्यावारी नेअूं शकत नाही तो म्हटला म्हणजे कृतघ्नपणा हा होय.

या काव्यांत ज्या अविद्यमान-विद्यमान अनेक लेखकांच्या अुक्तींचे पडसाद अुमटले आहेत त्यांचेहि मी आभार मानतों. अेखाद्याने जगाला दिलेलें ज्ञान जगाचें झालें असलें, आणि कोणींहि वापरावयाचें असलें तरी त्याच्या निर्मितीचें श्रेय हें ज्याचें त्याला न देणें, तें आपल्याच नावावर खपवणें हें, कदाचित कायदेशीर ठरलें तरीहि, अन्यायाचें आहे. म्हणूनच ' पिठोरी अमावास्या ' या चटकदार पण फारशा सुप्रसिद्ध नसलेल्या वाक्प्रयोगाचेंहि श्रेय मी ज्याचें त्याला म्हणजे काक-सुताला ( पृ. ८३ ) देअून टाकिलें आहे ! अित चोरीचें धनहि लोकांच्या ओळखीचें आहे, आणि धनीहि सर्वांच्या ओळखीचे आहेत. अशा स्थितींत हें दुसऱ्याचें धन माझें आहे असें कोणालाहि वाटण्याची भीति नाही. मग हें वाङ्मयचौर्य केलें तरी कशाला ? काही गोष्टी चोरून करण्यांत मनुष्याला आनन्द वाटतो म्हणूनच. घरांत ठेवलेल्या वस्तू मुलांना ' सापडतात ' आणि त्यांना फार फार आनन्द होतो. तशा या अुक्ती मला ' सापडलेल्या ' आहेत आणि म्हणूनच मी आनन्दाने त्यांचें प्रदर्शन केलें आहे. हें प्रदर्शन वाचकांनाहि आनन्दप्रद झालें तर मग काय, दुधांत साखर पडली म्हणावयाची. या चोरींत काही दोष नाही. चोरी या शब्दाकरितांच विरोध करावयाचा झाला तर अुद्या अङ्ग चोरण्याचीहि चोरी होअून बसेल.

' निवान्त, ' टिळकतलावाजवळ
पुणें ४.
ता. २९ मे १९३९

माधव जूलियन्

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ मङ्गलाचरण | १ |
| २ शकुनींची काकस्तुति | ३ |
| ३ विद्वद्भास्कर | ५ |
| ४ नकुलाचा कुमारकाल | ८ |
| ५ चरितार्थशोधन | १० |
| ६ शास्त्रिबुवा ! | १२ |
| ७ शास्त्रिबुवांची राहणी | १४ |
| ८ प्रीति आणि गृहिणी | १७ |
| ९ प्रसिद्धीचा पन्थ | २० |
| १० कविभूषण दण्डी | २२ |
| ११ डॉ० पण्डितराव | २४ |
| १२ संसारलक्ष्मी | २९ |
| १३ हृदयशारदा | ३२ |
| १४ शास्त्रिबुवांचा खो | ३४ |
| १५ अेकाक्षर—माहात्म्य | ३७ |
| १६ चिवटे | ३८ |
| १७ पन्त आणि पण्डितराव | ४२ |
| १८ शास्त्रिबुवांचें स्थलान्तर | ४३ |
| १९ मोरगिरी | ४५ |
| २० राजे मोरे | ४७ |
| २१ राणीराजे | ४९ |

| | | |
|---|---|---|
| २२ | रावसाहेब नकुलराव | ५० |
| २३ | शैक्षणिक कामगिरी | ५१ |
| २४ | संस्थानी शिष्टाचार | ५४ |
| २५ | माधवराव सुकाळे | ५६ |
| २६ | सञ्जीवनी | ५९ |
| २७ | दण्डकारण्य | ६२ |
| २८ | सारस्वत-सारमेय | ६५ |
| २९ | पुरोगामिसाहित्यकेन्द्र | ६८ |
| ३० | गृहाचें कान्तार | ७० |
| ३१ | वधूशोधन | ७२ |
| ३२ | विधवेची आशा ? | ७५ |
| ३३ | नवी विटी | ७७ |
| ३४ | नववधूवर्णन | ७८ |
| ३५ | रङ्गलेला संसार | ८१ |
| ३६ | डॉ० नकुलराव | ८६ |
| ३७ | बाजी अुलटली | ८७ |
| ३८ | आग भडकली | ८९ |
| ३९ | हतप्रभाव मन्त्र | ९२ |
| ४० | शेषशायिप्रसाद | ९४ |
| ४१ | प्रतिज्ञापूर्ति | ९५ |
| ४ | अुत्तरनकुलचरित | ९६ |
| ४३ | फलश्रुति | ९९ |
| ४४ | शेवटचे चार शब्द | ९९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..........

# नकुलालङ्कार

कविर्दण्डी कविर्दण्डी कविर्दण्डी न संशयः



चवरङ्ग घेत पुढती, मागे तक्या, बसायला पोथी;

नवरङ्ग करित काव्यीं बघत उडायास कल्पनाव्योमीं. ( पृ. २३ )

# नकुलालङ्कार

## १ मङ्गलाचरण

मण्डित जर न करिन मी काव्यमहाद्वार मङ्गलाचरणें
पण्डित तर कुणि दण्डी[1] दण्डीलच मज पदाचिया चरणें.
मग नमुनि लोकमाता तिच्याच सेवेंत कां न शर्थ करा ?
कुणि रामदास हो का बघुनि रमादास तो समर्थ खरा ?
प्रत्यक्ष शेषदेहीं झोपुं शके हरि परी नवल काय ?
पाय चुरीत बसे जर लक्ष्मी स्थिर जागरूक, न अपाय !
नमितों सरस्वतीसच सरस जिला काव्यसारस ध्याती,
रूढीस पाळितों जरि दिसे दुराराध्य फार सध्या ती.
सनमन दूर्वाङ्कुरे[2] मी वाहीं छिद्रानुजीविगण-पतिला,
स्खलित-सुभग मग कविता शोभे, लोभेच मूक कळप तिला. ५
प्राचीन थोर कवि जे, नाव न घेतांच त्यांस जोहार,
कोमेजे न यशाचा पडला त्यांच्या गळ्यांत जो हार.
अैकवितो कविता नच मारुनि हाका, बघा अुदण्ड मतें,
कै० कवि तो रसिकप्रिय, मी त्याला कां न घालुं दण्डवतें ?
केवळ कर जोडुनि जर जोडे आनृण्य कां न घ्या सन्धी ?
पोरांस अुन्च व्हाया ये थोरांच्याच चढुनिया स्कन्धीं.

---

१ ‘काव्यादर्श’कार. २ गोपीनाथकृत काव्यसङ्ग्रहाचें नाव.

करवीर-वीर कुण्टे, मुजरा तुज आडदाण्ड शूरा, जा !
बण्ड प्रचण्ड कार्व्यीं करुनि शिवाजीपरी न तू राजा.
मग मोगरे नमो जी ज्याची आर्या मराठमोळ्याची
असुनि सुशिक्षित साधी परन्तु हसऱ्या लबाड डोळ्यांची.

प्रस्तुत मग केशवसुत गुङ्गविलें ज्याचिया झपुझ्यांने,
खडकावरुनि मराठी वाहविला आङ्ग्लकाव्यपुर ज्याने.
लोटाङ्गण टिळकांतें अर्पीं कान्तेस तो निजकूस:
वेडा फुलां-मुलांचा तो गाअी वाहवून अश्रूंस.
वन्दन विनायकाला ज्याचें नच शारदा बघे शील—
रे कवन-कञ्चुकी, तू देअुनि किति त्यास शाप घेशील ?
हा राम राम त्याला जो नव कवनीं म्हणे पहा ‘ रामें ’[1]
‘ ताऱ्यांची बरसात ’ च ज्याची निर्मी विचित्र आराम.
बालकवे, येशिल का परतून ? विटलास काय काचांना ?
कशि तनुमन तुडवी ती[2] अुपनेत्रांच्या शिवे न काचांना ?

श्रीपाद, चन्द्रशेखर, भास्कर, बी—( कवि-परम्परा न तुटे,
सिद्ध ‘ फुलांची ओञ्जळ ’, रसिक कराया मरन्दपान कुठे ? )
आशीर्वाद अशांचा होअी तर हा महाप्रसाद मला,
यांनी क्षमा करावी; नमनीं जर हात हा असा दमला,
तर दाक्षिणात्य म्हणुनी होअिल माझी पुरी पहा फजिती
दवडूं द्या मज लौकर, न कळे आहे अजूनि वाफ किती.
श्रोतेहो, छे ! चुकलों. वाचक हो, जोडितों तुम्हां हात,
फुकट न कराल वाचन तर मग मायबाप खचित आहांत.

---

१ बुधवार ता. २१ मे १९१३ या दिवशीं वसंतव्याख्यानमालेंत राम गणेश गडकरी यांनी ( गोविन्दाग्रजांनी ) दिलेलें आव्हान पहा. २ आगगाडी.

मी नच कवि स्वयम्भू, छन्द रचीं मी अनेक छान्दिष्ट;
प्रतिभा साध्य न मजला, सिद्ध न मजजवळ तें कलारिष्ट.
साधूं सन्धि परि न कां ? कवितेचें चहुकडूनि रान पिके,
त्या धूर्त अेकस्याने कां घ्यावा कुहुकुहूनि मान पिकें ?
मारावया भरारी सुपर्णता ती नसो कवित्वाला,
अमृतहरणाची पण न कुणा आकण्ठ सोकवी ज्वाला ?
अमृत कशास ? कविता दाविल पाणीच सकस हस्ताचें,
जीवन जिकडे तिकडे ! फिटतीलच पाङ्ग मग समस्तांचे.
अुपयोगवाद पण हा व्यभिचार गमे कलाविलासाचा,
कवितेलागी निकष ध्वनिचा मग अेक लाविला साचा.
ध्वनि आर्येचा बघतां फोडूं कोठुनि मयूर-किङ्काळी ?
लावील वाजवाया कृति डासाचीहि नेमकी टाळी.
आहे अनुकृतिच ही, स्पर्धा कैची मयूरपन्ताची ?
कुक्कुट अुडूनि अुञ्ची मापिल किति नील त्या अनन्ताची ?

---

## २ शकुनींची काकस्तुति

दण्डकवनीं द्विजमुनी जमुनी होते अनेक ते शकुनी,
ते अुदरयज्ञ सरतां झाले तेथेच टेकते थकुनी.
" सूतोवाच करी रे, " वदले, " हरण्यास काल काकर्षे !
तू प्रथमवन्द्य होशी, न वाङ्मयें, अङ्गच्या गुणाकर्षे.
प्रासादाच्या शिखरीं चढुनिहि असतोस तू सदा काक,
नर पायरीहि चढतां दावी स्वजनांस भैट वा धाक,
बघ देविदास साङ्गे गमक तुझ्या पावन प्रतिष्ठेचें—
निन्द्य म्हणे का कुणि त्यां पिम्पळ होतांच काग विष्ठेचे ?

अिकडे तू पिण्डाला शिवतां सद्गति जिवास त्या तिकडे;
हो भग्न तालशाखा, न्यायीं पदलाभ तुज तथापि घडे.
गोग्रास मागुनी पण आधी तुज ठेवितात काक-बली;
दुबळ्यांस कोण पुसतो ? अुपजवि सादर जिवांत धाक बळी.
असशी किती प्रथितयश बाल्यींच्या लघुकथांतला ‘ काअू ’,
पारायणें पिढ्यांनी केलीं, त्या जाहल्या न टाकाअू.
‘ चिमणी ’ नको तयांचें तूच अधिष्ठान, लाडका पञ्ची;
आहे प्रसिद्धि तुजला ‘ गोस्वामीमानवप्रकाशम् ’[1] ची.
हा मारितो व्रणीं निज चञ्चू, निन्दोत अधिक बुद्धीचे,
साक्रोश कार्य पण तू चालविशी सार्वजनिक शुद्धीचें.
म्हणतात कावळ्याच्या डोळ्यावाणीच आड-पाण्याला,
पण तुझिया डोळ्याला अुपमा गवसेचना शहाण्याला.
झुकवूं शकतो पक्षी अेकच तुजला, न आन, कोकिळ तो;
कविकलुग्रास अशा या शम्भुजगीं मान कां नको ? मिळतो.
दिसशी परी कलियुगीं विहगवृन्दांत तू चिरञ्जीव,
तें नू तेंच अैकुनी जे शिणले त्यां गात तूंचि रञ्जीव.
न तुझी पोपटपञ्ची[2], धनी तुझा तूंचि जाण बोलविता,
तूंचि गिरीश अशिक्षित, जन यशवन्तास मान डोलविता !
नवमत दाखव कांही, अता नको गहन योगवासिष्ठ.
रिझविल हास्यविनोदच, व्हाया पण सहन तो हवा शिष्ट !
श्लीलपणेंहि न कर तू पावित्र्याची विटम्बना कांही;
क्षुरधारेवर माता-पित्यांस धरणें सुधारणा का ही ?

---

१ महाराष्ट्रफकीरमालेच्या वियमाने निघालेलें ‘ कावळा ’ हें पुस्तक पहा.
२ जयकृष्ण अुपाध्ये यांच्या काव्यसङ्ग्रहाचें नांव.

काव्यांत दाव लाघव ? नवी शुद्धा काळ, लघुकथा साङ्गा.
साङ्गे तन्त्र कला नव, दुराप तें पाळ बंधु यथासाङ्ग. ”
क्षणभर नेत्र मिटूनी निश्चल हो काक ज्यापरी धोण्डा,
अन् स्फूर्ति ती अुसळतां कोण्डाया ये न अन्तरीं लोण्ढा.

---

## ३ विद्वद्भास्कर

विन्ध्याद्रिच्या पलिकडे शिप्रातीरीं वसे जुनें शहर
राहे प्रसन्न होअुनि जेथ महाकाल तो अुमेश हर.
अेक ब्राह्मण तेथे ज्याची श्रद्धाच मात्र तोल हरी,
विद्वानांत हिरा तो, तेजस्वी पण तसा न तो लहरी.
विप्र पराशरगोत्री, पडावयाचा कधीच कलहीं न;
‘ विदुर ’ तयाला समजत विप्रवृन्दामधी सकल हीन.
जन्मग्राम तयाचें गिरणातीरींच कान्ह-देशांत,
सञ्चित परन्तु त्याला मालवदेशीं सुखान्न दे शान्त.
पोट भरे का तेणें दे कुळ-वाडी जरी पसामूठ ?
कां भाअुबन्दकीच्या खटल्यांनी व्यर्थ वाढवा फूट ?
सोपानदेव दण्डे, बाप तयाचा निकोप काळेला,
बहुत करी जो धन्दे देअुनि बाल्यीं निरोप शाळेला,
तो अुघडकीस येअुनि कागदपत्रांत हस्तचापल्य
जाअी येरवड्याला चाखायाला स्वकष्टसाफल्य.
जाअी छोटा यादव विद्या मिळवावयासि काशीला,
ज्याच्यामधि कर्तृत्व न तोच वरी क्षुद्रही मिराशीला.
गुरुपासूनि परतला प्रतिपच्चन्द्रापरी वरुनि कीर्ती
शिप्रावात रुचूनी हो स्थायिक सुप्रसिद्ध त्या तीर्थी.

तज्ज्ञसमाजीं झाला वादविवादाविना असा मान्य,
बाबा दीक्षितें[1] जैसा सत्यव्रत, गायनीं असामान्य.
डङ्का न वाजवित ते की विद्वत्तेकडे पहा माझ्या,
शङ्का विद्यार्थ्यांच्या फेडुनि शिकवित सलील 'बच्चा झा[2]'.
बघतां ज्ञाननिकेतन विद्यार्थी खास येत अध्याया,
घेत न वेतन हे तन झिजवित विद्या सचेतन द्याया.

केलें लेखन अल्पच, अध्यापन जरि अुदण्ड आमरण;
चाले नियमित त्यांचें प्रसन्न साधें अखण्ड आचरण.
प्रातःस्नान नदीवर चुकलें नाही कधी हयातींत,
लाड न देहाचे ते करीत झाले जरी वयातीत.
सूर्यासच नेमाने करित प्रणिपात विहित साष्टाङ्ग—
लागावा आत्म्याचा बलहीनाला जगीं कसा थाङ्ग ?
शुभ्र जगन्नाथीचा पञ्चा (तो ते धुवीत सावेश),
तसलेंच तें अुपरणें, साधा त्यांचा असे असा वेश.
पण मूर्ति भव्य गोरी, अङ्गावर कान्ति पक्व लिम्बाची;
शान्त प्रभा मुखावर, शुचितेची जणु सुधांशुबिम्बाची.

दुरुनिच त्यांस बघे तो त्यांची विद्यागभीरता वाणी;
परि परिचित ते जाणत रसज्ञता, हास्यही मुलावाणी.
वाणी मोहक असतां वाण पडे का कधी चहात्यांची ?
जणु 'चन्द्रिका[3]' प्रसन्नच ती 'सूनृतवादिनी[3]' अहा त्यांची !
सन्ध्योत्तर घाटावर करीत वार्ताविहार मित्रांशी,
व्यङ्ग्योक्तिनेंहि न परी शिवत कुणा व्यक्तिच्या चरित्राशी.

---

१ हद्दूखांचे शिष्य–साक्षात् 'नीलकण्ठ' असे–अलोट स्वार्थत्यागी महाराष्ट्रीय गवयी. २ 'बच्चा झा' अेक अगाध लेखक. ३ अप्पाशास्त्री राशिवडेकर विद्यावाचस्पति, विद्यालङ्कार यांच्या संस्कृत नियतकालिकांचीं नांवें.

त्यांनी कधी न छनली शिवरात्रीलाहि ती हरिद्वल्ली;
ध्यानीं न ये तयांच्या पोबारा काय, काय हुचमल्ली.
अभ्युदयाला जगतीं स्वतन्त्र बाणा पदोपदीं अडवी,
‘ विद्वद्भास्कर ’ परि त्यां लाभे सस्वास्थ्य शेवटीं पदवी.
होतीच सत्यभामा गृहिणी स्नेहाळ काटकसरी ती
पुरवी आणिक अुरवी, न चुके समयास थाट पसरी ती.
सैंपाक काय, करुनी घरचें सारेंच दळप-काण्डप ती
रक्षी स्वप्रकृतिला, न करी त्यांतूनि हेळसाण्ड पती.
अगदी पतीपरी ती, पतिही तिजसारखाच कष्टाळू;
कार्यक्षेत्रें त्यांची अलग, कुणि कुणा शके न कण्टाळूं.
नव्हतीं सर्वसुखी पण; करि चिन्ता अेक मानसा दंश,
अमृतगति द्यायाला चालायाचा पुढे कसा वंश ?
झिजवूनि पिम्पळाचे पार न जंव पाळणा घरीं हाले
स्त्रीमन मातृत्वोत्सुक कष्टी अत्यन्त अन्तरीं झालें.
तिचियाच आग्रहाने केला दुसरा शरीरसम्बन्ध,
संस्कार धर्म्य होता, नव्हता तो अन्ध राजस्वच्छन्द.
झाला प्रसन्न सहजच जरठ-कुमारींवरी विरञ्ची, व
यादवशास्त्र्यांना सुत झाला, कोण न वदे ‘ चिरञ्जीव ! ’ ?
नव सौभ्याग्यवती पण गेली निरखूनि बाळ-साम्भाळ
सवतीतें जणु साङ्गुनि ‘ माझा नव्हे तुझाच हा बाळ. ’
अुरली न देवकी जरि लाभे तान्ह्यास परि यशोदा ती,
हृदय कसें आअीचें ? कां साङ्गूं ? स्मरण तें असो स्वान्तीं.

## ४ नकुलाचा कुमारकाल

नाव गुरूचें अपुल्या कुतुकें बाळास ठेविलें—नकुल !
आता समुन्नतीतें गुणी असा पुत्र केवि ने न कुल ?
केला द्विज गृहस्थहि अडकवुनी जानवें गळ्यामाजी,
आणिक माळ म्हणूनी कन्या जी बागडे कळ्यांमाजी.
‘ रामो हरिः करी . . .’ तो घोकी, वडिलापुढे धरी ताल;
मागूनि ‘ शक्लुपच्मुच् . . .’ अुच्चार नको असे करी हाल.
वृद्धच विद्वद्भास्कर जाअी सत्वर तदस्त होअून;
लावायाला चटका नाही मग वरद हस्त हो अून !
अन् मांतुःश्रीशिक्षा म्हणजे कोजागरीच खेळाची,
अन् रम्य बाळपण तें ! व्हावी काशि शुद्ध काळवेळाची ?
नकुल म्हणे, “ मी जातों आअी, शिकण्यास थोर अिङ्ग्रेजी —”
खर्च बुकांचा, फीचा, विविध वह्यांचा न पोर कीं मेजी.
होतेहि दिवस त्यांचे न दीनवाणी, फिके, हलाखीचे;
न झरा जिवन्त पण मग कुठवर पाणी टिकेल टाकीचें ?
पुढल्या आशेने दे आअी मागेल पोर तें सगळें,
घे चिमटा पोटाला पोराला जो न या वयांत कळे.
ये अिङ्ग्रेजी त्याला तह्शील कशी जवेंच पावे जी ?
अुतरे परि हें मोती होअुनि बहु झीज-वेंचे पां वेजीं ?
बोलुं शके अिङ्ग्रेजी, लिहीहि किति भग्नशब्दबम्बाळ !
पद्यहि रची तयाने गणिताची मात्र होय आबाळ.
जर चालणें शिकावें तर का लागावया नको ठेच ?
अगदी सुरक्षित असें नाही हो राव यान कोठेच.

---

१ Montessory System ? २ वेंच, व्यय.

चढला अडखळतच तो सवङ्ग टिपण्या यथेच्छ घोकून;
पडला, दार खुलेना धक्क्यांनी, तो बघेच ठोकून.
यत्न करी पञ्जाबीं, मुक्तद्वारच कुणी म्हणे तेथे,
' पुनरागमनायच ' परि वदले पदवीदलप्रणेते ते.
अुलट वसे तों याच्या अक्कल-कोटास त्या तदा हदरा ?
चिन्ता म्हणे कशाला विद्येची यावनी सदाह धरा ?
आधी ' गढन्त ' मागुनि ' चखन्त ', कसलीच खन्त मग नाही,
मागूनि मगरमोह्यामधे कलावन्त चपलजघनाही.
वात्सल्य जन्म पावे वत्सासह, वाढतें क्रमीत दिनें;
पण पाणिपीडनाने प्रेम न पावे, पळे परागतिने.

माणुस कधी विवाहें बने चतुर्भुज कधी चतुष्पाद,
माणुसकीचा तेव्हा हो स्वाभाविकपणेंच अुत्साद.
जर लोढणें म्हणूनिच बान्धावें हें कलत्र पुरुषगळीं
तर कां न भूमिवरुनी तें लोळावें झिजून चरणतळीं ?
आहे, झालें अपुलें, दृष्टि तयाच्याकडे वळेनाच;
अप्राप्तासह आशा करिते रङ्गीत आगळे नाच.
त्यांतुनि घरांत येती जिव्हेचे पुरविण्यामधे चटके,
अटके गृहीं न तोंवर, मोहुनि बाहेर चित्त तें भटके.
सामर्थ्य असे तोंवर बाहेर पराक्रमीं गमे सुख तें;
निवृत्तिपर न वाटे गृहस्थ होणें, निवर्तनोन्मुख तें !
पाहूनि पौरुषाचे अुधळी हा नकुल केवि दिव्य गुण,
घे नेत्र मिटुनि आधी, बघायचें काय यापुढे जगुन ?

---

१ ' गढन्त ( भङ्गप्राशन ) फिर चखन्त ( मिठाअीसेवन ) फिर भिडन्त ', अशी अेक म्हण अुजैनींत प्रचलित कदाचित् अजूनहि असेल.

मिटतां त्या आओीचे, याचे तत्काळ अुघडले डोळे !
सरणीं जळे तिचें शव, याचें अन्तर तयासवें पोळे.

---

## ५ चरितार्थशोधन

छल अतां तें गेलें, कडक पडे अन् दुपारचें अून;
तावून अन्तरात्मा शुद्धीप्रत जाअि पार चेअून.
नर कोरडीहि अडतां सेवी पण पाहिजे घरीं पोळी,
नकुल न भिक्षुक, तर मग केंवी क्षण साहिजे करीं झोळी ?
कामहि रित्याच पोटीं सुचते जात्यावरी जशी ओवी;
स्वास्थ्यच मत्त करूनी नरास पापाचिया फशीं गोवी.
पण अिङ्ग्रेजी शिकुनी व्हावें लोहार-रङ्गकार कुणी ?
वृत्ति अुरे मग अेकच मास्तरकी वा सवङ्ग कारकुनी.
पाहूनि शिक्षणाचें क्षेत्र पटे हा मनामधी पाठ—
वर्षानुवर्ष साचुनि गाळ सुपीकच करी नदीकाठ.
पोटापुरतें संस्कृत होअी शाळेमधूनि ओघांत,
अधिक नको, कवि वदला, ' अमुचा पाणिनिकडूनि हो घात[१] '!
कां ' पाणिनीय शिक्षा ' ? कां ' परिभाषेन्दुशेखर '[२]—ध्यान ?
लागे विद्वान् व्हाया शिणवाया मेन्दु देख सध्या न.
लाभे प्रसाद केवळ कविकुलगुरु कालिदास पाहून;
कां हर्ष, माघ, भारवि ? रविकीर्ति सुगम जिवास त्यांहून.
कोठे अुद्यानांतुनि नेलेली गालिच्यापरी सडक,
कोठे किरे रहाटी, प्रपात, सुळका, कडा, दरी, खडक ?

---

१ ' हताः पाणिनिना वयम्.' २ नागेशभट्टाचा व्याकरणावरील ग्रन्थ.

‘ ऋतुसंहारा ’ मागुनि ‘ कुमारसम्भव ’ न पाहिला नीट
तरि वाग्व्यापाराला पुञ्जी ही काहि नाहि वाअीट.
सुत यादवशास्त्र्याचा शास्त्री व्हावा बळेंच, नावाचा !
साहेब, राव अथवा पन्त म्हणाया वळेच ना वाचा.
‘ अीण ’ प्रत्यय लावुनि पतिपदवीतें सती सहज पावे,
नावाला मग पैतृक का पुत्राने मुळीच न जपावें ?
धोपेश्वरकर म्हणुनी वडिलांचे मित्र तो बघे होते,
‘ प्रोपेश्वर ’ ते म्हणजे ज्ञानाचें धेण्ड दाण्डगें हो तें !
जाअूनि अिन्दुराला कळवी त्यां नकुल आपुला हेत,
“ शाळेंत नेमवा मज, भुजङ्गशास्त्री मुमूर्षु आहेत.
मी ‘ पञ्चतन्त्र ’ आहे भाषान्तरिलें, रसाळ गद्य बघा,
किति डौलदार भाषा, नाही महिनाहि लागला अवघा.
प्रगटेल पात्रता मग, अुच्चपदीं नेमवा, नसो कमतें—”
( नेपाळेश्वरभालीं चिखलहि कस्तूरि होय लोकमतें ! )
त्यांनी हितोपदेशच केला की ‘ काव्यतीर्थ ’ जा हो रे.
पदवीशून्य बसे जो त्यास अता ये न दैव सामोरें.
नकुलही मनीं प्रतिज्ञा करी, अकालीं जनीं वदावी न.
“ दिधल्यावीण परीक्षा प्रोपेश्वर मी बनून दावीन.
बन्द द्वार असेना ? शोधुनि काढीन आयतें बीळ,
घुसल्यावर ते आंतिल चुम्बित जागा न काय देतील ? ”
कां पाहिजे परीक्षा द्याया ? आहेच जातिसंस्कार,
आहेच युक्तिचें बल, दैवाचा पण हवाच आधार.
मग वर्तमानपत्रीं प्रकाशिका बघुनि ‘ पाहिजे ’ च्या तो
टाकूनि अर्ज ठेवी आशा चन्द्रापरी बिजेच्या तो.

निज नाव ‘ नकुलशास्त्री बिन् यादवशास्त्रि ’ तो असे लिहित,
हित जगीं जेणें साधे, साधें तें कर्म नच कसें विहित ! ११९

## ६ शास्त्रिबुवा !

ये शेवटीं तयांच्या याञ्ञापत्रास अिष्ट होकार,
दूरस्थ रम्यतेवर जाअी भाळुनि वरिष्ठ, हो गार. १२०
कां अेकवचन आता शास्त्रिबुवा[1] हो तयाप्रती ? छे छे !
होतेच ते चतुर्भुज, गमकच तें राष्ट्रिय प्रतिष्ठेचें.
बाहेर कामधन्दा आणि घरीं स्वस्त ज्यास दाराही
सामाजिक प्रतिष्ठा त्यावर भाळूनिया सदा राही.
संस्कृत शिक्षक आले निजळयाला मग करावया वास,
शास्त्रिबुवा ही पदवी चढवी भुलवीत भाव नावास.
कैसे शास्त्रिबुवा ते शोभत, नव्हते जरी ध्रुव स्थानीं ?
प्रौढ तसे सम्भावित, वळवावें वळण तें गृहस्थांनी.
ठेङ्गूच मूर्ति होती, ठेवण मध्यम शरीरबान्ध्याची,
आरक्त गौर कान्तिस अुपमा शोभेल सरस कान्याची ! १२५
कन्दर्पदर्प[2] न रुचे ? घ्या ‘ काश्मीरी गुलॊब ’ अुपमेस.
काळेंच तोण्ड करितो भृङ्ग अिथे बघुनि डाम्बरी केस.
घेरा वाटोळा तो डग्यावरचीच ती जणो शाअी;
पुढलें मुण्ड न मुण्डित, बम्पारा[3]—गुळगुळीत गोलाअी.
खेळे खान्यावर जी बिलगे डोअीस चढुनि सस्नेह,
कुरवाळीत जिला ती तनुजा कृष्णा शिखा, न सन्देह.

---

१ शास्त्रिब्रुवः. २ न पाहिलेली वस्तु या अर्थी. ३ पपनस.

स्नानानन्तर सटकुनि सैल सुबक देत ते तिला गाठ,
देतात आङ्ग्लवेषीं गळबन्धीं आडवा जसा घाट.
भाळीं चन्दनरेषा शोभे की कोर बालचन्द्राची,
बघतां स्मार्तांना स्मृति व्हावीच स्फटिक भालचन्द्राची !
शास्त्रिबुवांच्या कानीं भिकबाळी पाणिदार मोत्यांची
अभिजात श्रीमन्ती दावी ती सर्वदा नमों त्यांची.
अन् शुभ्र शेवयापरि कण्ठीं यज्ञोपवीत ते लोळे,
त्याचमुळे कीं त्यांना म्हणत शुचिर्भूत जाणते भोळे.
डोळे हिरवट का ते मोरचुताचे खडेच चकचकित ?
ती दृष्टि पाहतां क्षणिं कोण न होअूनि जाय भयचकित ?
तें नाक अुन्च लाम्बट, तर्वारीपरि जया दिसे वळण,
वीरत्वाची पटवी ओळख, पटवूं शके तसें बळ न.
ते कर्तरिप्रयोगें करित मिशा दन्तकुन्चलीवाणी;
अुघडे ओठ पडत पण अुमटे अनिरुद्ध शुद्ध ती वाणी.
खुण्ट तसे दाढीचे दावित कर्मठपणाच ताठ्याने,
क्षौरास पाहिजे तिथि, कितिही वाढोत ते झपाट्याने.
पायीं लाल पुणेरी, जो ये हातींहि बसावया गालीं;
राष्ट्रिय सभेत सुरतीं विरुद्ध याच्याच होय कागाळी.
परिटघडी डौलाचा अङ्गरखा बन्ददार त्या अङ्गीं,
धोतर आणि अुपरणें विमल असूनीहि मोतियारङ्गी.
पगडी न अुत्तमाङ्गीं, तर बान्धिव गुबगुबीत पागोटें,
पावांतें पागोट्याने पण्डितरत्नत्व पूज्य पां गोटे.
घातुक शास्त्रिपणाला टोपी घालायला असो सोपी,
कुळथोरवीस दावी, न बङ्गला, घर जुनाट चौसोपी.

संस्कृतविदच विलोकीं नटवी ज्ञानेश्वरीस सुश्लोकीं,
शास्त्री ठरे न लोकीं टोपीने ओकमास्तरच तो कीं !

---

## ७ शास्त्रिबुवांची राहणी

शास्त्रिबुवांची शाळा होती तेथील गावगाड्यांची,
होती धुरीण म्हणुनी ख्याति तिथे सम्भुजी घबाड्यांची.
शिकले पाच बुकें तरि करित अुलाढाल पाच लाखांची,
चकवून राखणें पत, त्यांस कळे ही कला चलाखांची.
तम्बाखु-गूळ-मिर्चीं यांवर झाले बलाढ्य राजे ते,
कर्षक होत भिकारी, हेच धनाकर्षणें धराजेते.
शेतांस जे पिकविती त्यांची असहाय काय दैना ही !
क्षेत्रफळामधि किञ्चित् अन्तर केव्हा पडायचें नाही.
अर्थात् शब्द तयांचा दण्डक होअूनि जाय त्या गावीं,
व्यवहारचातुरी ती अधिकाऱ्यांनीहि का वृथा गावी ?
राष्ट्रसभेच्या क्षेत्रीं फेकुनि ते देत मोजके दाणे,
कोण तयांविण दुसरें त्यांचें भवितव्य गोड तें जाणे ?
वरती गान्धीटोपी, आणिक अङ्गांत शुभ्र तो अभ्रा
आंत असो काहीही, पवित्र खादी न होअुं दे बभ्रा.
लागे शास्त्रिबुवांना जावें त्यांच्या घरास शिकवाया,
वाया कसें ? हवें तें आसन अन् पुढिल आस टिकवाया.
व्याख्यानही तयांचें लिहुनी हे देत घोड-वेगांत,
आभार मानितां मग अर्थात् त्याचेच गोडवे गात.

---

१ महादेव पाण्डुरङ्गशास्त्री ओक.

‘ शास्त्रिबुवा ! शास्त्रिबुवा ! ’ म्हणुनी मग देत ते जनहि मान,
‘ थोराचे घरिंचे हे ! ’ म्हणतहि कुणि, ‘ हा स्वतेज-महिमा न.’
अजुनि कुणावर नव्हते गेले धाऊन तोण्ड टाकाया,
पाही न ‘ अुदरदर्शन ’ शिष्ट समाजांत कोण झाकाया ?
धवल यशासम असतें स्मित हा प्राचीन काव्यसङ्केत
इस्तीदन्ती यांची पटवी, ठेवी कुणा न शङ्केंत.
कुणि थोर भेटला तर मान लवे, हो क्षणी प्रफुल्ल मुख;
तरि अेरव्ही कुणाचें स्मरण न ठेवीत, कोण तो तमुक ?
चालत ताठपणें ते, न कशी लक्षांत मान ये मस्त ?
मस्तक मागे रेले, दिसुनी ये स्वाभिमान नेमस्त.
गाम्भीर्यांत छटा ती त्यांची झाकूनि राहि रङ्गेल;
अन्तर तर लोकोत्तर ज्यावर सुन्दर हिराहि भङ्गेल.
तरुणच शास्त्रिबुवा हे, मिसळत तरुणांत पण न तेथील;
नाही चहा, कशाला कोण घरीं मग अुगीच येतील ?
हेहि न जात अकारण, तच्छ्रुति नाणकनिनादलोभवती—
‘ अतिपरिचयादवज्ञा सन्ततगमनादनादरोभवति. ’
येतां थोर घराला क्षुद्रास न वाटतो अनुग्रह तो,
मधुसहवास कशाचा ? मारी तो डङ्ख होय दुस्सह तो.
देव न फिरति जनांच्या भोंती म्हणुनीच ते जनीं पूज्य,
नाही तर प्रतिष्ठा होती बहु नीच ते, क्षणी पूज्य.
मग नेटका कराया प्रपञ्च हे धड घरीं मुदा रमत—
व्यासङ्गवाचनाचा, देतच जन झडकरी उदारमत.
नसतां जवळ सुवर्णप्रभाव बाहीर त्या न कुणि बाही,
राही गृह-स्थ कष्टें तुष्ट प्रतिपन्नवस्तुनिर्वाहीं.

साहित्यसाधुसङ्गे पत्रव्यवहार करित ते विनयें,
फल पण्डितमैत्रीचें रम्य दुरूनीच खचित केवि नये ?
हे परि सभा न टाळित, भाषण हे करित अस्खलित शुद्ध;
त्या संस्कृतप्रकर्षें होत श्रोते प्रसन्न हतबुद्ध !
सम्पन्न संस्कृताची बैठक नसलीच जर मराठीला
तर ते म्हणत, दरिद्री ही कशि पावेल भरभराटीला ?
प्राकृत पहा म्हणो कुणि, जा व्हा वाक्पति[1] शिकोन ' गौडवहो '
पण बोल बोबड्यांचे शिकोन करणार कोण गौरव हो ?
घेऊनि मार्गदर्शकें[2] वामन शिवराम आपट्यांचा ते
सुललित संस्कृत शब्दीं सजवित ते प्रवचनप्रपञ्चातें.
पेरुनि पहा प्रवचनीं पुण्य पुराणांमधील बोल खडे,
पाण्यावाचुनि पदरीं पाण्डित्याचें प्रचण्ड पीक पडे.
वर्गांत कारिका वा सूत्रें निज वाग्भरांत सोडीत,
ज्ञानें अगम्य पोरें मग आ वासून हात जोडीत.
भाषेंत घरगुती परि त्यांच्या ये ' च्यायला ' किती वेळा !
मन्त्रचळच तो, त्याविण कोठुनि बळ, सरसताहि जिव्हेला ?
हे वैश्वदेव, पूजाअर्चा सारें करीत विधिमात्र,
श्राद्ध चटावर कांकी ब्राह्मण यांना दिसे न सत्पात्र.
ओढ्याच्या काठाने नित्य फिरायास अेकटे जात
अुरकित सायंसन्ध्या खडकावर अरुण मन्द तेजांत.
आशाळु शान्ततेने होते संसारशकट ओढीत,
दाबूनि मूठ अपुली चालत अैटींत आणि गोडींत.
ऋण काढीत कधीहि न, होअूंच न देत वाअुगा वेंच;
पेढीवर ठेवीने राहावें स्वस्थ वा फुगावेंच.

---

१ वाक्पति, गौडवहोचा कर्ता २ सुप्रसिद्ध ' गाअिड.'

## ८ प्रीति आणि गृहिणी

शिप्रा म्हणूनि होती शास्त्रिबुवांची सुशील पत्नी ती,
नातिचरामि म्हणूनी पाळित हे आर्यपुत्रवत् नीती.
वडिलींच आणिलेली पाहुनि, हुण्डा न, ठीक कुलशील—
रूपाला हुण्ड्याला रे नव तरुणा, कितीक भुलशील?
बाल्यीं विवाह होऊनि त्यांचा घेण्डाहि जाअि नाचविला,
तरि संसारसुखाच्या पालट मूळांत होअिना चविला.
संसार होत राही, देवदयेनेच वंशवेल फुटे,
सर्वसुखी नसुनीही खन्त कराया रिकाम वेळ कुठे?
शास्त्रिबुवा ठेवीत न काहीतरि खूळ हीन डोक्यांत,
धोक्यांत न ये कधिही गृहबन्दी, तो जनीं न हो ख्यात.
प्रीतिस हेटाळित हे (कां की सध्या पुढे न योग तिचा);
सविनोद म्हणत की त्या प्रीतीचा पथ सदा अधोगतिचा!
काव्यात्म प्रीतीने जाअी होअूनि हृदय हें शतधा,
स्पर्शुं शके कङ्कत तो कान्तेचे कृष्ण कुटिल केश कदा?
न प्रीतिस, कोणाची प्रीति? प्रश्नास या महत्त्व खरें,
नर का वरिल खराला दाखविलें जरि ललाम तत्त्व खरें?
शुचि ते प्रीति न जे हो केवळ पर्याय अेक अभिरुचितें,
गुपितें गोड कवींचीं पोकळ शब्दांचियाच नाभिं अुचितें!
सौजन्यजन्य जी ती होअी सौभाग्यसुन्दरी प्रीती,
काव्यींच जी तरङ्गे जणु 'म्हातारी'–किती दरिद्री ती!
म्हणतात लोक, असते पत्नी त्यांतुनि पतिव्रता, वेडी;
स्त्रैण न शास्त्रिबुवा, ती नच दावी प्रीतितीव्रता वेडी.
स्त्री प्रवृत्त म्हणूनिच संसाराचा वरी मुदा शीण,
आहेच साङ्ख्यमत की पुरुष सदाचा घरीं अुदासीन.

दे शेषशायि भगवान् लक्ष्मीला स्थान अढळ पदकमलीं,
पदसंवाहनिं रमली, जागत चित्रापरी न ती दमली.
होती गृहलक्ष्मी ही, भाळावर भव्य टळटाळित कुङ्कू,
डोळे दुखरे असुनिहि गाठ चुलीशी, पडेच नित फुङ्कूं.
होते ओठ सतीचे पिकल्या मिर्चीपरी परी रङ्गें,
अन्य सुवर्ण कशाला सुवर्ण होतीच ती जरी अङ्गें ?
मङ्गलसूत्र तिचें तो अेक अलङ्कार तीजला रुचला,
सौन्दर्यसाधनास्तव जग का बाजार की चला, अुचला !
गुडघ्यावेरी ओचे, बाह्या चोळीस कोपरावेरी;
पद्धत ही, जरि लुगडें बऱ्यापरी गेलियास बाहेरीं.
नेसे सणास न्हाअुनि वडिलार्जित पैठणी जरीकाठी,
घेतच शास्त्रिबुवा खण रुपयाचा अेक कञ्चुकीसाठी.
वेणीचें कडबोळें न दिसे जंव पदर घे शिरावरुनी,
गेल्यास जायची ती दूर किती ? देव-मन्दिरा घरुनी.
शिप्रा नव्हती चपला, व्हावी तोऱ्यांत मग कशी लवती ?
कष्टे कुलीपरि घरीं कुलीन ती लीन कनकशीलवती.
आर्या कार्य पहातां वाटे दासीच, आज अुपदासी !
भार्या गृहराजाची म्हणुनी चढवी समाज सु-पदासी.
सुगरणपणांत अपुल्या न करुं शके हेळसाण्ड कधिकाळीं,
खातां घरांत खस्ता आठी न पडायची अगदि भाळीं.
' हें आणा, तें आणा, ' लागे मागे न मुळि बिचारी ती;
रीति जुनी तिज ठावी, आयव्यय पतिस ना विचारी ती.
होती धीराची तशि, नसतां शास्त्रीबुवा घरीं रात्रीं
न भरे कम्प भयाने गृहकार्यें श्रान्त जाहल्या गात्रीं.

प्रत नं. १९

कामांत वाघ होती, हाडाने दीन बापडी गाय,
चारापाण्याविण तिज दुसऱ्या असणार आवडी काय?
कान्तकृ[1]तान्त यांतिल भेद न ठाअूक होय तीस कधी;
संसार गृहमेधच, अेक मुका मार जो झणी न वधी.
ती चन्दनापरि म्हणे जावो होअूनि निष्प्रभ क्षीण,
ऋण पातिव्रत्याचें फेडिन मग अग्निकाष्ठ भक्षीन.
अैकावया सतीचा शब्द न येअी घरांत बाहेर,
शान्तिसुखाचें म्हणुनी होतें घर दीस-रात माहेर.
अैशी गृहिणी असतां पतिची सहसा न ती फुटे अब्रू,
जरि त्यास बघुनि डोळे मोठे होअूनि वर अुठेच भ्रू.
सैंपाकघर हिचें जग तेथें जाअी हिचा स्वयें काळ,
बाहेरच्या जगाचा पुरुषार्थंच टाळितां नये ख्याल.
गृह आणि गृहिणी हीं अेकच न असती म्हणींत नान्दून,
लग्न करूनि पहावें आणिक घरही तसेंच बान्धून.
असतो पतिपत्नींचा कैवा[2]राच्या समान संसार,
पत्नी गृहबिन्दुस्थित, भवति करी पति स-मान सञ्चार.
जाअी घरस्याभवती घिरट्या घालीत अुन्च चण्डोल,
न चुके ये निजधामीं शेवटिं अुमजूनि तेंच अनमोल.

---

१ कृतान्तः कान्तो वा अिति अमरुशतके. २ कैवार, कम्पास.

## ९ प्रसिद्धीचा पन्थ

संसार चालला, पण नव्हते हे गुरु लघुत्वसन्तोषी;
होणार देश-मुख जो राहिल तो केवि गावचा जोशी ?
शास्त्रिबुवा म्हणवुनिही पन्तोजीला कुठे सभास्थान ?
औदासीन्यच थोरां, पोरांमाजीहि लेश आस्था न.
वाटे शास्त्रिबुवांना तोच जगीं जाय होअुनी गुण्डा
सम्भावना समाजीं साङ्गुनि ये ज्यास घेअुनी हुण्डा.
करणें कवित्व म्हणजे वाटे होणें कवीस देश-मुख—
ते कोण, काय पुसतां ? साहित्य-सुघोष[1] ते बडे अमुक :
वैभव पुरुषार्थांचें म्हणजे व्यापार हा कवित्वाचा,
अुद्धार काय अेकच जगताचा यांत ? लाख विश्वांचा !
कोणि म्हणे कविता नच सुरधुनि, ही वीज, कठिण अवतरण !
कवि अितिहास कथी निज—भोगावें प्रेम आणि मग मरण !
स्फूर्ति म्हणे, 'मारुतिपरि मार अुडी अुन्च, दाव राम बघूं,
झालें पतन तरी तें दूषण नच, जाण दूष्य काम लघू.
जुळव 'ट' ला 'ट' नि कवि हो, काव्य लिही गद्यपद्यमय चम्पू,
कर दिग्विजय, सवें घे लघुगुरुचे हे कवायती कम्पू.
पाठान्तर तुज आहे, काव्याचें त्यामधे न का बीज ?
'काव्यं यशसेऽर्थकृते'—कर दोन्ही गड सवेग काबीज.'
विषय कवण परि ध्यावा ? शय्या रचण्यास रीति ती कवण ?
रस कोणता करावा ? घ्यावें पाणी किती, किती लवण ?
शास्त्रिबुवा न्याहाळित भवतीची काव्यकामिनी क्रीडा,
चाले मुक्तच्छन्दें, युवतिस शोभे न या दिनीं व्रीडा.

---

१ 'नकुलः सहदेवश्च सुघोष-मणिपुष्पकौ' गीता.

सन्तांचीं अुच्छिष्टें सेवुनि कुणि दे प्रसाद-लाभ जनीं;
स्वास्थ्य तया लाभुनि वर समाज त्याच्याच साजला भजनीं
पाही जुनींच अुजळूं कुणी स्वधर्म स्मरूनि सच्चरितें,
राही परी यशाने त्याचें पोतें भरूनि गच्च रितें !
कुणि वर्तमानपत्रीं राष्ट्रिय कविता रची निरायास,
गिरि डोळयांत भरेना; वश न, म्हणे रसिकची गिरा यास.
माण्डी बखरकथा कुणि पद्यीं, शब्दप्रकर्ष तो अैका.
भाण्डीं[1] धुमूधडधडतां विरघळुनी अभ्र वर्षतो पैका.
वृत्तबळें शब्दार्णविं आत्माचल अेक जन्मभर घुसळी,
न मिळे 'श्रेय हरपलें,' घेअी पण काल-कूट वर अुसळी !
सीमोलङ्घनकालीं झेण्डूच्या फुलवितां कुणी ओळी
रङ्ग भरे भडकच तो काव्योद्यानांत भडकुनी होळी !
त्या प्रणयपण्ढरीचा होअी कवियुवक अेक वारकरी,
ज्ञातास्वाद परी त्या प्रेमीं प्राकृत पदें प्रहार करी.
लावील काळ नकळे अशा कवींची कशी विल्हेवाट;
या भीतिने सुरक्षित शास्त्रिबुवांना न ती मिळे वाट.

---

१ भाण्डें, तोफ, नाळ.

# १० कविभूषण दण्डी

जर संस्कृतींच शाश्वत, बिदग्ध, आदर्शभूत तें स्फुरलें,
आधुनिकांस पराक्रम करणें भाषान्तरींच तर अुरलें.
सौभाग्य मळमळित तें असतें रूपान्तरीं, कुणास हवें ?
छायाकार म्हणोनी लाभे तो मान जरि अुणा, सहवे.
धोपटमार्ग भला हा, न लगे नव बिकट वाट-वहिवाट,
आहे सुवर्ण सिद्धच, मात्र घडाया हवा नवा घाट.
तीं[1] तींच नित्य येती, दाविति तो तोच अर्थ तीं पद्यें,
सत्काव्य वाटवी नव, सारें कौशल्य माण्डणींमध्यें.
काव्य म्हणूनी न लगे बसणें आता वळावया सुम्भ,
जीवन गार कराया घ्या केवळ नव घडावया कुम्भ !
कार्यारम्भीं अक्षत देती सर्वत्र गावदेवास,
जो निर्विघ्न करूं दे जनांस अपुल्या घरामधे वास.
मग सम्भुजी घबाडे यांच्या नावें करीत ओनामा;
दैवत मुख्य त्यजुनी ‘ प्रसीद ’ म्हणणार अन्य कोणा मा ?
“ औदार्याने गमशी जनतेला मेघ छे नव्हे ! अम्भो–
निधि ! माताच पिता मे विद्याद्रविणं त्वमेव हे शम्भो ! ”
करुनी मग अभिनन्दन यापरि सानन्द जन्मगांठीला,[2]
शास्त्रिबुवांची कविता सेवी स्वामीस अन् मराठीला.
ध्वनि न मुळी कळला, वा गमली न धन्यास धन्य सत्कविता—
अन्यास काय ठाअुक कष्ट किती प्रथम पद्यषट्क बितां ?
पण लागले कराया हळुहळु सावेश जानुचङ्क्रमण,
सण पाहूनि दिवाळी, होळी, मकरेस भानुसङ्क्रमण.

---

१ काव्यरत्नावलीचा सुप्रसिद्ध श्रीदश्लोक पहा. २ जन्मगांठ, वाढदिवस.

वळित वळीत पुढे ते भर्तृहरीचे सुटे चतुष्पाद,
छायेंत घेत कवितावनिताधरमाधुरी मधुस्वाद.
बघती मग ती जुळवूं कविता शिष्ट, स्वतंत्र, सुश्लिष्ट;
न टळे चतुष्पदीमाधि अगदी अुच्छिष्ट वा कटु क्लिष्ट.
चवरङ्ग घेत पुढती, मागे तक्क्या, बसायला [1]पोमी
नवरङ्ग करित काव्यीं बघत अुडायास कल्पनाव्योमीं.
किंवा ओढ्याकाठी ठरल्या ठायीं दिसायची मूर्ती,
'चिन्तन–चिन्च' तिथे ती अचूक मग यांस द्यायची स्फूर्ती
'काव्यसमुद्रीं' मुद्रित कवित्व व्हाया न अडचणी फार;
धाडूनि रौप्यमुद्रा झाले होतेच वर्गणीदार.
हो पण कवितेखाली नाव निराळें हवें ललित साचें;
टोपणनावच गोपन-सङ्गोपन जागें करी कवियशाचें.
नाव हवें ओजस्वी म्हणुनी मग नाव घेत हे 'दण्डी;'
कविता शोभे चण्डी, वाजे रसिकां सुदर्शनें थण्डी!
मग यावया प्रकाशीं ते कविसम्मेलनांत जाअून.
भाकड रसचर्चा ती करीत, दावीत काव्य गाअून.
कविता प्रसिद्धिवाचुनि म्हणजे वाचाळता क्रियेवीण,
अज्ञातनाद करुनी क्षीण कवीलागि येअि केवी न?
वर दक्षिणाहि देअुनि कवि तो कविता जनांत फडकवितो,
बाप न त्या अुत्साहें मुलीस शुभबन्धनांत अडकवितो.
शास्त्रिबुवांनी केलें दाक्षिण्यें शारदाप्रसादन तें,
परमार्थसाधन गणो मयूर, अितरास भरवसा धन तें.
व्हायास पङ्क्तिपावन हे मग कविसङ्ग्रहामधी आले,
सिन्धूंत ज्याप्रमाणे पवित्र होतात नदनदी नाले.

---

१ पोमी, बसायची पातळ गादी.

पदवी हवी कवीला, तिजविण व्हावी बघा कशी प्रगती ?
वृद्धास यष्टि, शिष्या साधुस देखी जगांत शीघ्र गती.
पदवी पहा जनीं ही, सुखें तुम्ही मग मनीं गुणास हसा ;
'श्री' च्या कृपेविना ही पदवी न मिळे ह्मणी कुणा सहसा.
'कविभूषण' झाले मग करितां पद्यांत पाद्यपूजा ते,
देणाऱ्याची बुद्धिच पदवी देण्यांत बा अतूं जावे.
कविभूषण पण अेकच भूषवि शिवराजरत्नभाण्डार,
कविकेसरी गणा त्या जो दुमदुमवील काव्यकान्तार.
निःसंशय कवि दण्डी आता झालेच नामवन्त कवी,
वाचति कोण किती त्या कविता याची कशास खन्त हवी ?
कर्णोपकर्णिकेने होय मिऱ्याचा अहा महा-मेरू !
सवडच कुणास आहे, 'सत्य पहा' साङ्गतां दहा येरू ?

---

## ११ डॉ० पण्डितराव

कविता-वनितापायीं अेकाशी लागली अता स्पर्धा,
कवियितीची ओळख व्हाया मग जीव जाहला अर्धा.
मोरागिरीला डॉक्टर विन्दु गदाधर ढिसाळ नावाचे
होते व्याख्याते, कवि, वाग्भूषण त्या विशाळ गावाचें.
लाडांत त्यांस बाल्यीं 'पण्डित' हें नाव ठेवितां वडिलीं
कालें 'राव' म्हणूनी त्यांची पदवी पुढेच वाढविली.
अर्धं त्यजूनि शिक्षण की येथे हो न मध्यमा पास,
गेले अमेरिकेला, आर्थिक चिन्ता न शक्य बापास.

'अे. अेम्., पीअेच्. डी.' (गल्) अैशा पदव्यांस काय टाकाल?
परदेशी पदव्यांचा नाही का आज चालता काळ?
डॉक्टर म्हणजे वाग्भट, साहित्याचार्य, पण्डितप्रवर,
विद्यावाचस्पति वा विद्याप्रान्तावरील चक्रधर!
पाश्चात्य शिक्षणाचा त्यांच्या न कुणा पडूं शके विसर,
ते सूटबूट घालित सकाळभर झोप घेत केंवि तर?
पट्टेदार दुरङ्गी रात्रींचा कोट-चोळणा त्यांस
लागेच झोपतांना, निद्रेचा त्यांविना वृथा ध्यास.
घालुनि खार चहाचें करीत वेळींच ते अुषःपान,
जातां बहिर्दिशेला स्वस्थ सवें नेत अिङ्ग्रजी पान[1].
भेटत घरीं सकाळीं वेढुनि ते पायघोळ फरगोल,
काय करावें कपड्यावरुनी करितात लोक जर मोल?
बघतां यांची चर्या स्मरे कुणा भाकरी सजगुऱ्याची
पाण्डुरताहि जिभ्यावर शोभे त्यांतूनि त लव बुऱ्याची.
चोळीत चामलोणी[2] कोठे बाहेर जावया निघतां,
ठेवित खिशामधि फणी, सौन्दर्याची रुचे न हानि अता.
होतीच अङ्गकाठी दगडी स्तम्भासमान देसूरी,
तेणें दिसत अुठूनी कुठेहि साहित्यिकांत ते सूरी.
होती शेतीवाडी देहापरि दाण्डगी अकोळांत,
वाडा मोरगिरीमधि बस्तीच्या[3] जवळ खोल बोळांत.
मग त्यांस नोकरीचें होतें काही तरी प्रयोजन का?
तिजपासून तसूहि त हटति सुशिक्षित सुविप्र, योजन कां?
येअी तसें निमन्त्रण त्यांना तेथील सान दरबारीं,
बहुमान न परि लोकीं कोणाला नोकरी न जर भारी.

---

१ पान = कागद. २ चामलोणी = त्वचेचें खाद्य. ३ बस्ती = जैन-मन्दिर.

याञ्चा करायचीना ? अभिमानाचें कुणा नसो भान,
वनिता लता नि पण्डित–यांस विनाश्रय न मान, शोभा न.
स्थानिक पदवीधर हे, यश न परि स्वगृहांत यत्नाला;
खाणींतून निघाल्याविण भाव न ये जगांत रत्नाला.
विसरुनि अपात्रता निज जाअिल माणूसकीचिया पैल,
त्याचा प्र-यत्न देअी वाळूचे कणहि रगडितां तेल.
लवचिक हवी कटीसह बुद्धिहि करण्यास साधि लटपट ती—
'न लगे व्याकरणाची, न्यायाची घटपटादि खटपट ती.'
जर दास चित्तरञ्जन होअुनि वाढायचा न बडिवार,
यांनी लोक० तिलक कां होअुं नये करुनि तोण्डभडिमार ?
राजा सप्तसहस्त्री, वक्ता पण अेक दशसहस्रांत,
खेळांतहि राजावर अेक्का करितो पहा अहह मात !
बक्त्यांस लोक हटकुनि विविध गणेशोत्सवांत बोलविती,
अन् भाषणप्रवाहीं माना नावेपरीस डोलविती.
व्याख्यानास असत हे मोरगिरींत क्वचित् कधी हजर—
अध्यक्षच व्हाया वा असला वक्ता पुण्याकडील जर.
भाषण म्हणजे लोटे धो धो धो पूर शब्द-पर्यांसें,
जात वहावत गोटे, नाही या वर्णनीं विपर्यास.
मुद्देसूद नसेना, अखण्ड चालेच घोष गम्भीर,
हे प्रहरभरहि बोलत, थकत न परि वाचिवीर खम्बीर.
वैदिक संस्कृतिशी नव सुधारणेची करीत तुलना ते
दावित समन्वयाने अभिमानास्पद पुनीत कुळ-नातें.
वेष गृहस्थितीपरि, वेषापरि चित्त, चित्तवत् भाषा—
किति भव्य अव्यवस्थित ! येण्याची परि पुढे महत्त्वाशा.

पर्या = डोङ्गर–ओढा.

या पण्डितांस वाटे व्याख्यानीं पाहिजेच ती कोटी
आणील हास्यरस जी कानीं पडतां जनांचिया ओठीं.
कोट्या नि शब्दचय नव, ठेवित आधीच ते घडूनि होते;
व्याख्यान तेंच तें पण सच्छ्रोत्यांना तसें न वाटो तें.
हे सदुपसर्ग देअुनि किति नामांना करीत सत्पन्थी,
'सत्' ची कुठे तरी त्या मेन्दूमध्ये असेल सद्ग्रन्थी.
'सिनिक'[1] कशास विदेशी ? मग हे व्युत्पन्न सूचवित 'शुनक';
यांचाच 'शीर्षशिक्षक' शब्द अनुप्रासयुक्त किति सुबक !
व्युत्पत्ति कल्पनेने लावित अन् ग्रन्थ पाहिल्यावीण,
गर्वाने बोले तो ग-ब्रू, टाळी कुणी पिटावी न ?
काव्यहि करीत कष्टुनि, नाना वृत्तांमधे स्फुट श्लोक—
हा कालवध पहातां श्लोकापासून ये अुलट[2] शोक.
पण सङ्ग्रह शब्दांचे स्मृतिच्या पेवांत नीट रिचवाया,
हे श्लोक चोख यांचे जात न, काही म्हणा, मुळिच वाया.
खेळ नको, व्यायामच जिव्हेला बुद्धिलाहि द्या खाचित;
क्लिष्ट, त्रुटित, प्रशाप्रस्फुरित श्लोक हे म्हणुनि रचित.
हें नीतितत्त्व ठेवित चतुष्पदीमाजि वेष्टिलें घट्ट
जणु नागपञ्चमीचें दिण्डच अुकडित भलें गलेलठ्ठ.
होतकरू नवलेखक येअुनि बसतां सुदूर ते विनयें
अुत्तेजक शब्दांना दुथडी येअीच पूर, केवि नये ?
प्रस्तावना लिहाया आग्रह यांना नको असे मोठा,
परि होय लेखकाचा विस्तारें वा विलम्बनें तोटा.
काव्यरसग्रहणाला मायाब्रह्मांस बसत घेअून,
म्हणती सणासुदीला पङ्क्तीला पाहिजेच मेहूण.

---

१ Cynic शुनक. २ क्रौञ्चवध झाला त्या वेळच्या स्थितीच्या अुलट.

भल्लातककल्पच त्या प्रस्तावाला म्हणो कुणी यांच्या
कूष्माण्डपाक अथवा, पुनश्च न करी कधी गुणी याञ्चा.
साहित्यमित्र म्हणुनी होता त्यांचा गुपीत बोभाटा,
ज्योत न परी प्रकाशक, न निखारा, भुसभुशीत फोपाटा!
केव्हाहि जा कपाळीं यांच्या न दिसायची पहा आठी,
येवो कुणिहि, चुलीवर आधण आहेच तें चहासाठी.
ताम्बूलाचें सज्जच निवडक साहित्य, आणि ताम्रमुखी
अुत्पत्ति बैठकीमधि रङ्ग-रसाची करी असून सुकी.
विनयेंच गा सुकविता, कटिवरचा भाग सारखा डोले;
काहीहि वाद माण्डा, हुंहां हुंहां करित ते जसे होले.
कितिही स्तुती करा ती पिअून तिज हे पुन्हा तहानेल,
अम्बाड्याची भाजी पिअून टाकी जसें पहा तेल.
कोठेहि द्या निमन्त्रण सन्मानें हे दिसायचे तेथे
आणि खुळया भावाने हुरळायाचेच सुव्यवस्थेतें.
अडचण साङ्गुनि मागा, देतच काहीतरी, न सन्देह;
बहुश: ऋण न तरे तें, रसातळीं जाय त्यासह स्नेह.
मूर्ख करीना ओरड, बुडव्या शिष्टास कोण अव्हेरी ?
बुडत्याच्या बोम्बांनी बुडव्या परि होय तो अधिक वैरी !
अेकीकडे खरोखर होते वाचाळ हे सभाधीट,
दुसरिकडे मुखदुर्बळ, ये न व्यवहार राखितां नीट.
होते भ्याड विवादीं, म्हणुनिच मर्मघ्न कुशल परिवादीं;
न निघे कधीहि मागुनि विपरीत ग्रह बनेल जरि आधीं.
प्रच्छन्न हानि करुनी अुगवाया बघत आपुला सूड,
धैर्यच कुठे समोरुनि शत्रूवर अुडविण्यास आसूड ?

जरि हे मित्रबुभुक्षित, निटिलीं लिहिली सहाय-हानीच;
यांची मैत्रि-कसोटी केवळ न कठीण पण पहा नीच.
न्याय्यास, यांस वाटे, वाटेवरलाहि चाङ्गलें म्हणतो;
मित्र खरा मित्राच्या अन्यायाचेंहि करि समर्थन तो.

---

## १२ संसारलक्ष्मी

पण्डितराव, असो हें, होते यजमान दोन जायांचे,
यांचें थोर म्हणूनिच कोणी काही वदो, न जायाचें.
झाला विवाह पहिला असतां ते पाचव्या अियत्तेंत,
होती वधू वसु-मती, सुमती नव्हती तरी न नड तेथ.
द्विजकन्या लग्नाविण तशीच राहील तर घडे पाप,
सौभाग्यवती व्हाया विवाहविधिचा पुरा पडे छाप.
परदेशाला जाण्यापूर्वी याया हवी नवीन वधू;
मोहक हवी दिसाया, यावेळीं चालणार ती न अधू.
देअूं केल्या कन्या श्रीमन्तांना पुन्हा कुलीनांहीं,
अडचणच मुळी नाही, यांत न वाटे गुन्हा मुलींनाही.
शिरगुप्पीच्या अेका कुळकर्ण्यांचीच चिमखडी पोर
आली घरांत ‘ लक्ष्मी ’ घालुनि डोक्यांत राखडीबोर.
डॉक्टर परतुनि आल्यावर करि संसारमङ्गलारम्भा,
भोज्येषु होय माता आणिक शयनेषु मेनका-रम्भा.
बहुत दिवस ठेवावें ताम्ब्याचें अुजळल्याविना पात्र,
मातट ताम्बुस तैसा वर्ण तिचा, न म्हणवे तिला रात्र.

त्यांतहि दिसे प्रभावी, तेजस्वी, उन्च, टन्च, धिप्पाड;
लालित्याचे नाजुक पुरवूं जाणे न ती, कधी, लाड.

सोळाहाती लुगडें जड न तिला होय अुरकितां काज,
ती स्तोकनम्र, तीस न खणचोळीची घरीं वृथा लाज.

त्या गोठपाटल्यांचें पिवळेपण पूरणासि साधे तें;
नथ नासिकेसि शोभा जैशी वदनासि नासिका देते. ३२०

सैंपाक करुं शके ती प्रसङ्ग पडल्यास साठ पानांचा,
डौलांत जाय वाढित पङ्क्तीमधुनी पदार्थ मानाचा.

काम स्वतः करी मग सेवक पडुं देत बहु न काम हिला;
महिला अैशी व्हावी आदरणीय गृहास कां, महिला !

येतां मित्र पतीचे समौन वाढील त्यांस पोटभर,
न करील आम्बट चर्या वा दृष्टिहि त्यांचिया समोर वर.

यांच्या घरीं अचानक परोपरीचेहि पाहुणे आले,
तरि हो सर्व यथास्थित, कोणाचेंहि न कुठे अुणें झालें.

होती धार्मिकतेची तिची खरोखर अभेद्य ती कोण्डी,
तुळशीस घातल्याविण पाणी घालायची न ती तोण्डीं. ३२५

करि देखरेख घरभर, सवतीची नीट काळजी घेअी,
बाहेर न पाहे ही घालवि कामांत काळ जी गेहीं.

तें रामदर्शनाला जाणें म्हणणेंच हिण्डणें फिरणें,
साध्या सुधारणेचीं नव्हतीं हृदयीं प्रवेशलीं किरणें.

ती ब्राह्मणाकडूनी करवी कुलधर्म, अेकही न चुके,
सत्तेपुढे शहाण्या पतिचें पाण्डित्य होय दीन मुकें.

दोन मुलें तिज, त्यांचीं दुखणीं खुपणीं स्वतः बघे अुठुनी ?
शिशुसङ्गोपन–चिन्ता पण्डितरावांस मग शिवे कुठुनी ?

नेत्रीं टपोर तिचिया होता तेजस्वि आत्मविश्वास,
न परि मदिरता, टाकी बघुनि जिला पुरुष मधुर निश्वास !
दावी पतीस आदर थोडें बोलुनि, कधी न दापी ती,
यजमानांस तिची पण वाटे मनिं चोरटी सदा भीती.
खन्त मनांत करित कीं अपुली लक्ष्मी न हाय ही विदुषी !
अभिरुचिहि काय ? घाली नाकीं नथ अन् गळां सरी नि ठुशी.
नेसून गोल पातळ न येअि फिरण्यास केवढें न्यून !
( पण सम्मत तिज नव्हतें बसणें टाङ्ग्यामधेहि खेटून. )
नाही निरक्षर परी अगदी वाची न लघुकथा-कविता,
( अिश्शाच म्हणायची ती सुरस असें तीस अमुक दाखवितां. )
यांना रुचे अमरुचें शतक, नि गुणगुणुनि घेत हे ताना,
रसिका जवळ नको का काव्यमधू भरुनि चषक घेतांना ?
लक्ष्मी अशिक्षित अशी समाजभूषण न हो मुळी पण ती;
दिवटी हवी विजेची, स्नेहाची येथ लाविली पणती !
दावूं कुणा सुरस जो अङ्गीं शृङ्गार खेळुनी राही ?
रे दुर्जना विधात्या, कशास हें नीर घेऊं, नीराही ?
वाटे अमूल्य कां तें लाभे कोणाहि जें निरायास ?
दैवें सुधा मिळाली तर वाटे पाहिजे निरा यास.
न रुचे निरा निरामय, आम्बटशोकीस अिष्ट जर शिन्दी ?
जो तेरड्यास भुलला दृष्टि तयाची खिळे न अरविन्दीं.

# १३ हृदयशारदा

विदुषीच्या पतिविषयी विद्वद्वृन्दामधे विशेष चहा,
वाटे सरस्वतीचा सेवक सौभाग्यवन्त अेकच हा.
होतकरू कवि कोणी बनवी पत्नीस म्हणुनि कवियित्री,
घेतां शोध रसिक कुणि—मूर्ति निघे अज्ञ गावढळ भित्री.
अन् विदुषीविषयी जनिं कौतुक कोणास वाटतच नाही ?
कोणा शास्त्रविनोदन-काव्यीं न लगे विदग्धवचनाही ?
तुङ्गा फुल्वर होती वेणुग्रामांत लेखिका कोणी,
होता पति गेलेला टाकोनी तिज अनाथ त्या कोनीं.
त्याच्यामागे शिकुनी झाली ती अेक शिक्षकीण बघा,
आणि वयाच्या अितका पगार अेकोणतीस तिज अवघा.
होत प्रसिद्ध कविता तिच्या ‘ मनोरञ्जना ’मधे मधुर,
सम्पादक तर होते महिलांचे ‘ मित्र ’ चाङ्गले चतुर.
गेल्या पिढींतिल जणू विदुषी, कविता तशीच शालीन;
भाषा प्रौढ घरगुती जरि काव्यगुणें प्रभावशाली न.
डोळ्यांत ही भरे जरि साधारण सावळीच रङ्गाने,
बान्धेसूद नि गोण्डस जणु कमळाची कळीच अङ्गाने.
किञ्चित् नवेपणाची मोहक अत्यन्त टापटीप तिची,
भीति पुन्हा नाही की कुणास पाडील छाप ती मतिची.
नेसे अङ्गासरशी जरी चुणीदार तें तलम लुगडें,
सौष्ठव दिसे जरि कुठे न छचोरपणें शरीर तें अुघडें.
ती ताल-तोल दावित चाले जेव्हा पुढे अलसगमना
परिधानपद्धति गमे सकच्छ तेव्हा सुरेख सुभग मना !

जेव्हा तरङ्गमाला जाय दुभङ्गून नाळ नावेची
तेव्हा शोभा दिसते स्मरण तियेचें कुणा न व्हावेंची ?
वदनाब्ज तें सुकाया नव्हती तिज आच ती प्रपञ्चाची,
पन्चाअीत असे जरि निवडक जिल्ह्यामधील पन्चांची.
ती तुळतुळीत काळ्या केसांना घाटदार दे गाठ,
त्या भव्य भुलभुलावणिमधि काशि रसिकास सापडे वाट ?
नेत्रीं विशाल तिचिया होतें पाणी अथाङ्ग अन् गहिरें,
न विरेल काय साखरखडा जरी राहिले अभङ्ग हिरे ?
नाद निघूनि रहावा कोठें पडसाद जेवि घुटमळुनी,
विलसे तसे स्मित तिचें प्रेक्षकवदनीं, मनींहि दरवळुनी.
‘चुकचुकल्यापरि’ वाटे तेव्हा जीवास अमळ रिझवाया,
कविता रचित बसे ती, छळूं शके मग न काळ तिज वाया.
पण्डितरावांशी या परिचय तो होअुनी नवा, वाढे;
वागत सभय अुभयता कां की काढो कुणी न वाभाडे.
गोष्टी अमेरिकेच्या यांच्या ती कौतुकें करी श्रवण;
स्फूर्तिमुळें मग कल्पित होअी सत्यांत सहज मिश्र पण.
सम्भाषणींच त्यांना लाभे स्वप्नाळु माधुरी अविट—
युवक प्रेमिक होते हे नव्हते कामसाधु धीट विट.;
पोकळ गप्पांपुरता त्यांचा जरि होय अुघड अेकान्त
गूढप्रसाद द्यावा सन्तमहन्तहि न हे, न हे कान्त.
ती गोड तोण्ड-ओळख होती अद्यापि दूर दूर अशी,
‘सीमोलङ्घन’ केल्या वाचुनि शमणार हूरहूर कशी ?

# १४ शास्त्रिबुवांचा खो

मोरास काय वाटे पडतां दृष्टीस आपुले पाय ?
पत्नीस बघुनि न कसें नकुलमन कधी तरी अुले हाय ?
तगमगतें अन्तर तरि बाह्यात्कारीं हसूनि जग जगतें,
ज्या त्या वेळीं जें तें सेवायाचें न तर कधी मग तें ?
कोठे हरित् तृणाङ्गण शीतल तेजांत नाच नाचाया ?
असलें छप्पर तरि कधि वेलींचीही हवीच ना छाया ?
म्हणति घराबाहेर स्त्रियांस लागेच ना कुणी स्नेही;
पण पुरुषाला न रुचे घेणें अपुल्यास डाम्बुनी गेहीं.
बोलाया चालाया स्वतन्त्र कोणास का नको प्रमदा ?
तीन् तीच अेक पत्नी होअी न कधीच काय हो श्रमदा ?
तुङ्गा शास्त्रिबुवांना स्थानिक सम्मेलनाचियामध्ये
दिसतांच झिङ्गुनी ते गेले डोळ्यांतल्या तिच्या मद्यें.
त्यांनी तिज दाखविलें स्वीय पिढीजात पक्कपाण्डित्य,
मावळणार का न बुध येतां अुदयास वाग्भटादित्य ?
नव पाण्डित्यपतङ्गापुढती तें पद्मपुण्डरीक पहा
विकसे की हे म्हणत श्लोक कसे घडघडा सटीक अहा !
गोष्टी पतञ्जलीच्या, योगाच्या, भोजकालिदासांच्या,
अमरु-जगन्नाथांच्या, सरस किती भामिनीविलासांच्या !
शाळेमधलें संस्कृत कुठलें शास्त्रीय ? काय तें खोल ?
गाणें बघा गुरुमुखी सन्थेवाचूनि व्हायचें फोल.
श्रीधरशास्त्री पाठक, अभ्यङ्कर वासुदेवशास्त्री वा
दुर्मिळ ! परम्परेची गेली भङ्गूनिया अता ग्रीवा.
सुचवीत की स्वतःला ज्ञान मिळे स्वगृहीं परम्परया—
अुदरम्भरच अता पण शिक्षक शाळांमधूनि शम्भर या !

आणिक अमेरिकेचा डाक्तर तर शुद्ध तोतयेबण्ड,
भक्षुनि तिकडिल वारें द्रुम म्हणुनी वर चढोत अेरण्ड.
बोलत शास्त्रिबुवा, ‘ हा चकवी, चकतात आणखी लोक;
‘गङ्गालहरी’ मधला लावुनि चल अेक दाव की श्लोक.’
या भडिमारें पडले डाक्तर तत्काळ चीत निपचीत,
सुविनीत ते, न तोण्डीं लागत जरि शास्त्रि त्यांस डिवचीत.
छोटी नाळ[1] नसे ती, ती तर रणरागिणी महाकाली,
लोटाङ्गण तिजपुढती मूकस्तम्भ क्षणीं न कां घाली ?
शास्त्रिबुवाच कशाला ? कुणीहि जिङ्कावया शके स्थळ तें,
वळतें सहज स्त्रीमन, निर्मळ जणु आरसाच केवळ तें.
शास्त्रिबुवांविषयी मग अधिकच माहात्म्य तीस वाटावें,
विपरीत रीत आहे प्रीतीची हें न का कुणा ठावें ?
झाली प्रियशिष्या ती, झाले गुरुदेव ते नकुलशास्त्री;
दिसतां समर्थ गुणि नर खचितचि ती व्हायची गुणवशा स्त्री.
कविता तिच्या सुधारुनि धाडित साभार ते तिला परत,
पुसतहि अर्धविनोदें, गातां जोगीच कां विलाप-रत ?
पूर्ण करित पत्रांतुनि परस्परांच्या तदा समस्यांतें,
साधेच वयस्यांतें पुसटपणें कळविणें रहस्यांतें.
होतीच कल्पनामय चमत्कृतींची विशेष ती भोक्ती,
शास्त्रिबुवांना साधत नव्हती अन् अेक ती स्वभावोक्ती.
भाषा शुद्ध लिहित हे, व्याकरणावर अथाङ्ग निष्ठा ती,
मानित कल्पकतेला प्रदेशिनी, भावना कनिष्ठा ती.

---

१ नाळ = तोफ. हा शब्द गोव्याकडे अत्यन्त प्रचलित आहे.

पत्नांतुनी करित हे विद्वत्तामय अजीर्ण रसचर्चा,
कधि साङ्गत बेताने कागाळ्याही अवर्ण्य त्या घरच्या.
अुत्पन्न हळुच होअी तुङ्गाहृदयीं सहानुभूति नवी,
ही काय संशयास्पद ? अलभ्य म्हणुनीच नीच जन हिणवी.
सहानुभूति स्त्रीची पुरुषाला का अमान्य करवेल ?
दूर न लोटी तरुवर दे घे आश्रय वदान्य जर वेल.
‘ संस्करणास तशांतुनि खचितचि किति पात्र ही मनोभूमी !
कां सम्यग्ज्ञानाचें, ’ वदले, ‘ नच दिव्य बीज रोवूं मी ? ’
सङ्केश्वरास जातों श्रीतें भेटायला म्हणुनि पुढती,
वेणुग्रामच गाठित की हृदयश्री तियेच कुणि सुदती.
चाले तिथे स्मितांची, शब्दांची देवघेव सुन्दर ती,
सौख्य अनिर्वचनीयच करितां हृदयांस बद्ध धुन्द रती.
मन्द नसे गतिने तो असला जरि कुसुमचापधर अन्ध,
घरबन्ध कोठला मग झाल्यावर अेकदा अ-घर-बन्ध ?
तितके प्रसिद्ध नव्हते, न बघे निरखुनि कुणीहि शीलातें,
शास्त्रिबुवा यायोगें होते पिळ देअुनी मिशीला ते.
जे ब्रह्मचर्य अवघड सहवासात्मकहि पाळिती जगतीं,
त्यांची मुक्ति सदाची ! जाची त्यांतें मुळी न कर्मगती.

## १५ अेकाक्षर-माहात्म्य

चित्त न फसुनि पडे स्त्रीस्वाभाविक सुभगतेमधे त्यांचें—
वज्राहुनी कठिण तें अन्तर नसतें अुगीच जेत्यांचें.
होय महत्त्वाकाङ्क्षा राळज्वालेसमान न क्षणिक,
अधिक जिवाचा भडका हाय! करी ही प्रतिक्षणागणिक.
भाषान्तरिला त्यांनी ‘ वृत्तालङ्कार ’ मागला ग्रन्थ,
लौकिक विद्वानांमधि मग त्यांचा वाढुं लागला सन्थ.
नव्हते अजूनि झाले गर्ग्री माध्यान्ह अर्क, टीकास्त्री;
लोक म्हणत, ‘ हे दिसती रसज्ञ विद्वान्, न तर्कटी शास्त्री ’!
जात असोत कुठेही असतच काखेंत पुस्तकें लठ्ठ,
आरोप त्यामुळे तो विद्वत्तेचा ठरूं शके घट्ट.
यापरि शास्त्रिपदाचा, पदवीचाही तयां घडे लाहो,
त्यांस गमे, तें कोठे ज्याविण माणुस पडे कडेला हो ?
प्रो०[1] असुनी अेकाक्षर साक्षर गणितात सारसर्वस्व,
सन्मानमापनामधि दिसतें त्याचेंच फार वर्चस्व.
प्रो० हें अक्षर मिळतां घेअी अग्रेसरत्व मास्तरकी,
होअी प्रतिष्ठित जशी श्रीमन्ती जंव मिळे तिला ‘सर’-की.
शिक्षक बान्धो वाडे करुनी शालेय पाठकामाठी;
मत्सरितो अनिकेत प्रो. ला तो याच अक्षरासाठी.
कष्टोत अर्धपोटी, त्यागी शिक्षक तयां वदे कोण ?
स्वार्थत्यागी बानिति लोक परी प्रो. प्रभाव देखोन.
प्रो.हुनि अुणा बृहस्पति त्याला सेवा जधी न कॉलेजीं;
भ्याड मुके परि सत्ता-शब्दें वाचाळ धीट झाले जी.

---

१ प्रो० हा ‘प्रोप्रायटर’ (=धनी) या शब्दाचा सङ्क्षेप नव्हे.

तें अेकाक्षर कोठे, होय परब्रह्म जें, सुखस्वर्ग ?
अर्थात् लाभ विशिष्ट न, केवळ नावास शिष्ट अुपसर्ग !

---

## १६ चिवटे

पण्डितराव अुतरले तुङ्गा फुल्वरीच्या मनामधुनी—
हा हा ! दुरावली ना निमिषीं दिव्याभिराम कामधुनी ?
नेली काकें मुक्ता केला मग कलकलाट बदकाने,
गेलें लोणी, ताकहि, शमव अता जीवदाह अुदकाने.
मग डाक्तरांस अुरला स्नेही जो घे सदैव जोडून,
सोडायचा न तो जरि गेलें मित्रास दैव सोडून.
शेषो विठ्ठल चिवटे होता माणूस मन्दमति अेक,
तो मध्यमक्रमी, करि कविता रचितां अखण्ड अतिरेक.
होअूनि तो मराठी अन्त्य परीक्षा कशी बशी पास
अन् कारकून, वदला, 'चिन्ता पुढिल न मशी, नशीबास.'
मोडी अक्षर त्याचें की मोत्यांच्या मनोज्ञ त्या माला,
न प्रौढबोधहि अता, तेव्हा येणार काय कामाला ?
होता पगार थोडा, गादीखाली जमेच ना भत्ता,
कागद समजविण्याची वापरतां ये न त्यांजला सत्ता.
जेथे जो तो पाहे भरावया तुम्बडी तुडुम्ब निज,
तेथे पडे रिकामा ठरतो शम्भु स्वयम्भु तो खनिज.
जरि कारकून नेसत धोतर बकशुभ्र तलम परिटघडी,
घालीत शर्ट रेशमि, कोट निळा अून, अन् शिरीं पगडी,
ती श्रीमन्ती यास न; विटकी पगडी, वरी सुतें निघत,
जड कोट घेतलेला बाजारांतुनि जुन्या कुठे विकत.

या वेषांत सुखाने कारकुनी करित मान मोडूनी,
कुणि ‘ माझेंहि करा हो, ’ म्हणतां टाकित न त्यास तोडूनी.
सहसेवकांमधे हो व्यक्ति अशी जरि सदैव आवडती,
कड ती परी न घे कुणि मिळवुनि द्यायास तीजला बढती.
होतीं घरांत दोघें—पन्त नि त्यांची वडील भावजय;
दारिद्र्यावर मिळवी सहकार्याचा अिथे प्रभाव जय.
नव्हतें कुणी जवळचें गङ्गाभागीरथीस माहेरीं,
हेरी जग परि भलता यांचा सम्बन्ध आंत बाहेरी.
अम्बाक्कांच्या वरुनी टवाळ जग दे तयांस नाम नवें,
‘ अम्बादास नियोगी ’ समक्ष अर्थात् न तें कुणा म्हणवें.
कवि अविवाहित अैसा चिडखोर न कां बरें ? न कां लहरी ?
संसारीहि जन अशा सन्तोषाने त्वरें न काल हरी !
श्री न जयाच्या हातीं त्या स्त्री सौभाग्यकाङ्क्षिणी कुठली ?
जो पति नसे कुणाचा त्याची लोकांत पत झणी फुटली !
पुरुषार्थ काय ? पैका. काव्यीं मिळवाल सावधान यश
तरि ‘ शारदा गुणें ’ कुणि होअीना ‘ भावना प्रधान ’ वश.
अैकूनि पन्तपद्यें अम्बाक्का परि करीत कौतुक तें,
सुकतें ज्याविण कविमन असलें जरि कितिहि विकसनोन्मुख तें.
त्यांना कधी न वाटे की अपुल्या घरिं कुणीच येअुं नये,
हातावरची भाकर साग्रह वाढित अुदार त्या हृदयें.
मङ्गलकार्याला ते जात न, जरि म्हणत ‘ सुखभरें नान्दा ’;
परि पोचविण्या जातच ऋणमुक्तेश्वरिं[1] नि देत ते खान्दा.

---

1 मोरगिरीच्या स्मशानघाटावरील देअूळ.

न चुकत नमन कराया भेटे जर त्यां कुठे पथिं प्रेत;
का अभिनन्दन त्यांच्या होतें त्यां वन्दनीं अभिप्रेत ?

यांच्या घरीं दरिद्री येत कवी किति नवीन होतकरू,
'काव्ययशोधन-शोधन' बोलत, 'या धाडसें अलोट करूं !'
चुकला कवि तो यांच्या घरींच भेटायचा, विकल्प नसे,
चुकलें गुरूं जसें तें धामापुरच्या[1] तळ्यावरी गवसे.
पन्त स्वकाव्यतट्टू बान्धुनि ठेवित, नको टवाळी ते;
मिरवोत, धाडशी जे, अपुल्या घोड्यांस कोतवाली ते.

जरि कुणि बळी अवेळीं चऱ्हाट बेसूर घेअुनी ताना,
तरि पन्त डोलवीतच थकल्यावाचूनि रङ्गुनी माना.
त्यास चहा ताम्बडसर देत सुपारी स्वतःच कातरुनी,
बोलत ते बेताने आणि मुळुमुळू प्रसन्न मुख करुनी.
कोणाच्या कवितेला त्यांनी म्हटलें कधी न वाईट,
धीट न अुपदेशाया, 'शुद्ध लिहा, सरसता नवाअींत !'
कवि मग त्यांच्याविषयी म्हणत, 'किती रसिक, शुद्ध सज्जन ते!'
कारण अुघडपणाने जायाला कधि विरुद्ध सज्ज न ते.
स्मृतिदिन, कवितागायन, काव्यविवेचन कुठे असो, पन्त
असतच अुपस्थित तिथे स्वस्थ सुपारी करीत रोमन्थ.

कविता लिहिल्यावाचुनि जाअी त्यांची कधी न रात्र सुनी,
घालीत येरझारा रचित, पुढे लिहित खालती बसुनी.
लिहिल्या ओव्या, आर्या, सुवृत्त श्लोक, मग पदें थोडी,
गोडी नसे, जरि कुणा काढाया ये न त्यांमधे खोडी.

---

१ रत्नागिरी जिल्ह्यांत धामापूरचें तळें नि त्यावरून आपोआप निर्माण झालेली ही म्हण दोन्हीहि सुप्रसिद्ध आहेत.

विहित विवाहोत्तर तो जैसा शृङ्गार नेटका सपक,
तैसें काव्य तयांचें, त्याची लागेल मग कुणा चटक ?
शिष्ट कवींपरि दुसऱ्या करितां संस्कृत कवींस हे अुलथे
अुच्छिष्टपुष्ट ठरले, दैव कुणाचें सदा असें अुलटें!
जी जी पर नवलाची आली, गमलें रुचेल जनतेला
ती ती गिरवायाचा प्रयत्न काढूनि वेळ पण केला.
ऋतुवर्णनें लिहूनी, रचिली कविताहि अैतिहासिक ती,
'गीताञ्जलि' अनुवादुनि नीट रचाया सुनीत ते शिकती.
ब्रह्मांत शून्यशोधन करुनी ते रचित 'चित्सुखादर्श,'
पद्यींच घेत परिसा पतिता-पण्याङ्गना-परामर्श.
कुठली तरी विदेशी चित्रें पाहुनि अनङ्गरङ्गीत
रचित शृङ्गाराचें मादकभावप्रसङ्गसङ्गीत.
कुणबाअू बोलींतहि लिहिलें घेअूनि विषय खेडवळ
यांस न लाधे भलेरी, वाटे न कुणास त्यामधे नवल.
हे कविमण्डळ काढित, होते त्यांचे किती अहो स्नेही,
भोक्ताच न परि यांच्या काव्याला मण्डळांत कोठेही.
यांनीं न टाकिलें परि तोण्डुनि भवतील मित्रमण्डळ तें,
काव्य नवीन तयांचें वाटे जरि यांस जणु कवण्डळ तें.
जन्मांत याच यांना समानधर्मा न परि भला गवसे,
पूरक परस्परांतें, म्हणुनिच दोघांत भावभाग वसे.

---

१ भलरी हा मराठी शब्द हिन्दी बलिहारी नि खान्देशी बल्हारी ( भरभराट, धन्य ) यांचा सहोदर असावा.

## १७ पन्त आणि पण्डितराव

टाकधनी हे चिवटे, क्षेत्रधनी पण पहा ढिसाळ बडे;
पदवी न यांस, डाक्तर-कीचा अभिमान त्यां विशाळ जडे.
दुर्लक्षेंहि निरोगी हे शेलाटे, चिव्यापरी चिवट;
ते देहाची चिन्ता वहात की तो प्रशस्त जेवि वट.
हे स्निग्ध तूप नसुनिहि, रूक्षच ते सेवुनीहि लोणकढें;
हे किडकिडीत तर ते स्थूल, जनीं वजन का म्हणोन पडे ?
मूक सभास्थानीं हे तर ते दुर्दम्य शब्दवेल्हाळ;
हे काव्याळ खरोखर, त्यांच्यावर मात्र घेववे आळ.
हे टाकीत उसासे कवितेविण रात्र गेलियास सुनी;
निर्घोर घोरतच ते दूर जरी विहरली प्रिया हसुनी.
जीर्णच शब्दांची हे चटशी विणण्यास बसत सायास;
अभिनव शब्द घडित ते, आणि यशोलाभ नच तसा यांस.
हे काव्यशेवशीला म्हणत, कुणा दूर लोटवे क्लिष्ट ?
तर ते म्हणत कलियुगीं ऱ्हस्वतम श्लोक-बोटवे शिष्ट.
हे आदरेंच वागत कच्च्यांशीं तेवि जेवि पक्क्यांशीं,
ते स्थळ देत बघोनी कुणा कडेला, कुणास तक्क्याशी.
हे जात जेथ तेथे मित्रांचा भोवती जमे रङ्ग;
तर ते प्रभावळीच्या होते शोधांत सम्भ्रमें दङ्ग.
पदवी नसुनिहि चिवटे होते कविमण्डळांत अध्यक्ष,
ते जळफळत मनीं पण वरपाङ्गी दाखवीत दुर्लक्ष.
अन्तर बघतां होते दोघे आकाश आणि पाताळ,
शक्य परी हो त्यांचें अधिकगुणें सख्य परि न लाथाळ.
व्यसनांत अेक पडले होते दोघेहि हें पहा गूज—
साहित्यिक न कुणीही त्या दोघांची करावया बूज.

## १८ शास्त्रिबुवांचें स्थलान्तर

मोरगिरीमधि ठरली दङ्गल साहित्यबल्लवांची ती,
शोभविती नृपवाग्गज परस्परांना म्हणूनि वाञ्छीती.
पण्डितराव पळाले होउनि अस्वस्थ कां असे दूर ?
ओळखुनी कीं न कुणी थापी तन्मस्तकास शेन्दूर.
'कोठे अहो अमुक ते ? केलें आताच हें कुठे जाणें ? '
रुचतें कुणा तळपणें अैशा प्रश्नीं परोक्ष तेजाने.
अडुनि परी राहिल का कोणाकरितांहि तो समारम्भ ?
मण्डप सहस्त्रखाम्बी न कोसळे अेक अुलथतां स्तम्भ.
वाग्भट अहो महोदयपर्वी जाती नृपकृपातीर्थी;
शास्त्रिबुवांसहि वाटे साधूं या अर्थ आणखी कीर्ती.
' केल्याने देशाटन, पण्डितमैत्री, सभेंत सञ्चार '
चातुर्य न ये केवळ, जाअी होअूनि सार्थ संसार.
परि रिक्तपाणि जाणें विहित न, बसले रचीत पोवाडा,
कुञ्जकुटीर न, होता किति चौकांचा अफाट तो वाडा !
येअूनि सूत्रधारापरि मिरवत सारखे परिषदेंत,
वक्तृत्वाची शिक्षा सभेस, समितीस ते अनिश देत.
'हे कोण हो ? ' म्हणूनी पृच्छा ये सर्वलोकजिव्हाग्रीं,
ज्याची त्याची दृष्टी कां न खिळावी अशा गर्जी व्याघ्रीं ?
आले धडाडिने ते बसले अुचासनीं जनांपुढती,
येणार केंवि पुढती कष्टत जे कोपऱ्यामधे कुढती ?
त्यांतुनि शास्त्रिबुवांनी दिधलें व्याख्यान आङ्ग्ल भाषेंत;
देशांत आङ्ग्लभाषाप्रभु 'जयकर' का अनेक आहेत ?
व्याख्यान अिङ्ग्रजी तें चहूकडे पहा दुमदुमे गांवीं,
गावीं स्तोत्रें किति मग अज्ञजनीं पात्रता महागावी.

जरि राजांना तिकडे ‘ मौर्यमयूर ’ न समस्त अैकवला,
श्रीमन्त परि दयामृतघन वळला तो कवीकडे, द्रवला.
म्हणजे ‘ बरें! ’ म्हणूनी रुपये पन्नास देत सर्कार,
शिष्टाचार कवीला वाटे पण काव्यगुणपुरस्कार.
राजांना कुणि सुचवी ये घरिं चालून मौर्यमौरजिक,
होअील थोर पिक हा, काय वसन्तास पाहिजे अधिक ?
आश्रय देतच त्यांना प्रसिद्ध जे निज कलाविलासांनी,
कविचीच वाण होती, होती सानेबुवा, अिलासैानी.
गेले अुपेक्षिले तों स्थानिक कविभाट तें अहा शल्य !
वाटे व्यर्थ विदेशी वस्तूविषयी विशेष वात्सल्य !
सेवेकरी जहाले शास्त्रिबुवा स्वामिनिष्ठ मोऱ्यांचे,
कारण दुजें कशाला वर्तन करण्यास शिष्ट तोऱ्याचें ?
मग सम्भुजी घबाडे यांचा आले निरोप घेअून,
सहशिक्षकीं दिलेलें आनन्दें गोडधोड जेअून.
संस्कृत शिक्षक म्हणुनी आले, लोटे न अेक जों वर्ष,
खपले वरिष्ठ तों, हे चढले वर, काय जीवनोत्कर्ष !
डाक्तर ढिसाळ होते या स्थानास्तव जरी अुमेद्वार
तरि बढतिचें खुलें हो शास्त्रिबुवांच्याच साअुमें द्वार.

---

१ अिला हें ‘ यल्ली ’ चें संस्कृतीकरण दिसतें. २ साअुमें = समोर.

## १९ मोरगिरी

काव्यांत रम्य नाटक, हिन्दुस्थानांत राज्य मोऱ्यांचें;
राज्यीं मोरगिरि जसें शाकुन्तल नाटकांत तोऱ्याचें;
हा राजवंश त्यांतिल अङ्क जसा नाटकांतला चवथा,
श्लोक चतुष्टय त्यांतिल राजकुटुम्बच, बघाच वास्तवता !
शोभे मोरगिरीचें घाटावरती लहानसें राज्य,
सान सुभाषितवत् तें अर्थमहत्त्वें पहा नसे त्याज्य.
तेविच निसर्गसुन्दर—डोङ्गर, रानें, नद्या, मळे, माळ—
अिकडे अूसतमाखूज्वारी, तिकडे पिके जिरेसाळ.
कोठे ताम्बडमाती, काथवडीपरि कुठे पहा प्रान्त;
हिरव्या मळ्यांमधूनी पाटापरि वाहती नद्या शान्त.
टुमदार राजधानी, नव्हतें अगदीच गाव केवळ तें,
देती डोङ्गरपाणी गायमुखाहूनि बान्धिले नळ ते.
बारा हुडे तटाचे अभङ्ग अद्यापि जन पहातात,
देश चहूबाजूचा ये ठेवाया अिथून हातांत.
अन् चार गोमुखीपरि वक्र दुहेरी तटामधे वेशी,
आदरणीय जहाल्या येअूनी दीर्घकाल सेवेशी.
मल्लागिरी तो जवळच दुर्गम ज्याच्यावरी जुनाट गढी,
मोरगिरीचें रक्षण दाखविती त्या पहा खुणा दगडीं.
वाहे वत्सल गङ्गा अर्ध्या गावास घेअुनी पोटीं,
राहे गिर्मी अखण्डित माया पातळ, म्हणो कुणी, खोटी.
सार्वजनिक जें ठाणें घाण करावी तिथे मनःपूत,
स्वातन्त्र्यभावना ही दिसली अितरत्र जरि अनस्यूत,
बालवयीं राजांच्या येथे अिङ्ग्रेज कारभाऱ्याने,
केलें साक्षेपाने घाणीला शीव-पार माऱ्याने.

अिङ्ग्रेज कारभारी, आणि महाराज बाल संस्थानीं !
का धन्यवाद द्यावा मग न सुराज्यास त्या समस्तांनी ?
बोळांतुनीहि हिण्डा, अकाण्डगङ्गावतरण-भीति नसे,
ये दण्डकें विमलता भूवर ती जी शरन्नभीं विलसे.
गृहिणींस योग न अिथे दाराशी अेक खाम्ब होण्याचा,
पारोशा चर्येने बघण्याचा काय ? कळस सोन्याचा !
गावांत राममन्दिर होतें तेथे पुराणकालींचें,
तुळशीबागेपरि तें नव्हतें बजबजपुरी-बकालीचें.
ती शुचि शान्त रुचिरता हृदयीं अुपजवि पवित्र सद्भाव,
वगळूनि मूर्तिभञ्जक नव्हता तेथे कुणास अटकाव.
रुन्द प्रशस्त सडका, झगमग गुजरींत रौप्य मालाची,
अन् भव्य मण्डअीमधि दाटी जाअूनि पहा हमालांची.
चालति चहागृहें किति, शिम्प्यांचींही किती दुकानें ती !
किति वकिल, केशकर्तक ! परि वदवे न स्थिती मुखाने ती.
वस्ती सुखवस्तूंची होअी आता नवीन पैलाड,
विद्युत्प्रकाश फाके, पैक्याविण पुरवती न पैं लाड.
सोय-सुरक्षितता ये, व्यापाराचें लगेच केन्द्र घडे,
आणि वणिग्-श्रीमन्तांहून न्यूनच तिथे नरेन्द्र पडे.

## २० राजे मोरे

बहु राजे 'लक्ष्मीधर' असती जे चरक रङ्क रयतेचे,
राजे श्रीमन्तांचे, 'धैर्यधरच' मेघ हे सदयतेचे.
सम्पत्ति विलासवती कोणाची देखणी किती असली,
फसली न ती परि, न ती श्रीमन्ताच्या मनींगृहीं ठसली.
श्रीमन्त राव मोरे होते मोठे गुणी गुणग्राही,
त्यांच्याविषयीं अैकूं स्तुति ये न तिच्या बुडीं अुबग राही.
रानांत नेम धरुनी पाडित वाघास हे पटाअीत;
अबलांच्या मृगयेची चटक समर्थास या न माहीत.
राखीव सावजें तीं यांची न करीत ओस शेतीस,
मोटार हाकतांना तोडित तासास कोस हे तीस.
टेनीस वा क्रिकेटहि खेळत सावेश हातघाअीने;
चकत प्रतिपक्षी मग राजांच्या ललित कारवाअीने.
अिङ्ग्रेजी पद्धतिचा करीत साधाच रेशमी वेश;
हनुवर आणिक ओठीं दिसावयाचा न लेशही केश.
ते घेत रामदर्शन नेमें असल्यास राजधानींत,
होते सुधारक परी प्रभुसेवेची न लाज मानीत.
ते अिङ्ग्रजी मराठी बोलत दोन्हीहि शुद्ध अस्खलित;
आलेख्य-वास्तु यांविण गम्य न त्यांना दुजा कला ललित.
अुत्पन्न वाढवीलें होतें वडिलीं बरेंच [1]शेरीचें,
पाळित परी स्वत: हे केलेले कायदे कचेरीचे.
तप तप तुम्बविण्याची कामें राजांस नच रुचे रीत,
प्रतिदिन घडि दों घडि तरि करीत हे काम अन् कचेरींत.

---

१ शेरी = राजाच्या वैयक्तिक खर्चाच्या व्यवस्थेसाठीं तोडून दिलेली शेतीवाडी.

बहु करित खर्च घालुनि दिल्लीसिमल्यास हे सतत खेटे;
संस्थानाचा अपुला दर्जा चढवावया झटत नेटें.

आणि महायुद्धींही होते फ्रान्सांत चार हे वर्षे,
झाले अधिक सुसंस्कृत आन्तरराष्ट्रीयसङ्घसङ्घर्षें.

प्राचीन भोसल्यांशी असलेलें हाडवैर विस्मरुनी,
यांनी सोयरिकीनें केलें शाण्णव-कुळींस नित्य ऋणी.

संस्थानांत नसे त्या कवण परीचीहि ती कुठे वेठ,
यद्यपि अधिकाऱ्यांच्या बेम्बीचा यामुळे दुखे देठ.

जनपदहितकर असतां राज्यव्यवहार भाज्य संस्थानीं,
म्हणणार कोण हो मग पुरे अता हें स्वराज्य अस्थानीं !

अत्यन्त मानवोनी स्थानिक संस्थांस तेथलें पाणी,
आवश्यकता न उरे सजवायाची सफेत लेपांनी.

होते वाहत सन्तत सुधारणेचें चहूकडे वारें;
'देवा रे !' ते विव्हळत ज्यांचे भङ्गूनि जात देव्हारे.

फिरला साधुमठांवर नाङ्गर तेथे सडे निरुद्योग,
हाय बुवापूजेचा हिन्दुसमाजीं जडे महारोग !

परि या पैक्यामधुनी शिक्षण नगरांत फुकट सक्तीचें
करुनी दिव्य स्मारक दावित राजे स्वधर्मभक्तीचें.

राजांमधे सुधारक दुर्मिळ ओजस्वि कडक हिन्दू ते,
मानीच ना जयांची दृष्टि अनुल्लङ्घ्य अटक सिन्धूतें.

स्थिति ती दिसे निराळी जेथे अधिकार दुर्मदासि बघा—
राजगृहीं दिवाळी आणि जनांच्या गृहीं सदा शिमगा !

स्वातन्त्र्य पूर्ण येथे वेशीवर टाङ्गण्यास गाऱ्हाणीं,
म्हणुनी सुधारणा ती होतच राही बहु प्रकारांनीं.

कीं वृत्तपत्र येथे चाले नियमित ‘ सुपर्ण ’ नावाचें,
वांचे प्रजाप्रिय जरी न करी नृपचाटुवर्णना वाचे !
हाकाटी या देशीं होअी क्वचितच नि फार बेताची,
खावो शान्तपणें जर कुम्पण खाअील कडच शेताची.
असती हिन्दुस्थानीं सोशिक अत्यन्त राजनिष्ठ जन;
बहुसङ्ख्य मूक असती, अन् चाले बोलक्या जनीं भजन.
राजे प्रजेस साङ्गत, ‘ मालक नच मी परन्तु पालक मी !
जन हो तुम्ही कृतज्ञच, तुम्हीहि माझें कसें कराल कमी ? ’
या राजांची सत्ता गमेल कोणास कोयनेलगुटी ?
गुळवेलसत्त्व अथवा अभ्रक कोणा नको सहस्रपुटी ?

## २१ राणी राजे

राणीराजे होत्या सुन्दर, कर्तव्यपालनीं दक्ष,
होत सभांस अुपस्थित, शिशुसप्ताहांत होत अध्यक्ष.
देत जनांना दर्शन, अदर्शन स्वप्रजाजनीं कां हो ?
राजे अिथे सुधारक, विरुद्ध करणार कोण टीका हो ?
त्या जात नित सकाळीं घोड्यावरुनी दुरी रपेटीला,
आणित बोलावूनी महाजनांना विचारभेटीला.
प्रासादांत अहा त्या लाभे प्रेमप्रसाद दोघांस,
भरवीत अेकमेकां ते घालुनि मधुर साद तो घास.
दोन्ही मुलें तयांची विद्यार्थ्यांच्या समेत तेथील
शाळेंत जात, रुचतें समानतेचें प्रजेस तें शील.
होतीं मुलें सुसंस्कृत, सहृदय, अत्यन्त ठेपराअीचीं—
ती वर्तणूक त्यांची सर्वांशी सारख्या भलाअीची.

## २२ रावसाहेब नकुलराव

नृपदेशकाल पाहुनि वेश करावा, जपूनि वागावें,
अुपदेशसूत्र का हें लागे शास्त्रीबुवांस साङ्गावें ?
बैसे परिस्थितीची अधिक अुणी नच कुणावरी पकड ?
न फिरे परिस्थितीने म्हणा विदेही तयास वा दगड.
वेशप्रगति करित हे हळुहळु, लागो न ठेच अेकदम,
टाकित नेमस्तांपरि आस्ते शिस्तीमधेच ते कदम.
धुरकट नव्या परीचीं झालीं डोळ्यांवरी खडीं भिङ्गें;
अुपनेत्रांतुनि त्या ते बघत दुज्यांचीं कुलङ्गडीं बिङ्गें.
माथे-रान अता ते ठेवित कापीव हिरवळीवाणी,
शीर्षत्वचा करी कीं क्षुरधारेच्या विरुद्ध गाऱ्हाणीं.
पञ्चाङ्ग ते पहात न आता अपुली करावया दाढी;
आन्हिक विधि स्वताचा, मुहूर्त मग कोण त्याजला काढी ?
साङ्क्षिप्त हो शिखेसह गन्ध; न डोक्यास कापडी चक्र,
रुमाल तर जरिकाठी, मधे पुढे चोच फाकडी वक्र.
डगल्यावरिल अुपरणें न ठरे अजुनी निरर्थ शेपूट;
धोतर पाण्ढरकाठी, मोजे काळे, चकाकते बूट.
थण्डींत वा सकाळीं शनिवारीं पाटलोण लोकरिची—
ठेवायला प्रतिष्ठा कोण न पाही झटोत नोकरिची ?
पूर्वी न काढिल्या जरि यांनी केव्हाहि बैठका, दण्ड;
जरि खेळांस विदेशी मानित हे स्त्रैण अैट, पाखण्ड.
क्रीडाङ्गणीं तरि अता येत, रहायास खास-मर्जीत
आचार्य खेळ झारा तेथ पहा आसपास परजीत.
अुघड्या डोक्याने हे खेळत असतां दिसे कशी शेण्डी ?
वाराहपुच्छ अथवा गमे अलाबूस चिकटली भेण्डी.

नाव तयांचें आता पाटीवर 'नकुलराव कुळकर्णी;'
शास्त्रिबुवा कुणि म्हणतां लागे अभिधान तें कटुल कर्णी.
होते हे अधिकारी, लोक सदा म्हणत 'रावसाहेब',
पदवी अशी न मानिति ते जे म्हणविति परि स्वतः 'दे. भ.'
'रा. भ.'[1] खरे हे यांना आशा, होअिल पुढे खरें लाभ,
नावामागे छापुनि निघतिल मग सहज अक्षरें 'रा. ब.'[2]

---

## २३ शैक्षणिक कामगिरी

कामामधे पडावी अनुभव नाही म्हणून कां ढील ?
मागील सूचना त्या बघुनि पुढिल कारकून काढील.
होता हाताखाली पदवीधर तज्ज्ञ तो करी साह्य;
काम स्वतः करित हे वरिष्ठ, सन्मान्य, नोकरीबाह्य.
हे शिक्षकांकडूनी जाणत घ्यावें कसें कुठे काम,
तिकडे राबत ते पण अिकडे यांच्या मुखीं फुटे घाम.
निढळाच्या घामावर या बढती मिळविणेंहि यांस जुळे;
सहकारींच चढूनी तकतकती अुन्च केवि बाण्डगुळें !
निज कष्टेंच जगे तो जीवनकलहामधे कसा वांचे ?
आहे जगत् कलियुगीं अकर्म-फलधाम अेक सावाचें.
होते बहुश्रुतच हे, मारित वर्गांत पण्डिती गप्पा;
काही करा, करुं नका, मुलें स्वकष्टेंच गाठिती टप्पा.
शिस्तींत खुश पोरें ठेवाया करित युक्ति परि नामी,
औदार्य दाखवित ते ठेवूनी तारतम्य परिणामीं.

---

१ रा. भ.=राजभक्त, राष्ट्रभक्त नव्हे. २ रा. ब. =रावबहादुर.

शाळेंत वेत्रधारी पट्टेवाला सदा पुढे लागे,
सन्थपणाने करडी फिरवीत दृष्टि फिरत हे मागे.
किति टापटीप ! दिपवी वार्षिक सम्मेलनामधे भपका;
राजस्तुति होतां, कुणि नच संस्थेला ललाम दे ठपका.
साहेब थोर झाले परि संस्थानी पगार बेताचा,
निर्वाह त्यांत म्हणजे करणें मलखाम्ब अुलट वेताचा.
त्यांतुनि साहेबांची होती तर वाढती तदा भूक,
होअी अजीर्ण ज्यांना त्यांस भुकेच्या कळा न ठाअूक.
असुनी जिवन्त मेला कोण ? जयाच्या न जवळ पैकाच,
विद्वानांत हिरा, पण निर्धन ठरणार निवळ पैं काच.
नाही सुवर्ण म्हणुनिच दुर्लौकिक हो जगांत त्याचा पां–
प्रेत शृङ्गारावें लागे, नावहि बघा ‘मळ्याचांपा’ !
पैक्यानेच ‘नराला येअी श्रेष्ठत्व या जगामाजीं’–
टिकला कोण दुकाळीं ? झाला वर सन्त कोण ? दामाजी !
ह. भ. प. हरिकथा करितो, असतो प्रच्छन्न तो परी ल. भ. प.
बकसोज्ज्वळ तो राही करुनी धनमीन अन्तरीं गडप.
पैका तशी प्रतिष्ठा कवनें मिळवावयास जे बघती
पर्जन्य पाडुं बघती रचुनी केकावलीस ते जगतीं.
वर्गास खाःजगी वा शिकवण करण्यास आड हुद्दा ये;
लक्ष्मीहरण खरोखर अिष्ट परी शिष्टमान्य सदुपायें.
फाळा-वसुलीवाणी शाळाखात्यांत कोठली सन्धी ?
ती डोळसासच दिसे, न मिळे किति शोधिली जरी अन्धीं.
ते गद्यपद्यवेचे शिकवायातें नवेच ना ठीक ?
हें क्षेत्र शिक्षणाचें सुवर्ण पिकवावया न नापीक.

सद्ग्रन्थ ‘ गद्यगोरस, ’ ‘ काव्यकलाकन्द ’ होत आणि सिद्ध;
खात्याच्याहि खुब्या हे जाणत, ठरत प्रबन्ध अनिषिद्ध. ५७०
शालेय पुस्तकांची वाटे त्यां विविधता अशास्त्रोक्त;
व्हावी न पालकांची अडचण, हेतू मनीं असा पोक्त.
करण्यांत टाकवाशी शिक्षकविद्यार्थि येत टेकीस,
पैकेपूर फुगत हे, त्यांचा कामांत त्या निघे कीस.
लेखन जनोपयोगी करीत निष्काम मानसें सन्त,
त्यांच्या अुच्छिष्टांचा करितां व्यापार त्यां नसे खन्त !
कां पैसा मग वेंचा वेचा घेण्यास विद्यमानाचा ?
आपैसा मान मिळे, आणि भुकेला सुविद्य मानाचा.
आता परी करी कुणि मूल्याची मागणी, पड्ा धन्दा—
जणु बाजारीं बसवी स्वबुद्धि, तिजला गणी महानन्दा ! ५७५
ज्याचें हें सम्पादन किम्मत त्याच्याच होय नावाची;
नाही तर तें पुस्तक हातीं घे कोण, कासया वाची ?
अुडवी आवृत्तिच मग विद्यापीठांत लागतां वशिला
जेवी निजप्रभावें तारी, बुडुं दे न रामनांव शिला.
प्रतिवर्ष दाखवी नव मोटारीपरि सुधारणादर्श,
अतिहर्षे कां करी ना पालक लोकांचिया मना स्पर्श ?
पुस्तक तेंच सफल जें घ्यावें लागे असङ्ख्य छात्रांस,
धनराशि अेकट्याला आणि सहस्रांस अल्पसा त्रास.
अुठती कुठे बुकावर वाडे—देख प्रभाव सद्दीचा !
सुटती कुठे न गट्ठे, अूर फुटे, ये न भाव रद्दीचा. ५८०
शास्त्रग्रन्थ विलोकित रचुनी हालांत कुणि मरे जगतीं,
जगती अुचले वेचक, अहह ! गहन ही सदैव दैवगती !

मेले बहु, मरती बहु, मरतीलहि बहु अमूल्य लेखक ते,
टीका म्हणुनिच ‘ किञ्चित् नामूल्यं लिख्यते ’ म्हणू शकते.

## २४ संस्थानी शिष्टाचार

साहेब हे सकाळीं देत वरिष्ठांचिया घरा हजरी,
अधिकारें नर सिंहच वन्य बने तो गुणें वराह जरी.
धाडित पक्वान्नें वा आम्बे गोमन्तकी मधुनि भेटी—
संस्थानांत कळे ना कोण कुणाला कसा कुठुनि रेटी.
मुजरा करितां विलसत तोण्ड भरूनी प्रशुभ्र कुन्दकळ्या,
सगळ्या तोण्डवळ्यावर पडत सुखाच्या मुक्या अरुन्द वळ्या !
सर्व वरिष्ठांशी नित वागत सुविनीत गोडबोले ते,
कमवीत प्रिय चर्पटपञ्जरिका विणित हो डबोलें ते.
राजासङ्गे जातां मोटारींतुनि पहात हे भंवती,
परि एरव्ही कुणाच्या ओळखिची चाड त्यांजला नव्हती.
लागाबान्धा यांचा कुठवर तो धरित जन भले ध्यानीं,
परि वशिलेविक्रीचें अडत-दुकानहि न घातलें यांनी.
नाही म्हणावयाचें नाही, नाही करायचें काही,
झालें तर मी केलें, सुचवाया हें चुकायचें नाही.
काही देवविण्याला सत्पात्रास न करी कवण साह्य ?
अिच्छिति मित्रांकरवी अपात्र जन साह्य जें नियमबाह्य.
पञ्चाअींत दुज्यांची करणें यांना मुळी न माहीत,
हित दुसऱ्याचें साधूं जातां ये खोट निज कमाअींत.

घडतीच, जा कुठेही, अन्याय न तर निदान भानगडी,
पगडीस्थान सुरक्षित आधी ठेवीं, न आन मान, गडी.
जो मित्र आज हासे घात करूं तो सुखें शके पुढती;
जे तत्त्वनिष्ठ अन् सहवासप्रिय तेच नेमके बुडती.
व्हावा न कां कवींचा पण सहवास प्रसादमय सुरस ?
प्रच्छन्न पण समानव्यापाऱ्यांमधि चुकेच ना चुरस.
जो तो निज काव्याचें बैसे सोडूनि भव्य गाठोडें,
सोय न साङ्गायाची, सवड नसे, सरस नव्य गा थोडें. ५९५
कवितेस दोष द्या, या वैसे कविच्याच अन्तरा घाव,
'रसिकच कुठे पुसाया महाराष्ट्रकवि-परम्परा'-भाव ?
कविमौक्तिक तुज म्हणतों, म्हण मज कविरत्न, धन्य झालों कीं !
पुसणार कविच कविला, कोण विजातीय अन्य या लोकीं ?
साहेबांस निरङ्कुश कविची ओळख मुळी नसे खपत,
'नच अुचल्यास,' म्हणत ते, 'आता लोकीं कुलीन देख पत.'
कवि मग मागे बोलत, 'छन्दोगोमात्य हे नवे दुसरे !
पूर्णत्व पौर्णिमेचें अद्यापि न ये कसें नवेन्दुस रे ?'
सङ्घ जरी चिल्टांनी केला व्यञ्जनास होय का भङ्ग ?'
दङ्ग असो तो घालित गुञ्जारव वा सवङ्ग वादङ्ग. ६००
केंकाटत कुत्र्यांनी केलें किति कुञ्जरावरी तोण्ड
तरि तो अपुल्या नादें जातां न करी जरा वरी सोण्ड.
कधि मेल्यावर कवि पण त्याशी जुळवीत पूर्व मैत्री ती,
अधिकार तत्कृतीचे अुपटित दावूनि सम्भ्रमें प्रीती.

---

१ फुलांची ओंजळ पृ. ७७ पहा. २ सम्भाजीचा प्रधान कवजी याची पदवी.

# २५ माधवराव सुकाळे

जरि तुङ्गेशी होता नाजुक सम्बन्ध आडपडद्याचा,
परि चढत्याने आता हात धरावा कशास पडत्याचा ?
नाटक-शाळा नच ते गणीत तुङ्गेस धर्म-शाळा ते;
जीवित म्हणजे यात्रा, नाटक गणितिल तया कशाला ते ?
हे तर अता महाजन, गुरु, विद्यार्थ्यांपुढील आदर्श,
सकलङ्क हीन जें जें त्याला करितिल अता कसा स्पर्श ?
आसक्तिशून्य असतां चित्त तयास न कधी अधिक्षेप,
बघ पद्मपत्र राही कैसें पाण्यामधींहि निर्लेप.
त्यांतुनि आज्ञा देखी काही हृदयास गूढ सन्देश—
कोण उषेची आशा सोडूनी पत्करील सन्ध्येस ?
साहेब मित्र निवडित कोणी अुपरी न, परि घरन्दाज;
ज्याच्या सम्पत्तीचा न कळे कोणास परिघ, अन्दाज.
ओळख अशी असावी की वाटावें तिच्याविशी चोज,
आणि रहावा अपुल्या अधिकाराचा जनामधी बोज.
माधवराव सुकाळे होते वैष्णव कुलें, महोदार;
स्मार्त द्विजांसहि असे कीं भिक्षेस्तव खुलें अहो दार.
त्या शुभ्र गन्धमुद्रा वदनीं लावीत ते तसे विरळा,
भाळीं काळी रेषा अुभी तिचाही न त्यांस तेवि लळा.
सोशिकपण रबराचें त्यांच्या चर्येवरून बावळट
दिसलें तरी कुळांच्या गुत लबाड्या तयांस बा कळत.
होती अिनामदारी सुसज्ज, भरतीस सावकारी ती;
अर्थात् कलान्तराच्या त्यांना होत्याच ठाअुक्या रीती.

त्यांस गमे सत्ता वा पदवी ज्याला वरील तो थोर !
असतो माणूसच तो अथवा चोरावरील तो मोर.
काही अधिकाऱ्यांना झाले होते खरोखर प्रिय ते
दावीत अेकमेकां सहानुभूतीहि चोख सक्रिय ते.
हुरडा वा डबघाअी[1] कधी, मक्याचीं मळींतलीं कणसें,
रसपान वा गुऱ्हाळीं, प्रयोजनांची तशी अुणीव नसे.
बैठक कधि गाण्याची यल्लीचा जीमधे सदा रङ्ग,
ललितकला म्हणजे स्त्री ! शास्त्रांत कुठे वदा अदा-रङ्ग ?
ग्रामोद्धार कराया कधि मग याच्याहि पलिकडे जाणें,
डफचोण्डक्यांवर[2] जिथे रणमल्ल्यांचें[3] चढेल ये गाणें.
होते असे सुकाळे अधिकारिप्रिय, कुलीन, रङ्गेल—
मधुपवृत्ति कवि कसा तत्सहवासीं मुळी न रङ्गेल ?
मग गोड वेड लागे साहेबांच्या जिवास गाण्याचें,—
का गुल्छबू कबुतरावर होतें लक्ष त्या ससाण्याचें ?
नव्हतें कुमारवय पण जेव्हा धमन्यांत रक्त नव नाचे,
शिशु-पाल मित्र होतिल रुक्मीवाचून अन्य कवणाचे ?
सौंदर्यदर्शनें का प्रमोद होअुं नये निरभिलाष ?
अधिक रुचे तें असतां विनीत, मनमोकळें नि मितभाष.
होअी साहेबांची ओळख हळुहळु घरांमधे मधुर;
वाढायचीच ती कीं हेहि शुकाहून बोलके चतुर.
होती राधाबाअी सुन्दर याची न तीस जाणीव;
लक्ष्मीपरी प्रिय तिची चाले भरल्या घरांत राणीव.

---

१ डबघाअी = अुकडहण्डी. २ चोण्डकें = तुणतुणें. ३ रणमल्ली = मुरळी.

पतिच्या वृत्तीविषयीं ठेवी 'जाणूनि नेणतें' स्वमन;
'मम न' म्हणे मग पतिही करीच पत्नीचिया पुढे नमन. ६२५
ती मत्सरें न पाही प्रेम पतीचें मिळे किती टक्के;
पाही भवार्णवीं नच मारायाला गळां मिठी हक्कें.
होती सुगरण मोठी पदार्थ रुचिकर करी नवनवे ते;
साहेब होत भोक्ते स्वादचिकित्साप्रवीण रसवेत्ते.
माण्डयांहुनी तयांना रुचत तिचे ऊन ऊन ते कडबू;
संयोग समसमांचा, हेंहि तयांपरि तसे खमङ्ग ढबू.
साहेब देत धाडुनि भाऊबीजेस भेट अेखादी;
तिजलाहि बन्धु नव्हता, राधाबाअी परी नसे नादी.
लघळपणा हे न करित, ठेवित निज वागणूक बेतांत—
प्रेमिक अगत्य दावुनि हानि करूनी अचूक घेतात. ६३०
साहेब सुज्ञ होते, मित्राला दावितील का दोष ?
साङ्गुनि दोष निघेना, आणी वैरास मग असन्तोष.
यांच्या घरीं क्वचित् कधि जेव्हा स्थितिनिष्ठ मित्र ते येत,
औदार्य दाखवाया श्रीमन्ती तें करीत हे बेत.
म्हणत परन्तु शिपाअी, 'असती साहेब फार कञ्जूष,'
होतें याहुनि यांना सभ्य जनीं नाव 'गुतमञ्जूष.'
गौर असूनी यांना म्हणतच मागे अभक्त डामरट—
जिव्हादोषच केवल, होते साहेब फक्त दाम-रत.
कीर्ति कशी वडिलांची साङ्गत बसतील ? मूर्खलक्षण तें !
अैकुनि कीर्ति दुज्याची डोलत निःशब्द केवल क्षण ते. ६३५
जंव करित आत्मवर्णन, तो हो आत्मप्रसिद्धिचा नमुना;
व्यापारयुगमिदं खलु विद्या विनये न शोभते अधुना.

वर्णन मित्र करित मग, मित्रासच तें असो शिरोधार्य—
‘ आत्मश्रद्धा किति ही ! रसाळ पाण्डित्य काय, औदार्य ! ’
कर्णोपकर्णिकेने वाढे अैशीच कीर्ति लोकांत;
न पुसे प्रवेशिका कुणि जातां द्वारें निघून झोकांत.

---

## २६ सञ्जीवनी

राधाबाअीहूनहि होती मुलगी घरीं अुजळ गोड,
जोड न जीस मिळावी अैशी सञ्जीवनी मुगळखोड.
वाटे सौभाग्याचें आरामस्थान काय तें भाळ
तेजाळ, पेटवी पण आता भलताच हाय तें जाळ !
दुर्दैवाची नीट न करणी अद्यापि त्या जिवा ठावी,
आचार्य भास्कराची ती तर लीलावतीच वाटावी.
वडिलीं तिला शिकविली लाडाने अिङ्ग्रजी बुकें सात,
शोभुनि तिच्या दिसत ज्या नव नवलपरी करी स्ववेशांत
अम्लान कान्ति अङ्गीं शोभे परिपक्व भोकरावाणी,
अव्याज खेळकर ती वृत्ति तिची गोड कोकरावाणी.
विलसेल बालरविच्या तेजीं हिमबिन्दु तरल कमलदलीं।
तर हिचिया कान्तीशी तुळेल वर्णच्छटा तयामधली.
अुठतां क्षणीं पहा तिज न दिसायाचेंच वदन पारोसें;
व्हायाचें हृदयङ्गम अधिकच झाल्यास तें जपा रोषें.
वेणी लोळे पृष्ठीं, तीस तुरेदार शेवटीं फूल,
अन् डूल हलुनि चमकुनि दावित नेत्रांस सारखी हूल.

वेढून गोल नेसे पातळ सुकुमार आठहाती तें,
सडपातळ तनु लवचिक, दावी खुलवुनि किती अहा तीतें !
गोण्डस गौर भुजा त्या भरुनी डोळ्यांत म्हणति, अजि आम्हां
पाहुनि आणा ध्यानीं लावण्यलता सुवर्ण अभिरामा.
दावी काळ्या भोळ्या डोळ्यांमधि सरसताच मदिराक्षी,
ज्यांतिल माधुर्याने ये आम्बटपणच[1] काबुली द्राक्षीं.
लावण्ययुक्त[2] पिस्त्यापरि लाडिक मुख तिचें जरा उघडें
सुचवी भाव जणू की ‘ गम्मत नामी तुम्हांस साङ्गुं गडे ? ’
जरि चन्द्रगोल न तिचा तोण्डवळा, पाहिला कडेने तो
तरिही दिसूनि सुन्दर चित्तांतिल हरुनि साकडें नेतो.
आनन्द कां न व्हावा पाहुनि निर्दोपदर्शना बाला ?
साहेबांस गमे पण जाअी चाटूनि की मना भाला !
कीं हे रसज्ञ झाले पर्युत्सुक आणि तिला पहातांच
लागे करूं निराशा मधुर नसीं मानसीं अहा नाच !
कौमार आणि यौवन यांच्या सीमेवरी अुभी बाला
परिणतवयींहि यांच्या झुलवी मृगजळ पिपासु जीवाला.
मुग्धा यांशी बोले किंवा पाही प्रसन्न नेत्रांहीं
तंव दैवदुर्विलासव्याकुळ मन आंतुनी म्हणे ‘ त्राहि ’ !
होती लहर मनाची ती कामाची पिशाचबाधा न,
होतें त्यांत म्हणुनि हे घेअुं शकत मानुनी समाधान.
पाणी आणी ती तें जीवन यांना विशेष गार करी,
तत्सम सुख हो त्यांना जेव्हा पडतां दिसे पगार करीं.
ती वर येतां घेअुनि नव सोमाची चिनी चहाझारी
घेतच दोन चषक हे; अमृत का पेय नीच बाजारी ?

१ द्राक्षें आम्बट तुलनेने म्हणावयाचीं, दुष्प्राप्य म्हणून नव्हे. २ खाऱ्या.

आला ताप तिला तर भाळ तिचें राजरोस चेपीत,
आणिक केव्हा चोरुनि उष्टें पाणीहि ते तिचें पीत.
'अय्या'! कसें म्हणे ती, 'अिंग्श' मधे त्यांतली नसे चटक—
आवडतीचें सारें आवडतें त्याजला कुठे अटक?
नाव तियेचें त्यांतुनि साहेबांना विशेष आकर्षी,
जें नवजीवन त्यांच्या माळावर मानसांतल्या वर्षी.
काय घरांत करी ती! ती का वाचित बसेल भागवत?
कादम्बऱ्या मराठी वाची, तीस न वडील रागवत.
ठाअुक झाले वाचुनि तीस 'कळ्यांचे' कितीक 'निःश्वास,'
न परी पुरुषाविषयी वाटूं तिज लागला अविश्वास.
नव्हतें तिच्या मनींचें 'विरलेलें स्वप्न' अेकही अजुनी,
'मानसलहरीं' तिल ती मुक्ता सेवी, गणी न हीन जुनी.
साहेब अग्रयावत् म्हणत तिला ग्रन्थ अिंङ्ग्रजी वाचा,
त्यावाचुनि व्हायाचा विकास नाहीच शीघ्र जीवाचा.
हे देत पुस्तकें तिज, विकतहि घेअूनि देत वाचाया!
कळतां न तीज दावित तत्परतेनेच तेधवा छाया.
हे देत तिज लिहाया सुबक वह्या, झरझरी[1] अशा भेटी,
देतात मूढ तरुणच मुखसौन्दर्यप्रसाधना-पेटी.
देणें पाठीवरती परितोषाची कुचित, कधी थाप
सलगी अवद्य का ही पाहिल जरि हॅति शुष्कधी पाप?
हे सारखेच मातापित्यांस दावित अगत्य सरळपण.
न भिनायचें कुणीही फुङ्को कर्णीं असत्य-गरळ पण.

---

१ झरझरी = 'फॉण्टन-पेन.'

## २७ दण्डकारण्य

कळलें साहेबांची होत कशी चालली जगीं चलती,
काय गती कवितेची? आली का तीज नीज निश्चल ती?
आयुर्वसन्त जातां जाअी का ओसरूनि काव्यभर?
छे! कवि मधुच, सदा शिशु, शिशिरांची[1] मग कुठूनि त्या खबर?
हे ग्रन्थसिद्धिसाठी रचितच दिवसास अेक तरि चुटका,
ग्रान्थिक तापापासुनि मेल्यावाचूनि हो क्वचित् सुटका.
हें काव्य कुक्कुटापरि केवळ फडफड करी सबळ पङ्ख
वा जळ झुळझुळ वाहे वाळूवरुनी कसें निवळ शङ्ख!
सम्पूनि गद्य जागा अुरतां खाली पडेल केवि सुनी?
ये मासिकांत यांची कविता मखरांत त्या तिथे दिसुनी.
पहिल्या पानावरती केव्हा केव्हा गमे हटूनि बसे,
डोळ्यांत ती भरावी ठळकच योजित तिथे म्हणूनि ठसे.
निज काव्यसङ्ग्रहाला ठेवित ते नांव 'दण्डकारण्य,'
ज्यांत 'गिरिशृङ्गांचें[2] विविध वनांचें' अुदण्ड लावण्य.
आर्येवाचुनि दुसरी यांनी हाताळिली न कधि जाती,
चिरसहवासें ती कवि-जीवितें[3] झाली द्वितीय कलिजा ती.
केली पन्त मयूरें विविधवृत्तींहि वाणिने क्रीडा,
देत परी कविदण्डी आर्येसच तीहि पाणिने पीडा.
सालङ्कृत मंग आर्या आर्यांना प्रतिपदीं पहा चकवी;
रसपारङ्गत रङ्गत साङ्गत, 'काव्यप्रदीप हाच कवी!'

---

१ वार्धक्यीं निज शैशवास जपणें० केशवसुत. २ ततः पर्वतशृङ्गाणि-वनानि विविधानिच० शूर्पणखोक्ति. ३ त्वं जीवितम्—भवभूति.

टीकाकार नवे पण पन्तासहि म्हणति काव्यकोल्हाटी
करुनि सु-वर्ण-चमत्कृति रसविलसितयश दुराप जो लाटी.
काव्यसुरा विसरा ती! सालङ्कृत घ्या बघूनि या सुरया!
सौभाग्य सुचविणाऱ्या काचेच्या बाङ्गड्याच भङ्गुर या.
वाटे कविदण्डींना संस्कृत शब्दींच ललित ती प्रौढी,
गौडीच रीति त्यांना रुचे दुज्यांना जशी सुरा गौडी[1].
हे पद्यमद्यपान न करवित, भरवीत हे जणों मलशीः
अवघड जरि पचवाया, दे ही बरवी सतेज जोम लशी.
सुमणिखचित रचितचि जणु नवरसमय कवनभवन कनकवन!
रसिकीं 'आ'च करावा, जीवन रमणीय त्यांत पण नव न!
'राधारमणें'[2] च फिरवित जणु काव्याची 'कराल करवालें'[3]!
सन्मान कां भिडेने कविचा न मुळीं कराल करवाल?
साधीत राजकवि हे पद्यीं छत्रादि चित्रबन्ध खरे!
बन्धक हेच रसाचे, साचे वा स्फूर्तिचेच खन्दक रे!
राजे 'कविकल्पद्रुम' यांस म्हणत जणु कवित्व अेक वन,
विषयावरी हव्या त्या कारण की रचुनि देत हे कवन.
स्वागत, अभिनन्दन, अनुशोचन येवो प्रसङ्ग कसलाही,
राजकवींच्या आर्या सिद्धच बान्धूनि चङ्ग लवलाही.
मोठें 'युवराजव्रतबन्धन' पहिलेंच काव्य, कां ऱ्हस्व?
गोठे हिमदुग्धापरि त्यांत अलङ्कारसारसर्वस्व.
'मृगयामोहन' दुसरें लिहिलें मग काव्य पारधीवरती,
यावीच क्षात्राला वाचूनी मानसामधी भरती.

---

१ गौडी=गुळापासून केलेली सुरा. २ राधारमण ( लिमये ) यांच्या क्लिष्ट चमत्कानिजनक कविता काव्यदोहनांत आहेत. ३ 'कराल करवाल' हें वि. वा. भिडे यांच्या अेका कवितेचें नांव.

## २७ दण्डकारण्य

कळलें साहेबांची होत कशी चालली जगीं चलती,
काय गती कवितेची ? आली का तीज नीज निश्चल ती ?

आयुर्वसन्त[1] जातां जाशी का ओसरूनि काव्यभर ?
छे ! कवि मधुच, सदा शिशु, शिशिरांची मग कुठूनि त्या खबर ?
हे ग्रन्थसिद्धिसाठी रचितच दिवसास अेक तरि चुटका,
ग्रान्थिक तापापासुनि मेल्यावाचूनि हो क्वचित् सुटका.
हें काव्य कुक्कुटापरि केवळ फडफड करी सबळ पङ्ख
वा जळ झुळझुळ वाहे वाळूवरुनी कसें निवळ शङ्ख !
सम्पूनि गद्य जागा अुरतां खाली पडेल केवि सुनी ?
ये मासिकांत यांची कविता मखरांत त्या तिथे दिसुनी.
पहिल्या पानावरती केव्हा केव्हा गमे हट्टूनि बसे,
डोळ्यांत ती भरावी ठळकच योजित तिथे म्हणूनि ठसे.

निज काव्यसङ्ग्रहाला ठेवित ते नांव 'दण्डकारण्य,'
ज्यांत 'गिरिशृङ्गांचें[2] विविध वनांचें' अुदण्ड लावण्य.
आर्येवाचुनि दुसरी यांनी हाताळिली न कधि जाती,
चिरसहवासें ती कवि-जीवितें[3] झाली द्वितीय कलिजा ती.
केली पन्त मयूरें विविधवृत्तींहि वाणिने क्रीडा,
देत परी कविदण्डी आर्येसच तीहि पाणिने पीडा.
सालङ्कृत मंग आर्या आर्यांना प्रतिपदीं पहा चक्रवी;
रसपारङ्गत रङ्गत साङ्गत, 'काव्यप्रदीप हाच कवी !'

---

१ वार्धक्यीं निज शैशवास जपणें० केशवसुत. २ ततः पर्वतशृङ्गाणि-वनानि विविधानिच० शूर्पणखोक्ति. ३ त्वं जीवितम् – भवभूति.

टीकाकार नवे पण पन्तासहि म्हणति काव्यकोल्हाटी
करुनि सु-वर्ण-चमत्कृति रसविलसितयश दुराप जो लाटी.
काव्यसुरा विसरा ती! सालङ्कृत घ्या बघूनि या सुरया!
सौभाग्य सुचविणाऱ्या काचेच्या बाङ्गड्याच भङ्गुर या.
वाटे कविदण्डींना संस्कृत शब्दींच ललित ती प्रौढी,
गौडीच रीति त्यांना रुचे दुज्यांना जशी सुरा गौडी[1].
हे पद्यमद्यपान न करवित, भरवीत हे जणों मलअीः
अवघड जरि पचवाया, दे ही बरवी सतेज जोम लअी.
सुमणिखचित रचितचि जणु नवरसमय कवनभवन कनकवन!
रसिकीं 'आ'च करावा, जीवन रमणीय त्यांत पण नव न!
'राधारमणे[2]'च फिरवित जणु काव्याची 'कराल करवाले[3]'!
सन्मान कां भिडेने कविचा न मुळीं कराल करवाल?
साधीत राजकवि हे पद्यीं छत्रादि चित्रबन्ध खरे!
बन्धक हेच रसाचे, साचे वा स्फूर्तिचेच खन्दक रे!
राजे 'कविकल्पद्रुम' यांस म्हणत जणु कवित्व अेक वन,
विषयावरी हव्या त्या कारण की रचुनि देत हे कवन.
स्वागत, अभिनन्दन, अनुशोचन येवो प्रसङ्ग कसलाही,
राजकवींच्या आर्या सिद्धच बान्धूनि चङ्ग लवलाही.
मोठें 'युवराजव्रतबन्धन' पहिलेंच काव्य, कां ऱ्हस्व?
गोठे हिमदुग्धापरि त्यांत अलङ्कारसारसर्वस्व.
'मृगयामोहन' दुसरें लिहिलें मग काव्य पारधीवरती,
यावीच क्षात्राला वाचूनी मानसामधी भरती.

---

१ गौडी=गुळापासून केलेली सुरा. २ राधारमण ( लिमये ) यांच्या क्लिष्ट चमत्कारजनक कविता काव्यदोहनांत आहेत. ३ 'कराल करवाल' हें वि. वा. भिडे यांच्या अेका कवितेचें नांव.

‘बालचमूसम्मेलन’[1] म्हणुनी तिसरें स्फुरे बृहत्काव्य,
हें चिन्त्य शिक्ष्य झालें! राहूं द्या तें, पुरे स्फुट श्राव्य!
भाष्यामुळे न लाभे काव्याला फार त्यामधी जागा;
तें काव्यसूत्र भासे विस्तृतपात्रीं गिर्मी[2] नदी-धागा.
कवि आननीं[3] कसा तो? पुसतिल पुढती, पुसोत सध्या न,
म्हणुनीच हो प्रकाशित कविचें ग्रन्थांत गोण्डस ध्यान.
लिहुनी ‘प्रकाशकाचें हृद्गत’ म्हणवीत मित्र साचार
मानविती चित्रास्तव त्याच्याकडुनी विचित्र आभार.
वेचित ते अवतरणें पञ्जीवर[4]चीं शितें अचुक अुष्टीं,
अेकेक अिङ्ग्रजींतच करीत मुद्रित तिथे मुखपृष्ठीं.
जीवन असो कसेंही, वाङ्मय हें प्रौढ, हें न कां श्लील?
अश्लील वाङ्मया, किति धक्के सम्मेलनांत खाशील?
दुर्लक्षिनाच देशी वाङ्मयसंस्थाहि दक्षिणा त्याला,
देशच निरस्तपादप, दात्याला दोष का विधात्याला?
साहित्याचार्यांची डाळच का! ते गणङ्ग शिजतात;
वाटीत भावभातुक खाअुनि काटे भणङ्ग निजतात.
सम्मेलनस्थळांचा महिमा पद्यांत गात रसभरित—
काव्याच्या कोळामधि ते भूगोलेतिहास कुस्करित.
वळलें कधी न त्यांचें नाटककादम्बरीकडे चित्त,
त्यांत विशेष गुणाविण कीर्ति न लाभे, न सापडे वित्त,
परि मोऱ्यांची त्यांनी प्रसिद्ध केली सटीप बखर जुनी;
भरतांच अैतिहासिक सम्मेलन धावले तडक सजुनी.

---

१ वडोद्याचे सी. वा. पेंडसे यांची ‘शिशुसम्मेलन’ ‘श्रीमज्जासिंहविवाह’ अित्यादि काव्यें सुप्रसिद्धच आहेत! २ गिर्मी = ग्रीष्मांत. ३ ‘कोणीही पुसणार नाहि कवि तो होता कसा आननीं’—केशवसुत. ४ पञ्जी = तिथि-पट.

अुच्चासनीं वसत ते त्यांचा त्यांनाच भरवसा झेपे,
छायाचित्र निघे तंव खुर्ची अडवित पुढील साक्षेपें.
व्याख्यानास वसन्तीं पुणेकरांच्या पुढेच तिष्ठत गा,
चाहत खास पसन्ती त्यांची निन्दूनि त्यांस—शिष्ट बघा.
साहेब राजकवि हे झाले वर्षांत पाच कुणि धेण्डे—
यांच्या विद्वत्तेचें केवि फुटेना बरें पिकुनि बेण्डें ?

सं.
रा गं.

---

## २८ ‘सारस्वत - सारमेय’

अितुकी प्रसिद्धि होअुनि भावकवींचा गणी न त्यां ताण्डा;
‘गोतास’ हे म्हणत मग, ‘होअुनि जाअिन कुऱ्हाडिचा दाण्डा’. ७०५
कविदण्डीस पुरे मग वाटे पद्यप्रवास हा अितका,
करण्यास नामसार्थक ओळखिचा जन बरा, तिऱ्हाअित का ?
साहेब शीर्षशिक्षक आधी होतेच हे छडीबाज,
वाटे साहित्यांतहि घ्यावी शमवूनि तेवढी खाज.
भटके अता रसिकता सिकताप्रान्तीं समीक्षणाच्या ती,
ये अुन्च मान करुनी जातां, पण कठिण ती कुणा छाती ?
वाङ्मय थोर खचित तें संसृतिची व्यक्त ज्यांत हो टीका,
मग वाङ्मटीकेच्या महतीची ही वरात खोटी का ?
करिल कुणीहि ‘ फुलांचे झेले ’, तोडील कोण निवडुङ्ग ?—
हे काव्यकण्टक किती झाले माजूनि पुष्ट अुत्तुङ्ग ! ७१०

---

१ बाळकृष्ण अनन्त भिडे यांच्या काव्यसङ्ग्रहाचें नांव.

मासिक सदा[1]हरित मग जें वाचनमन्दिरीं न हो जीर्ण
दण्डी होत तयाच्या प्रौढ स्तम्भांमधूनि अवतीर्ण.
यांची आवश्यकता वाटे मग वर्तमानपत्रांस,
पत्रास कां कुणाची ? स्वतःहि कां ध्याच वाचनत्रास ?
पुस्तक पाठवितां कुणि त्याचें ध्याया हवें परीक्षण तें
मोहरिच्या भरितापरि, पाणी आणील लोचनीं क्षण तें.
अडणी फुकट मिळे त्या सिद्ध करायास जो महाशब्द,
स्वनितप्रभाव ज्याचा करुनी टाकील दशदिशा स्तब्ध.
हातांत पत्र येतां चालत चेष्टा किती अगाधा[2] त्या ! —
कां त्यांस राज्य देशी झिङ्गत जे हाकिती अगा धात्या ?
साहेब देत धमकी 'तमक्याचें येथुं द्या अता बूक,
मी पृष्ठचर्म सोलुनि काढिन, आहे करांत चाबूक.
तो मस्तवाल झाला, 'सारस्वतसारमेय' मज म्हणतो,
घेतोंच कडकडूनी चावा, बघतो कसा पुढे कण्हतो.'
होते तज्ज्ञ तसे हे, चोरांचीं पाउलेंहि ओळखत,
तिमिर असेना, हुडकित हे मनिंच्या चान्दण्यांत चोरपथ.
मारीत नेमके व्रणिं हे 'केरळ[3]कोकिळा' परी चोच,
तिखट तिख्याची बोथी बोथटते काय ? घेच ती पोच.
कुणि टूम काढितां हे टाकाने देत घाव टाकीचे,
त्यांवीण देवपण पण अिच्छिति हे गण्डकी-तटाकींचे.
शृङ्गार संस्कृतांतिल यांस रुचे, भूक ती शमे नाच,
तो प्राकृतांतुनि परी नङ्गा वेढूट की गमे नाच.

---

१ हें आता बन्द पडलेसें वाटतें—तेव्हा नांव ध्याच कशाला ? २ 'आधीच मर्कट तशांतहि मद्य प्याला०' पहा. ३ कृष्णाजी नारायण आठल्ये यांच्या मासिकाचें नांव.

ते म्हणत ‘ प्रेमाचा पावन परिपाक्र-काल हा न खरा——
किति रण्डागीतांचा व्यभिचारी दाखवाल हा नखरा ? ’
व्याकरणदोष दावुनि म्हणत, ‘ किती देति कवि कुधी शीण ?
काव्यकुमुद तें केवी फुलेल ‘ सिद्धान्तकौमुदी ’ वीण ?
टीकेस आपुल्या ते लाडाने म्हणत, ‘ ही सुवर्णमुखी
सेवन केली काविंनी रसिकांची तर नुरेल कर्णदुखी. ’
जो न अभिप्रायास्तव येथी वाचीत हे न तो ग्रन्थ;
भेटीस्तव आलेला क्वचितच वाचित करीत रोमन्थ.
कित्येक लोक बोलत गोष्ट, जरी ती असे अुणी, अैका——
हे वाचनालयामधि खपवित तो ग्रन्थ घेअुनी पैका !
हे थोर म्हणुनि यांच्या लेखनशैलींत ये वयम्भाव;
शिवराळपण सुसंस्कृत शब्दांतुनि चालवी लपण्डाव.
काव्यास पारितोषिक दे स्वल्पच समिति, तें न अविलम्बें,
आणिक मतें निनांवी करीत हे, येन केन कवि लम्बे.
जों वाचितां कवीला, स्मशानवैराग्य तमदरींत डसे——
करणें अुभें चव्हाट्यावर अन्त:पुर कुलीन रीत नसे.
बसतां दुकान माण्डुनि कविते, भलतीच लाज का ? टाक.
मोडिल डोळे कोणी ग्राहक मुरडील वा तुलीं नाक.
वाराङ्गनेव कीर्तिहि अुलटे जरि करिल आरती आज,
बोळवणीस कुणी दे लङ्गोटी, राखणार ती लाज.
मग वर्तमानपत्रीं ‘ भय्यासाहेब ’ म्हणुन ये नाव,
जडतां ‘ साहेबा ’ ची अुपाधि मग थोर गणुं नये ‘ राव.’

---

१ सुवर्णमुखी = सोनामुखी.

प्रोपेश्वरवर्गाचा धुमसे चित्तांत सारखा द्वेष;
मिळतां सन्धि कुचेष्टा करीत त्यांची असार सावेश.
प्रोपेश्वर, ते बोलत, असती साहित्य-वाढपी निवळ,
सम्यग् ज्ञानहि त्यांना नाही मग कोठलें प्रतीति-बळ ?
प्रो. पदवी ये शिकवुनि अष्टमवर्गास फक्त षण्मास,
सप्तपदीनें पुरते जैशी नारी नरास जन्मास. ७३५
श्रीसेंच अुपजती प्रो. जैसे हे राव अन् महाराव;
क्षेत्रज्ञ परि हलायुध जरी स्वयंसिद्ध त्या न हा भाव.
पैका असे म्हणूनिच ये प्रो. घेअुनि विलायती पदवी,
पटवी लठ्ठ पगारें स्वपात्रता आणि काय ती मद वी !
टीका अशी करूनी येत पुढे काव्यशास्त्रमातङ्ग—
राहे सदा निरुत्तर त्यांचें केवळ जहाल वादङ्ग.

---

## २९ पुरोगामिसाहित्यकेन्द्र

साहेब दूर सरले—अबलेच्या भय नसेच शापास—
विश्वामित्र जसा हो विमुक्त तोडूनि मेनका-पाश.
समयास धावले मग डाक्तर होतेच अेकनिष्ठ जन,
सरसावले कराया पहिला परिचय घनिष्ठ शिष्ट पण. ७४०
सङ्कोचें ते मागे फसले हें शल्य मनिं अजून सले,
म्हणुनी पाटावर ज्ञाणि बघतां ते पात्र मोकळें बसले.
प्रेमासाठी त्यांनी तृतीय आता विवाह हा केला,
हाकेला ‘ ओ ’ दिधली, सुधारणेच्याचि या पहा खेळा.

---

१ Princes and lords may flourish or may fade—गोल्ड्स्मिथ.

तिजलाहि निकड होती, गेला होअुनि विवाह झटपट तो,
अनुभवसिद्ध अशा या बन्धापुढतीच मोक्ष लटपटतो.
विदुषी न विजयिनी जी विधुरच–वाटेवरील वस्तु–हरी,
दावी पराक्रम पहा प्रमदाप्रेमप्रभाव भर्तृ[१]-हरी !
तंव बोले गृहलक्ष्मी, ' होणें होणार, ना चुके दैव:
नव पत्नीला घेअुनि बाहेरच पण रहा सुखेनैव. '
टुमदार घर बघोनी पैलाडामधि नवीन संसार
माण्डित पण्डित अपुला, गवसे उभयांस त्यांत नव सार.
रसगङ्गालहरीवर विहार निर्भयपणें करी मिथुन.
नव सारस्वतनिर्मिति निश्चित होणार झडकरी अिथुन.
मग ' बन्ध[२]मोक्ष 'कारक वाङ्मय हो आयतें पुरोगामी,
भय्यासाहेब जरी छेडित की ' काय तें अुरोगामी ! '
त्यांना न तरुण गाठी झाला जो सज्ज जावया पैल,
डोकें खुलें तयाचें, खुला गळा आणि चोळणा सैल !
झालें प्रसिद्ध तें घर अभिनवसाहित्यसाधनाकेन्द्र;
ललित अरिष्ट बघुनि तें असेल मानित विषाद नाकेन्द्र.
संमर्दांत नव्या त्या क्वचितच परि असत पन्त ते चिवटे,
होते तसे जुने ते–सोनें त्यांना सदैव तेंचि पटे.
स्नेह अहेतुक त्यांनी नाही अपुला परी अुणा केला,
देअूनि कान होते अुत्तर देण्यास अिष्ट हाकेला.
संसार सफल पण्डित अपुला मासांत सात बघतात,
तो शारदाप्रसादच, ठेवित नाव ' प्रसाद ' मग तात.

---

१ भर्तृहरी = भर्त्यानें हरण करणारा. २ कौटिलीय अर्थशास्त्रांतील, घटस्फोटाचा पारिभाषिक शब्द.

तुङ्गाबाअी होत्या पालटुनी नाव जाहल्या रजनी,
अबलोन्नतिची त्यांना तळमळ लागूनि जाय फार जनीं.
स्त्रीस्वातन्त्र्यासाठी शिकवूं पाहात त्या युगत सोपी,
वस्तु विकाशु विदेशी अन्तर्पाटापरी गुपित टोपी ! ७५५
याच अता 'टोपी' ने स्वास्थ्य समाजीं नवीन होणार,
जात्याच मुक्त नर त्यावाणी होअिल कधी अहो नार ?

---

## ३० गृहाचें कान्तार

नकुलगृहास अवचित कान्ताराचीच अवकळा आली,
झाली हाय ! दिवङ्गत कान्ता, नच जीव अडकला खाली.
अव्यक्त पूज्य होती लग्नापासूनि अन्तरीं प्रीती,
सोनें करुनि जिवाचें अपुल्या पतिला करी दरिद्री ती.
आर्यस्त्रीस न म्हणवें स्वार्थी, करि ती असा चमत्कार—
स्वर्गीं जाय पुढे ती पतिचा करण्यास साच सत्कार.
तोंवर काय करावें पतिने ? सोशित घरांत वनवास
'विरहिविलाप' म्हणावा अन् गाळित दिवसरात असवांस ! ७६०
नव्हती अिन्दुमती ती, नव्हतें दूर द्वितीय वत्सवय;
सहधर्मिणी परी ती, जिवास जाची स्वभाववत् सवय.
तिचिया मरणानन्तर हे निज 'पद्यप्रमोद' छापवितां
देत तिच्या नावावर दडपूनी मग नअू दहा कविता !

---

१ चिपळूणकरकृत करुणविलासाचें भाषान्तर.

भरपूर दूध होतें म्हणती मेल्या म्हशीस जर बहुधा
कविमहिषीस दिवङ्गत कां न असावी अुदण्ड कवनसुधा ?
श्राद्ध करावें यापरि; गेल्याचा दावितां किती शोक ?
जर जायचें पुढे तर मागे कां दृष्टि टाकिती लोक ?
पाठीमागे न बघा, चरके[1] सिंहावलोकनें हृदय,
पोटाकडे बघुनि निज पहात जावें कसा पुढे समय.
साहेबांचें अन्तर भरीव असुनी बुचापरी हलकें,
प्रक्षुब्ध शोकसागर त्याला बसवूं रसातळीं न शके.
आहे खरी अशी स्थिति, अशी परी कां, मनीं न आणीत;
खणत्यास कधि चुकेना माती सोन्यासवेंच खाणींत.
आहे त्याच स्थितिमधि होअिल जें काय तें करावेंच;
चिन्तेंत, अमुक कां नच, असलें बळ कां वृथा करा वेंच ?
पण चाळिशी अुलटल्यानन्तर कां राहवे न अेकाकी ?
जीवनरहस्य म्हणजे विशिष्ट अद्वैत हेंच देखा की !
ही चाळिशी अुलटतां वाटे गृह तें हवें स्वतःचेंच,
गृहिणीविण कसलें गृह ? पडतो येथूनि तत्त्वतः पेच.
आता स्वभावसवयी अुणिवा समजूनि कोण घेअील ?
कल पाहूनि अयाचित वस्तु हवी ती समोर ठेवील ?
त्या गृहसिद्धचरूविण कुणास वाटे अगत्य खाण्याचें ?
येतां दुखणें बिघडे सगळें बस्तान पथ्यपाण्याचें.
आणि मुलांच्या खस्ता गृहिणीवाचूनि कोण काढील ?
थकले घरीं पुरुष तर कार्यीं बाहेर हो न कां ढील ?
पोरांकडे बघूनी कण्ठावा काळ ओढित स्मरणी —
हाय ! वियोगतपाने प्रेम न होअूनि जाय भस्म रणीं.

---

१ कितीक हृदयें वदा चरकल्याविणें राहती ?–केशवसुत.

कींव करी ना प्रकृति, पसरी माया परी दुरत्यय ती,
संन्यासाचा महिमा विसरुनि कधि कधि करी कुपथ्य यती. ७७५

बाहेर सोय लागे लागे सुकुमार ठीक लत्ताही,
राहे विवाहपाशीं पुरुषासच मोकळीक, सत्ताही.

राया, सन्धि सुदुर्मिळ येअी मागिल चुकी सुधाराया,
मायाही तुजपाशी, अूब नवी घे शिरीं तु करमाया.

लागे वाट बघावी वर्षत्रय जर टळे प्रथम वर्ष;
साङ्गे ' शुभस्य शीघ्रम् ' मुली पहायास शास्त्र निष्कर्ष.

---

## ३१ वधूशोधन

आता सशास्त्र कन्या वरितां करितात कींव बुध तीची;
व्यवहार रोख सोडुनि मग घ्या हुण्डी कशास मुदतीची ?

साहेब हे परन्तु न सुधारणाप्रिय पुराणविद्वेषी,
साहेल केंवि यांना तर मग करणें विवाह विधवेशी ? ७८०

परि आशेने यांना दिधली क्षणभर सुधारकदृष्टी
सञ्जीवनी कदाचित् असेल गमलें अुदार अदृष्टी.

वैष्णव परी सुकाळे जुनेच, वरवर अुदारमतवादी;
बरवें नव मत म्हणुनी असती नरवर मुदा रमत वादीं.

वाटे नकार येतां नसती अगदीच ते पिसे पशु कीं—
तरुणालाच वरूनी होअिल सञ्जीवनी विशेष सुखी !

विधवा वृथा घृताची ! नेली तिज दूर दुष्ट अदृष्टें !
आशा असे घृताची सेवूं म्हणुनीच बघति ना अुष्टें ?

वाटे कुणा न चित्तीं नवथर कोरीच वस्तु लाभावी ?
नवमत म्हणो असा न स्वभाव राहील आपुला भावी,
अुपवर किति शिकलेल्या दिसती नगरांत राजसा पोरी !
गोरी एक पुणेरी यावी साङ्गून कां न सामोरी ?
मग पत्नी-निधनाची वार्ता ये वर्तमानपत्रांत,
प्रच्छन्न सूचना जणु सुमन पुन्हा पाहिजे ‘ अनाघ्रात. ’
यांचा न बङ्गला पण, न अुभी मोटार अेक दाराशी,
वस्त्रालङ्कारांच्या वधूस मग लाभणें कदा राशी ?
हे मात्र शीर्षशिक्षक, कोण अशांना पुसे समाजांत ?
यांच्यांत काय अैसें जेणें पत्नी फुगेल माजांत ?
ये न म्हणाया यांना, अमुक बड्यांचे अमूक हे आप्त;
जगतात जे स्वकष्टें त्यां न विवाहीं महत्त्व हें प्राप्त.
अथवा विलायतेच्या यात्रेने हे न जाहले पूत,
अन् यांच्या नावास न विद्येचें द्व्यक्षरीहि शेपूट.
यांची नसे रहाणी मोहक खर्चाळु आङ्ग्लपद्धतिची,
केवि वरील वधू जर होअी दृष्टि न वरस्थ बद्ध तिची ?
आअीबाप मुलीचे चोखन्दळ का असे कुठे होते ?
खाअी नाव नराची भवार्णवीं स्त्रैण शिक्षणें गोते.
ठेवुं नये कां स्त्रीने जन्माची दृष्टि अेक पुरुषार्थी ?
पत्नी असमर्थाची, कोण निवारील हो तिची आर्ती ?
हुण्डा जर पुरुषाच्या पक्षें माण्डी प्रचण्ड पुण्डावा
तर कां न शारदेने वृद्ध श्रीमन्त पन्त धुण्डावा ?
अप्रस्तुत ‘ वस्तु ’स या क्वचित् कुमारी गुणी न जर बन्दी
भेटायची कुठे ती करुं म्हटलें जर कुणी नजरबन्दी ?

झाले वयस्क त्यांना आता कोठून आस ही भलती ?
मधुयौवनींच साधे, बाधेना प्रीति मग्ननिर्मल ती.
हे मधु युवक न अैसे ज्यांची दृष्टिच सतेज हृत्स्पर्शी,
जी युवतीस अधोमुख दासी करुनी सलील आकर्षी.
ताम्बूस कान्ति यांची हिरवट पण नेत्र मान्जरावाणी;
होअील काळजाचें, सुटणें तोण्डास कासया पाणी ?
कुणि काही कुणि काही साङ्गे करण्यास जीव साशङ्क,
रजतांशु हेहि न पुन्हा, शोभाप्रद अधिक हो जया अङ्क. ८००
त्यांतून दोन मुलगे वाढविणें ते घरांत सवतीचे,
चित्र असें भवतीचें केवी झुकवील चित्त युवतीचें ?
झाले निराश पाहुनि पुण्यास सौभाग्यकाङ्क्षिणी विदुषी—
कैशी अुषा मिळावी, निशाहि जेथे वरूं बघे विधुशी ?
संस्था बघूं म्हणूनी आले पाहूनि हिङ्गणें-गांव !
बुद्रुक हे धरणीविण निमुटपणें कोण यांस दे ठाव ?
तरुणी लग्नविधिपर्दी चतुर वर्यां होअिना विलीना ही,
प्रेमरसास्वादाला आता ती अटच राहिली नाही.
सुर-गाठ नीट बसतां अनुभवसम्पन्न होअुनी अुभय
सुरलोक भूवरी ये स्वास्थ्याविषयी नकोच किन्तु, भय. ८०५

# ३२ विधवेची आशा ?

आपद्धर्म म्हणुनि मग विधवेशींहि करायला लग्न
जातां हाहि मनोरथ सत्वर घाटांत जाहला भग्न.
विधवा-विवाह दुर्मिळ किति, अजुनी ही अशी अवस्था कां ?
सामान्य वरदळीचा होओीना लोकमान्य रस्ता कां ?
अमुचें लग्न करा हो म्हणुनि मुली काय हट्ट घेतात ?
कर्तव्यभार विधवा कन्येचा कां तसा न घे तात ?
योग्यच सोय पहावी जिची तिने; पण नव्हे! प्रयत्नींच
तिज लोकांतुनि अुठवी दाम्भिक अनुदार हें जगत् नीच.
स्त्रीसच का पुरुषासहि ध्येयाची होय सङ्गती चोरी,
परजातीच्या तरुणांसङ्गे का अुगिच रङ्गती पोरी ?
हृदयाराधनकर्ता स्वसमाजीं तरुण तो जरा न खपे,
मिळतां सन्धि मराठी महिला मग कां बरें परा न जपे ?
मुकल्या निज जातीला, धर्माला तरि समाज सोशील;
न पतितपावन देवहि की स्थिर अमुचें सदा असो शील.
चङ्गळ अशा समाजीं चाले नित कण्टक कृतघ्नांची,
रक्षा-पात्र बने मग अबला बान्धी न गाठ लग्नाची !
निर्भय सुविद्य झाल्या, स्वातन्त्र्याचेंहि लागलें वारें,
बघतां विवाहबन्धन म्हणती त्या, 'हें कशास देवा रे' ?
झाल्यास चूक होओी हानि स्त्रीचीच अधिक या बन्धीं,
चूक सुधारूं बघतां मोक्षाची अेक यमच दे सन्धी.
वाटेल केंवि अुप-यम, 'जन्माचा बन्दिवास' परि नामी ?
हासत कर्म करी तर भोगी नारीच रडत परिणामी.

सुख बन्धनींहि दावी, लावी अुडवूनि भवभयें सारीं
अैशी प्रीति[1] कुठे ती बाजारीं का मिळेल शेजारीं ?
ती बन्धनापलिकडे, गवसेना, शोधनीं करा शर्थ,
सौभाग्याचा म्हणुनी पैक्यावाचुनि न हो दुजा अर्थ.
आहे म्हणती स्त्रीच्या स्वास्थ्याची सोय या विवाहांत,
आणि धनीच शके तो घ्याया सेवा नि द्यावया हात.
वरितिल युवती विधवा वृद्धालाही अपार पैक्याच्या,
कुतुक करोत किशोरी काव्यकथा अैकुनी हृदैक्याच्या.
असला हा तनुविक्रय तरि आहे तो विशिष्ट अेकास;
वाराङ्गनाच ज्यांची अक्कल ते वकिल शिष्ट ते खास !
विधवा क्वचित् तरि दिसे सधन वृद्धास जी प्रसन्न करी;
निर्धन तरुण सुधारक आस मनींची त्यजी न, खन्त करी.
साहेबांस पडे भय, न सुटे कान्तारवास भालींचा;
वाटे तो शरपञ्जर जो होते अन्थरीत गालीचा.
पोळत विरहें होते लोळत त्याच्यावरी अहोरात्र—
अडला नारायण हा अेकहि लक्ष्मीस का न हो पात्र ?

---

1 प्रीति मिळेल का हो बाजारीं ?—केशवसुत.

## ३३ नवी विटी

घेतां शोध पुण्याला वस्तु निघे अचुक सन्निध प्रान्तीं—
अनुकूल दैव म्हणुनिच भेटे परमेश्वर प्रयत्नान्तीं.
खाणावळ-काकूची होती कुणि पोर ती चिकोडीला,
ढेप गुळाची काळ्या खमङ्ग, टिकणार तीचि गोडीला.
त्या सोवळ्या अबाअिची होती ही लेक अेक अेकुलती
अपुल्या पणांत झुलती फुलवाडी जशि समीरणाकुल ती.
राहे तात म्हणूनी गळ्यास आअीचिया पहा ‘ तान्ही ’
साहेब माळ म्हणुनी करित स्वीकार अुभय हातांनी.
मुलगी विशींतली ती तिजला लोकप्रवाद झोम्बेच,
धीरोदात्त परी हे नायक यांना पडे न तो पेच.
मोहकता ‘ तान्ही ’ ची वाटे दुबळ्यांस केवि अुर-मोडी[1]
किंवा अजिङ्क्य तारा, जीस न सज्जन गडी विधुर जोडी.
धजले तत्त्वास्तव हे अबलोन्नातिला करावया साह्य
‘ स्त्रीरत्न दुष्कुलादपि ’ व्हायाचें पारख्यास या ग्राह्य.
स्त्री शूद्रच जन्माने होअी ती द्विज विवाहसंस्कारें,
बघतां जात पुन्हा कां ? संस्काराला न मानितां कां रे ?
माहात्म्य क्षेत्राचें सुखें बघो कर्मकुशल जन योगी,
निज बीजासह सत्ता जगभर पसरीत जाय पण भोगी.
बीजन्यायी लोकच होअूं शकतात पतितपावन ते,
करितात लोकसङ्ग्रह, जीवनकलहांत निजजनावन ते !
वीरवृत्ति तशी जर दाखविली या स्थळीं नकुलरावें
तर वर्तमानपत्रीं अभिनन्दन का मुळींच न करावें ?

---

१ अुरमोडी ही नदी अजिङ्क्यतारा किल्ल्याच्या नैर्ऋत्येस आहे.

थांनीच फेडिलें तें सासुस पेठेंत जाहलें रीण,
असुनि महाग अव्हेरी रत्नाला तो पहा जव्हेरी न.
स्त्रीदाक्षिण्य म्हणूनी स्त्रीस्तव हे दक्षिणा सुखें देत,
नाही तर दे हुण्डा टाकित दुहितेस जनक कैदेंत.
साहेब हे करीत न सैल कधी फुकट गाठ पिशवीची,
नव राज्यास हवी ना नवी चिटी, टणक गाठ शिसवीची ?
सुमुहूर्तीं पतिसङ्गें केला स्वपतिगृहप्रवेश तिने,
अन् पाठ-पोटराखण करावया मातृदेवतेप्रति ने.
पोरांस दूर ठेवित, त्यांचा न लगे घरांत आडथळा,
मातृविहीन मुलांना आजोळींचाच सहज गाढ लळा. ८४०

---

## ३४ नववधूवर्णन

होते नव्या वधूचे अवयव ते ठसठशीत रेखीव,
वर्णाकडेच पाही त्याची यावी किती बरें कीव !
जर लाविलें कराया सतेज त्याला कुणी अहो तेल
तरच तिच्या वर्णाशी अुपमेला तो अुदीद शोभेल.
प्रश्न असे अभिरुचिचा, वर्णाला नच महत्त्व लव साचें,
वाटे खमङ्ग कोणा तेल तिळाचें, कुणास जवसाचें[1].
लावण्य म्हणे कोणी म्हणजे तेजस्वि यौवनारोग्य;
काळी रात्र असे पण होअि कलापतिस अङ्गना योग्य.
काळी घनमाला ती, जीवन तिचियाच पासुनी वरसे,
पण शुष्क चैत्रगौरी शमविल कवणा करूनि कीव रसें ? ८४५

---

[1] नागपुराकडे जवसाचें कच्चें तेलहि आवडीने खातात.

काळी असो कसोटी, तीच जनांतें सुवर्णकस दावी;
कस्तूरिकाहि काळी सुवासिनी ती कशास न वदावी ?
काळी मशी तिच्याविण पाण्डुर पत्रास कोण पुसणार ?
ती टाकासह फिरतां वाङ्मयवाडी प्रफुल्ल हसणार.
पञ्चरशी रूपातें सुरेख असल्यास रसिक कां निन्दी ?
‘ सञ्चरशी ’ तो बोले ‘ मानवरूपेंच येथ कालिन्दी. ’
नाही सु-वर्णयुग हें, तिख्यांस[1] कां व्यर्थ हीणवी कनक ?
संसाराला गृहिणी हिङ्गणबेटापरी हवी टकण.
शोभे पति तिज जैसा काळ्या पोतीस सुभग गौर गळा,
शोभे तयास तीही जैशी देहास गौर चन्द्रकळा.
नयनीं दुग्धधवल त्या शाळिग्रामापरी तिचीं बुबुळें
तैशींच दिसत शोभुनि—सख्य विरोधांत काय चारु जुळे !
अन् ‘ राजहंस[2] ’-शुभ्रच बैसत पङ्क्तींत दात ते सारे,
विलसत हसतांना ती अवसेच्या अम्बरीं जसे तारे.
ये पक्क जाम्भळाच्या सालीची कान्ति त्या तिच्या ओष्ठीं,
असणार पित्तशामक आम्लमधुर मग तिच्या सदा गोष्टी.
ती काळसर्पवेष्टित पिण्डीपरि भव्य गाठ केसाची
बघतांच गारठूनी न पुढे कविकल्पना धके साची.
वर्णूं पुन्हा कशाला खाली अुतरूनि अधिक तिज वाया,
अग्निप्रसन्न सोज्ज्वल संस्कृतिसंरक्षकांस खिजवाया ?
नच आङ्ग्ल बालपोथी लागे द्याया तिशी निशीं पाठ,
नावें वाचुं शके ती स्पष्टोच्चारच करी जरी राठ.
‘ अटकेपार ’ कथा ती वाची हुरळूनि जाअुनी चोजें,
ध्येयखुळ्या जीवाला जाअी संसार होअुनी ओझें.

---

१ तिखें=पोलाद. २ बालगन्धर्वांच्या दन्तपङ्क्ती सुप्रसिद्धच आहेत.

तीस ‘ गुलाबी कोडें, ’ ‘ मुरली ’ होत्याच पाठ त्या कविता,
स्त्रीगीतेंहि रची ती कोणी तिजला न वाट दाखविता.
सैंपाक आणि वरकड घरचें सारेंच पाहतां आभी,
न कळे हिला कशामधि वेळ हिचा झपझपा अता जाभी.
वाटे भय तिज, जाभिन झिजुनी घरच्याच कष्टकामांनी,
नाचविण्यांत पतीला ती प्रेमाची प्रफुल्लता मानी.
जीवन चञ्चल वाटे तिज जणुं तें श्रावणांतलें भून,
लेभून वेष भुञ्ची नाचावें कां न नाथ घेभून ?
नटण्यांत मुरडण्यांतच वेळ तिचा होय तो सहज नष्ट–
स्त्रीने न जर नटावें तर का पुरुषें त्यजूनि निज कष्ट ?
राहे आता तिचिया नाजुक नखऱ्यास काय न तुमार–
अधनाचीच कुमारी धनिगृहीं हो विशेष सुकुमार.
काम पडे हें तिजला–म्हणणें की ‘ हें करा नि तें आणा ’;
पाणी होय भुसाच्या जीवाचें परि पहा कण्हे घाणा.
लागे चहांत तिजला प्रातःकालीं विलायती मीठ
टाकायाच्या पूर्वी चवलीवर घेभि काय ती नीट.
पाणी भुपसुनि द्याया जातां न्हाणीघरांत ती केव्हा
अभ्यङ्गमर्दनाने दावी स्वपतीस ती सती सेवा.
सालममिश्री घालुनि देभी कधि त्यांस दूध गाभीचें,
गाकर भेक तयासह मोहन घालूनि जाड साभीचें.
थण्डीमधि दे अण्डीं–वाड्यावरही मिळे प्रसाद कधी–
राहील व्यवहारीं माणुस तरि सोवळा कसा अगदी ?
साक्षेपेंच पुन्हा ती भुष्टया पानीं पतीचिया जेवी,
आणिक काय करावें लागे व्हाया पतिव्रता देवी ?

# ३५ रङ्गलेला संसार

साहेबांना गमली पत्नी जणु अर्धफुल्ल सरस कळी
भ्रमत तिच्या भवती ते घालित रुञ्जी जसा भ्रमर कमळीं.
म्हणतात बिजवरासच पत्नीचें ये कळूनि मोल खरें,
हाले तल्लहरीने जणु कानींचा विलोल लोलक रे.
जो पति पहा प्रवर्ते रूक्षपणें पहिलिशीं विवादास,
नादास लागुनी तो दुसरीच्या रङ्गतो तिचा दास.
वेडी म्हणून पडतां ये तत्सम्बध हातपायाशी;
बिलगे माळ अुराशी, शीतसुखस्पर्श तर तिच्यापाशी.
समतास्वतन्त्रता पतिपत्नीमध्ये अशक्य या जगतीं;
हो कुणितरी कुणाचें अङ्किकत, दुसरी नसेच त्यास गती.
कोण कुणाच्या आशा साऱ्या पुरविल करूनही यत्न ?
जें तें स्थापुं बघे पण लग्नविधिबळें स्वराज्य असपत्न.
तडजोड अिष्ट मानी माणुस जें संयमप्रधान मतें,
तें संसार यशस्वी करावया घे सदान्कदा नमतें.
धननाशभीति वाटे म्हणतां 'पुरवाच छन्द तो अमुक,'
शोक परी तो नुरतो देतां गृहिणी प्रसन्न तोण्डसुख.
खर्च सदोदित करवी गृहिणी नानापरी गृहासम ती,
काढावा आढावा तर मग होअील ना अुदास मती ?
त्यांतुनि दुसरी पत्नी व्ययनिर्झरिणी सदागती समजा,
पैसा कैसा ये हें न कळे, न गमे महाग तीस मजा.
करवूनि वेंच आपण घ्यावा चित्तीं मुळी न आढावा;
'खर्च अरिष्टच बाअी'! निःश्वासें मधुर बोल काढावा.

होतां रेताडाचें अेक मुहूर्तांत गार अुद्यान
पाण्यापरि वर पैका पति का हो सोडणार बुद्धया न ?
ये नवरङ्ग घराला, ये लोखण्डी पलङ्ग झुलणारा,
ये भव्य आरसाही ज्यामधि रसराजरङ्ग खुलणारा.
येअी मच्छरदाणी, पडदे खिडक्यांस येत जाळीचे,
शोभत ते झुळुकांनी जेवि हरिद्रम्य शेत साळीचें.
गायक-यन्त्र घरीं ये, गाती गन्धर्व[1]-सुन्दरा-व्यास,
कां पिञ्जऱ्यांत पितळी ठेवा मग अडकवून राव्यास ?
टीकाप्रसिद्ध शोभे भिन्तीला शुभ्रवसन '[2]ओलेती,'
ती केस पाठमोरी बान्धी, न कुणाशि काहि बोले ती.
चित्रें सृष्टिसतीचीं आणि नटींची विलायती स्वस्त,
किति रुचिर वेषभूषा ! वदनच्छवि हाय काय ती मस्त !
बैठक सारी बघुनी प्रसन्न होय न असा दिसे न कुणी—
रौप्यकरण्डक असतां होअी ताम्बूलही विशेषगुणी.
पूर्वीं जेथे गाजे दक्ष व्यवहार, रुक्ष वर्चस्व
स्वैरालापच साजे तेथे संसारसारसर्वस्व.
शिकवायला रसिकता परगृहाहून रसिक कन्या ये,
नवऱ्याला अपुल्यापरि करुं पाहे भृङ्गकीटकन्यायें.
नेसे विविध परींचीं रङ्गाचीं पातळें किती हलकीं;
चोळ्या घरीं कटोरी, वाटे अुष्मा तिचा करी छळ कीं.
चैत्रांत नेसुनी ती पातळ जरिचें न्यहार पारवट,
घ्याया हळदीकुङ्कू जाअी गाडीमधूनि सार्[3]वट.

---

[1] बालगन्धर्व, सुन्दराबाअी आणि नारायणराव व्यास. [2] रत्नाकरांत प्रसिद्ध झालेल्या, ठाकुरसिंगाच्या या चित्रावरून महाराष्ट्रांत भयङ्कर वादळ अुठलें होतें. [3] या शिग्राम-वजा गाड्या बेळगावीं अजूनहि आहेत.

तङ्ग अुरस्त्राणातें दावी ‘ ब्लाअूज ’ तलम भट्टीचा,
खालील नेसण्यामधि कासोटा तो अरुन्द पट्टीचा.

विमल विभूति विदेशी लावी करण्यास चन्द्रमा आस्या,
जरि [1]काकसुत हसूनी वदत ‘ पिठोरी दिसे अमावास्या ! ’

शुभ्र सुगन्धी गजरा आणित साहेब तोहि न सवङ्ग—
तेणें दिसे अुठावुनि केसांचा घाट आणखी रङ्ग.

मुण्डावळीच शोभत अुच्छृङ्खल कुटिल त्या बटा निटिलीं,
तारुण्यसूक्ति सुन्दर होती नीरेख ज्यावरी लिहिली.

सजुनि परी प्रमदेने गोगलगाअीपरीस जाणें तें
पुरुषगतीशी न जुळे; व्यर्थ पुढे ओढिती तिला नेते.

गार्डीतूनच म्हणुनी सायन्तनवायुभक्षणासाठी
जात सुदूर अुभयता अेकान्तींच्या शुभक्षणासाठी.

ती गोलहि नेसूनी जाय पतीसह कधी सभांनाही
सभ्य स्त्रीश्रोत्याविण कीं व्याख्यानामधी प्रभा नाही.

जेव्हा जात पुण्याला व्याख्यानाला अता वसन्तीं ते
पत्नीस नेत सङ्गे, देत महत्त्वहि तिच्या पसन्तीतें.

दोघेहि जात नेमें किर्लोस्कररङ्गमन्दिरामध्ये
गन्धर्वस्वरमोहन रुचवी खाडिलकरी चिजा—पद्यें.

खुर्च्यांवरुनी फेका दृष्टि, न येणार आळ चोरीचा,
मिरवे मधुनि मधूनी थाट प्रेक्षकगणांत गौरींचा.

जाअी करावयाला कधीमधी शिष्ट पेठफेरी ती;
वस्तु दिखाअु विदेशी घेअी, देशीस झणि अव्हेरी ती.

---

1 काकसुत = श्रीयुत अनन्त काकबा प्रियोळकर.

होशी जाणें येणें थोरांच्या बायकांमधेच तिचें,
साधन विवाह हेंच स्त्रीस समाजांत शीघ्र अुन्नतिचें !
कर्ता सदा सचिन्तच सोन्याचे जरि करी जमा ढीग,
दावी अेक मदालस पत्नीचा पूर्णचन्द्रमा श्री-ग.
हो सत्समागमाने निमिषामध्ये मनोविकास कसा,
ब्रह्मज्ञान पतीला साङ्गुं शके ती म्हणोनि का सहसा ?
ये नव सौभाग्याचें अैश्वर्याचें तिच्या मुखीं पाणी,
अधिकारस्वर काढी कठोर किञ्चित् तिची घरीं वाणी.
अधिकारी पति होते, पत्निमुखाचाच और परि फटका !
तेजस्वी रवि दूरच, तापुनि वाळूच दे जनां चटका.
काढी लाम्ब पदर ती चाले ठसक्यांत सोडुनी ओचे;
भाषण यजमानाशी करितां अधिक न कधीच सङ्कोचे.
ते गाजवीत बाहिर शिक्षा-क्षेत्रांत रावसाहेबी;
दास्य घरांत करित ते अन् तें होतां सराव साहे बी.
लोकांमधे पतीला प्रशस्तिच्या रूढ त्या ऋचा वाहो,
नेपथ्यपाठ देतां पत्नी घे सूड--चारु चावा हो !
पति जरि करि परिचर्या परि चर्या नित्य अल्प आम्बूस,
आम्ररुचीपरि वाटे जेवि छटा पाण्ढऱ्यांत ताम्बूस.
केव्हा "सौ." च पतिमुखीं सम्बोधन लाडकें तदा मग ये,
'म्हटलं' न ती म्हणे कधि, म्हणतिल तिज केवि ते वदा 'अग अे!'
'साहेब !' ती पतीला सम्बोधी, ये घरांत साहेबी,
प्रथम मुलाचें नाव न घ्यावें ती म्हणुनि का म्हणे 'बेबी !'
साहेबांची पत्नी घालिल बेबीस काय ती कुञ्ची ?
बाळास पाहिजे तें बुर्णुशि छप्पर विलायती अुञ्ची !

ये मासिकामधे ' कवियित्री सौदामिनी ' असें नाव;
पद्यीं जरी अशिक्षितपटुत्व न दिसे तरी वसे भाव.
सम्भाषणीं मराठी योजी ती अिङ्ग्रजी अमुप शब्द,
लब्धप्रतिष्ठ पद्धत, शब्द मराठी न होत अुपलब्ध.
सम्पत्तिवैभवास्तव भाषा-भाषांत चाललें द्यूत,
शेतकरी होअील श्रीयुत बनतां किसान-खेडूत !
फसतां ती या फन्दीं, सुधारुं पाहील कोण ? ये हसतां
म्हणतां ' कॉन्ट्रासेप्टिव्ह्. ' ' ॲण्टीसेप्टिक् ' म्हणायचें असतां !
आश्रय असा तरूचा मिळतां न चढेल काय मधु वेल ?
श्रीमन्तांची[1] राणी बघतां बघतांच काय न फुगेल ?
संसार-आंच लागे जेव्हा सुस्निग्ध भर्तृसहवासीं
कढअींतल्या पुरीपरि फुगते पत्नी चढूनि विभवासी.
साङ्गड मिळतां हौशी कोण न भवसागरीं तरङ्गेल
सन्ध्यारुण घन दावी जंव गगनीं रागरीत रङ्गेल.
परि रङ्गली कशी ती, नवरा न तसा जरी वधू नवट ?
मागे ताम्रमुखी परि पिकलें पानच भरीव जूनवट ?
जरि न कपिग्रन्थीचें आरोपण करविलें शरीरांत,
पञ्चविशींत पुन्हा पति येअुनि हो सरस केशरी रात.
झाले खरे गृह-स्थच, जावी बाहेर कां वदा नजर
जें जें त्यांस रुचे तें त्यांना होअी घरांत दान जर ?

---

१ नहि कामधाम ना धन्दा—ही फुगेल बघतां बघतां. देवल.

# ३६ डॉ. नकुलराव

गेली कविदण्डीची कविता भरसुखसमाधिच्या वेळीं
जैशी पुरूरव्याला त्यजुनी स्वर्गास अुर्वशी गेली.

स्फूर्ति अपार्थिव रेखा, करिति तिची सरळ हानि हे भोग;
कविर्दुर्दशेमधूनिच वाणीचा खळखळा निघे ओघ.

पडतां परिस्थितीने चढविति कवि शारदागृहीं कळस,
निष्पर्ण हाय होती फुलती तेव्हाच सावरी-पळस.

प्रत्यक्षीं मन न रमे म्हणुनि परोक्षास का कवी सेवी ?
कान्ताधरासवाशी तुळेल ती काव्यकाकवी केवी ?

त्यांतुनि असतां प्रमदा प्रबला हरिणीदृशा विलासवती,
खपतील कालहारक कलेपरीही कशा तिला सवती ?

मित्रहि होय हतप्रभ, सन्ध्येचें त्या असें प्रभावास्त्र,
रूढीपुढे बलवती जेवी निःशस्त्र होय बा शास्त्र.

कविता गेली जावो साहेबांना सुखासनीं त्यजुनी
शल्यापरी प्रतिशा टोचे त्यांच्या जिवास नित्य जुनी.

केव्हा होअिन मी प्रो. ? आशा साशङ्क ये मनिं सदैव;
दैवश हे न परि जरि अनुकूलच यांस तें अनिश दैव.

अितुक्यांत सन्धि येअी, मन साङ्गे 'रे निदान हो जा डॉ०'
पूज्य पुढे असलें तरि वाटे विद्वान् किती अहो जाडा ?

अेक प्रबन्ध लिहिणें—पुरतें जन्मास तेंच भाण्डवल,
ये व्याज आमरण मग, पाण्डित्याची यशःप्रभा धवल !

---

१ वाणीचे कविदुर्दशांमधुनिया ते ओघ यावे जसे—केशवसुत.

वाशिङ्टनांत विद्यापीठ असे अेक नांव ‘ पौर्वात्य ’
त्याला भुलले विद्वान् आणि सुसंस्कृत, न केवल व्रात्य.
होतें दुकान परि तें, तेथे पदव्या विलायती विकित;
तें पाश्चिमात्य मुद्रित वाटे हिन्दी जनांस विधिलिखित.
मग लेख राजवाडे यांचा भाषान्तरीत हे चक्क,
त्यांतून विश्वनाथें नव्हते राखूनि ठेविले हक्क!
साहेब फाक्किकेसह धाडुनि तेथे हिरण्यनैवेद्य
तीनच मासामध्ये झाले पञ्चाक्षरी, म्हणे वैद्य!
‘ डॉ. अेन्. कुळकर्णी लिट्. डी. ’ ही त्वरित लागली पाटी,
विद्येचा क्षय न हटे, वैद्यांची फुकट जाहली दाटी.

---

## ३७ बाजी उलटली

पण हें होण्यापूर्वी चढले डॉ० ढिसाळ यांवरती
आहे दैवगति पहा अगम्य अगदी तशी अनावर ती.
मोरगिरीस नव महाविद्यालय होय अेक शाळेचें,
बनले प्राध्यापक मग शिक्षक जे तेच, अेक माळेचे.
स्वार्थत्यागाने वा संस्थेंतिल नियमशीर कलहांनी
होअी जी ती मानें या ये भरुनी कशी सकल हानी!
शिकवी नित्य मराठी, संस्थापक आद्य अेकला त्यांत
जाय वगळला कारण न करि कलागति, नव्हे कलानाथ!

१ शङ्कराचार्य कूर्तकोटी, मुख्याध्यापक करमरकर अित्यादि अनेक विद्वानांनी फसून ही पदवी घेतली होती. २ Litt. D. हीं पांच अक्षरें होतात. ३ कला-नाथ = Master of Arts.

त्याचें अन्त्यपरीक्षेसाठी जरि काव्य लाविलें असलें,
पदवीविहीन परि तो, न्यून मनीं त्याचिया कसें न सले ?
काय करावें त्याने ? बैसूनी स्वस्थ चुरमुरे खात
अज्ञातवास घ्यावा असला जर तोच भाळलेखांत.
कर्ते आरम्भींचे यापरि होतात दगड पायाचे,
मागिल डोथीजड ते कळसापरि लोकवन्द्य व्हायाचे !
वाड्यावरचा वशिला साहेबीं लाविला तसा वरुनी
विद्यापीठव्रत ती संस्था त्याला धरी न सावरुनी.
डाक्तर ढिसाळ होते जागेसाठी करीत खटपट ते,
पाण्डित्याची शङ्का पदव्या बघतां क्षणींच लटपटते.
जोंवर विद्यापीठहि घे पदव्या द्यावया परीक्षाच
घालुं नये पदव्यांनी कां विद्येच्या शिरावरी नाच ?
होती विलायतेच्या पदव्यांनी डोमकावळे मोर,
ज्ञानामधे स्वदेशीधर्माचें स्तोम नाढळे थोर.
डॉ० ढिसाळ चढले शिखरीं, त्या ध्येय दुर्गम स्थानीं–
बाजी अुलटुनि, गेली ही तर भलतीकडेच मस्तानी !
परि नकुलराव वदले, ‘ खासगि संस्था, नकोच तो त्रास,
अडणी हवीच होती, होवो लखलाभ पद्मपौण्ड्रास. ’
सुज्ञान्त अपरोधें ते आग जिवाची कितीहि लेपोत–
ज्वाला वरच अुफाळे खाली केला जरी बळें पोत.

---

१ पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः–गीता.

## ३८ आग भडकली

मित्राभिनन्दनास्तव घेतां चिवटे करामधे वीणा
पुण्याहवाचनच तें, हो देवांना प्रणाम देवींना.
कविवन्दनीं वगळले गेले साहेब तेवढे अेक;
अपमानांत कवण तो असह्य ? साहित्यिकीं अनुल्लेख ?
त्यांतून शीर्षशिक्षक, टीकाकार, प्रचण्ड विद्वत्ता !
शेषास शीर्षशिक्षा देते ते परि करीं न ती सत्ता.
‘ प्राध्यापकाभिनन्दन ’ काव्याचे मग चिडून वाभाडे
काढीत तीन लेखीं—मूल्य न जागेस त्या न वा भाडें.
होते युधि-ष्ठिर च ते नव्हते जरि धर्मराज वादांत,
प्रतिपक्षास न सोडित मगरापरि त्यांस लावितां दांत.
आवेश बघुनि झाले चिवटे रण-छोड पाण्डु-रङ्ग मुखें,
नकुलापुढे खरोखर झुन्ज कराया कसा भुजङ्ग तुके ?
अैरावतासवें कशि टक्कर देणार काव्यकुञ्जर हा ?
महिषासुरासवे हा माणुस करणार काय झुन्ज अहा ?
पहिल्या धडकीसरशी प्रतिपक्षी हा पडे तळीं जखमी,
वाढेच अुलट तेणें झुन्जाचा मद न हो मुळींच कमी.
पडलेल्याला घुसळी खाली धूळींत तो अशेष मर्दें,
वप्रक्रीडा बघुनी शृङ्गी भयभीत जाहले समदे.
चिवट्यांस मित्र असुनी प्राध्यापक धावणें न त्यां करवें,
कीं या चव्हाट-वादीं मौनच सर्वार्थसाधना बरवें.
शब्दें शब्दच वाढे, अुडवाया धूळ ये पुढे जो तो,
होतीं म्लान मुखें पण तत्त्वाचा बोध तो कुठे होतो ?
कविमित्र असुनि अितके पडले ते थण्ड जागच्या जागीं;
कठिण समय ये तेव्हा कोण पुढे येअि घ्यावया भागी ?

पन्तांच्या दैन्याचा गेला होअूनि तो कळस हाय !
हिन्दु परित्यक्तेपरि पन्तांचा मूक शोक असहाय.
भक्ताच्या हाकेला नरसिंह न ये कलींत धाअून
सत्ता हिरण्यकशिपुच म्हणुनी घे येथली बजाअून.
परि धावला सुधारक अेक खुळा तरुण काव्यकैवारी;
वारी जितें अन्याचें पण वणव्याला अफाट कैं वारी ?
झुन्ज प्रतिपक्षाशी, आधी तच्छक्ति माप आणि कर,
न्यायास्तवहि कधिकधी स्वहानिकर होय हा पहा निकर.
थोडी न दाखवी जरि शब्दीं झुन्जार तो भला गोडी,
सोडी न, वैद्यकीचा शास्त्रिपदाचाहि भोपळा फोडी.
लोकहि मौजच पाहत जिकडे तिकडे भरूनि आल्हाद,
टाळ्या पडुनि घरोघर तुमुलच तो जाहला महानाद !
अन् धडकला, भडकला, कडकडला नकुलमानसीं वणवा
‘ रे काव्यकीटकांनो, ’ वदले ‘ माझा बघा प्रभाव नवा. ’
त्यांसच सोडिन देतिल लिहुनी जे त्वरित शरणपत्रास,
विद्वत्सभाहि येवो, ठेविन मागूनि लव न पत्रास.
भाण्डावया पुढे या, तुटुनि पडा की ! परन्तु अेकाण्डा,
काण्डात काढितों मी, करितां किति कारभार रे लाण्डा ?
घेतोंच लुडबुड्याचा आधी या चाङ्गला समाचार,
करितों खलास पुरता सुधारकब्रुव खलास साचार.’
अैकीव छिद्र त्याचें होतें काही तयांस ठाअूक,
आणि अनर्थांचा मग तेथे निपजेच माल धाअूक.
अुडवित मग ध्वनीने त्यावर लेखामधूनि ते चिखल,
जे धूलिवन्दनाने करिती व्यक्तीस ठार तेचि खल.

स्पष्ट समर्थन अपुलें सुधारकास न करावयां आलें,
सम्बध त्यांत येतां कुमारिकेचा बसें मुखीं टाळें.
हे जनसहानुभूतिस सुधारकाच्या विरुद्ध फिरवीत,
मुद्दा मूळ विसरवुनि निज सोज्ज्वळता विशुद्ध मिरवीत.
तरुण सुधारक अुठला, सदाचाच तो जनांतुनी अुठला,
सामाजिकप्रतिष्ठामार्ग तयाला अता खुला कुठला ?
लोकांस तीहि मौजच ! अवघे जन हे दुरूनि मौज-बघे,
त्यावर कुणि झेण्डूचीं फुलें अुधळुनी करूनि गौरव घे.
अवगीतकार पण जो होता साऱ्या कवींत नाकेला,
त्याने साहेबांशी येअुनि सामच, न सामना, केला.
घे लिहुनि ' काव्यकौतुक ' साहेबांकडुनि तो स्वकाव्यास,
साहेब त्यांत फसले, ओळखुं शकले न धूर्त काव्यास.
आणिक कुणी कवींनी दिधला सोडूनि आपुला धन्दा,
वा स्वत्वरक्षणास्तव गेले होअूनिया परागन्दा.
कुणि दिङ्मूढच झाले, निश्चिन्त कुणी, कुणी तसे हट्टी,
कळणार त्यांस लौकर की सिद्धच धडकुनी असे भट्टी.
केलें साहेबांनी अविलम्बें चालुं मग नवें सत्र,
भस्म करायासाठी न आणितांही कवींस अेकत्र.
मन्त्रांतुनि ते बोलत काही अन्तःस्थ खूण कविलागी,
कवि कोठेहि असेना होअी तो भस्म जागच्या जागीं.
ते मन्त्र स्थानिक त्या ' सुपर्ण ' साप्ताहिकामधे स्फुरत,
ज्याचे खन्दे लेखक नव्हते काव्यात्म कामवेणु-रत.
ह्या मन्त्रांनी अपुलें केलें मागेच अेकदा काम,
अुच्चारूनि पहातां दिसेल नच त्यांमधे अता राम.

---

## ३९ हतप्रभाव मन्त्र

टाकूनि पद्यरचना आता करितोस सारख्या टीका,
या तुम्बड्या कुडाला लाविशि अलभ प्रसिद्धिसाठी का ?
प्रस्तावनाच लिहिशी, कीर्तिप्रद सुगम हा खुला पन्थ,
कां अण्डीं दुसऱ्यांचीं अुबविशि ? तू प्रसव आपुला ग्रन्थ.
ज्याच्या कविता गाअुनि होअुनि गेलास काव्यपाठक तू !
निज कविता म्हणतांना विसरशि अजि त्यास का ? भला ठक तू !
काव्यप्रभाव वाटे नेअी गोङ्गाट रे लया सगळा
म्हणति अैक रसिक पण 'केवळ आहे सुरेल यास गळा.'
मध्येच गुणगुणाया लागशि तू चरण बैठकीमध्ये
की कोणी सुचवावें, 'गा निज नव मधुर नेटकीं पद्यें.'
घेशी प्रसिद्धिसाठी बालेचें शाहिरा, सरळे[1] नाव,
परि कीर्तिकाठ गाठिल का रे तव कागदी तरल नाव ?
वृत्तास काव्य गणिशी, म्हणतिल तुज, न कवि, काव्यकुम्भार;
कां आणिशी अिराणी शिम्पांचाचि[2] प्रचण्ड तू भार ?
केवळ पद्य रचूनी, न ठरे तें काव्य करुनि आक्रान्त;
दावी स्पष्ट कवन तव, बसली काव्यावरीच सङ्क्रान्त.

---

१ सरलाबाला शाहीर या नांवावर कविता प्रसिद्ध करणारी व्यक्ति पुरुषच होती असें अैकतों. पूर्वी स्त्रीचे वर नांव घालून लेख कविता नि पाठवा असा आग्रह सम्पादक करीत. आग्रह तोडवेना म्हणूनच चन्द्रशेखरांनी अेक कविता 'सौ. गिरा' या नावाने मनोरञ्जनांत दिली होती. २ ही टीका चन्द्रशेखरांनचि आपल्या व्हिलेपार्ले येथील अध्यक्षीय भाषणांत प्रस्तुत लेखकावर केली होती.

त्यां गणुनि काव्यबीजें जुळवूं बघतोस वामनी यमकें,
कविवामना, रसाची का गमती ही तुझ्यामनीं गमकें ?

भक्तिप्रीतिसमन्वय पवित्र हा गूढगुञ्जनीं होय,
लागेल स्वर्गीं तरि होवो येथे न गुणिजनीं सोय.

काव्यास पूर्वमुद्रित वाढविशी बायका जसें ताक,
क्षेत्रफळावर मिळते कष्टावळ म्हणुनि का पडे धाक ? १०००

हा सुळसुळाटच ‘ सुचा ’ बघुनी कोणी म्हणो तुजसु-मन्त,
स्वनित सु-नीत न तव हें, म्हणतांहि न ये तयास असु-मन्त.

रङ्गवितात चितारी प्रसङ्ग ज्याचे कवीश तोच खरा !
चित्रतळीं छापाया द्विपद्या रचिशी, तुझा जळो नखरा !

स्त्री-दाक्षिण्य असे तर दाव स्वस्त्रीस, अन्य ठायीं कां ?
पुल्लिङ्गी नामांवर करिशी भलतीच कां शठा, टीका ?

तू दुसऱ्याची कविता रूपान्तरिशी न मागतां भीक,
देशी दडपुनि खाली स्थळ कल्पित आणि अिष्ट तारीख.

हा ग्रन्थराज दिसतो सचित्र विक्रेयसूचिपरि लठ्ठ,
की अेकदम न यावा काळाला तो करावया गट्ट. १००५

म्हणशी निज कवितेला, ‘ तू जीवित तू मदीय हृदय दुजें ’
नवल न होतां टीका वाटे तुज ओढवेच मरण तुझें.

होअूनि लिहविली ना विद्वत्प्रस्तावना तुवा आधी ?
कां अन्य घेतली ? ती होती स्तुतिशून्य ऱ्हस्व वा साधी ?

पद्यपुराणाचा निज करिशी सप्ताह भक्तिभावाने,
अधिकच पुण्य मिळावें म्हणुनी तू वाटिशी न कां वाणें ?

पद्यपिसाऱ्याने हो काक श्रीयुत मयूर काय ? मरे !
वेचेमण्डळ काढुनि चिटणिस झालास कां न कायम रे ?

मग अर्थकीर्ति तुजला दोन्ही होञूनि लाभली असती
क्षणभङ्गुर हें जीवित, कीर्ति हवी सङ्गतीं जरी अ-सती.
हा स्वाभिमान कुठला ? आश्रयदात्यावरी अुलटशी कां ?
कां हा निःस्पृह दुसरा करितो रे तुजवरी कडक टीका ?

---

## ४० शेषशायिप्रसाद

येतां येतां आली शेषावर कठिण शेवटीं पाळी,
आसन डळमळतां हो जागृत भगवन्त जो मही पाळी.
बेतापुरता हलका जातां होञूनि भूमिचा भार
काही काळ पुढे मग चाले सुरळीत विश्वसंसार.
सारेच नष्ट होतां द्विजिव्ह वाचेल लेखणी कैशी ?
लिखित करिल विधि केवी असुनिहि चित्तांत विश्वकुशलैषी ?
आकाशवाणि झाली, ‘ नकुला, हां ! थाम्ब रे ! वरम्ब्रूहि !
बघ नाही तर तुजवर माझी होञील वाकडी भ्रू ही ! ’
नकुल म्हणे, ‘ मज बनवा प्रोपेश्वर, नच अता दुजी आस; ’
परम सुखें मन फुगलें ‘ अैकू ’ येतां ‘ तथास्तु ’ जीवास.
जाळी तथापि चिन्ता, कविंच्या छाळितील काय मज हत्या ?
पाप न लागो, कर्ता हरिच करविताहि तो सहजगत्या.
तों अश्रणी जहाली, ‘ मरणें अपुल्याच सर्व कवि मेले !
नकुल निमित्तच, नरकीं तनुहत्येने कधी न कुणि गेले.
मन्त्राग्निने जळाले गेले पूतात्म सर्व सुरलोकीं
तुझिया आधी म्हणुनी तूहि न कर खेद, मीच ‘ अुरलों की, ’
अवतारकार्य सरतां येशिल तूही तिथेच संशय न,
चल शेषशायि हरिला करुं दे आता पुनश्च सुखशयन. ’

---

# ४१ प्रतिज्ञापूर्ति

साक्षात् भगवन्ताची कैशी होअील अन्यथा वाणी ?
प्राणी अुगीच का कुणि भजतील स्वार्थजन्य भावांनी !

परि मर्यादित विश्वीं सर्वोत्कर्षास ना मुळी वाव,
पढती पैन्त अगोदर, चढती तेव्हाच मागुनी राव.

देवाज्ञेने तत्क्षणिं दूर वऱ्हाडामधे मराठीचे
प्राध्यापक आटपले अर्थात् सरुनीच पुण्य गाठीचें.

होते शिक्षणमन्त्री तेथ कुणी सोयरेचि मोऱ्यांचें
जे मानीत महत्त्व न पदवीच्या छापल्या चिठोऱ्यांचे.

हे नकुलराव होते प्रसिद्ध साहित्यपरिषदेमाजी,
मग पत्रिका जुळूनी ठरलें यांनाच खचित नेमा जी.

गेले दूर वऱ्हाडीं अिष्टपदाचा घडूनिया लाहो,
अन्तीं वरिती झाली प्राध्यापकता अझूनि यांला हो.

यांचा वियोग होतां कोणासहि काय खेदबाधा न !
परि शिक्षकांस झाले हे जातां हायसें, समाधान.

प्रोपेश्वर कुळकर्णी झाले मग नेमके नकुलराव,
सेवकराज्यामधले झाले ते येनकेन अुमराव.

पार पडे बहु वर्षें भागवलें लीलया प्रतिज्ञा ती
दे मानपत्र त्यांची खान्देशांतिल तयांप्रति ज्ञाती.

---

1 ' पंत मेले–राव चढले ' ही दिवाकर यांची नाट्यछटा सुप्रसिद्धचआहे.

# ४२ अुत्तरनकुलचरित

नकुलचरित्र अिथे हें चढल्यावर घाट सम्पलें समजा;
आता पठार पुढचें सपाट, बघण्यांत ना विशेष मजा.
कलहामुळेच होती काव्यकथा या परोपरी सुरस,
आता परी न अुरली काही काव्यात्म जीवनीं चुरस.
केवी प्राध्यापक ते झाले मग कीर्तिवित्तमार्गस्थ,
विदर्भविद्यापीठीं वक्तृत्वें वाढलें कसें प्रस्थ,
येअुनि निवडुनि ते किति करीत समितींचिया अुपरि कार्य,
वृत्तिहि परीक्षकाची येअी चालुनि कशी अपरिहार्य,
वेचेग्रन्थ तयांचे ते अभ्यासक्रमीं कसे शिरले,
यांच्या कवितांनी कवि केवी पाण्यांत मीठसे जिरले,
अभ्यसनीय जहालीं कैशी यांचीं परीक्षणें हीं तीं,
लिहिलें त्याचा पैका अुगवायाची कशी कळे रीती,
होअूनि ते नियोजित केवि सुधारीत पुस्तकें क्रमिक,
निरुपेक्षणीय जेणें प्रातीमधि भर पडूं शके अधिक,
विद्यापीठ सभा ते चुकवित अैसें कसें कधी न घडे,
भत्ते बहुप्रकारीं काढुनि घ्याया कसे प्रवीण बडे,
विद्यापिठसभेचें देअी यश केवि राजकारण तें,
( असतां पुढे त्वयार्धम् आणि मयार्धम् अिलाज, कां रण तें ? )
मतदानपत्रिकांविण दुसरें वाचायला कुठे न धड सवड,
कोऱ्या भरावयाच्या यांना असतच कशा चवड चवड,
विविध तिथे निवडणुकी लढवित बसणेच केवि हो कार्य,
जनतासत्तावादीं कार्य दुजें नच कसें शिरोधार्य,

कुलपति होण्याचाही आहे त्यांच्या मनीं कसा डाव,
(ज्याचें मोल तयाला देतां निवडून ये न कां राव ?)
‘रावबहादुर’ पदवी कैशी ती साङ्गुनी स्वयें आली,
प्राध्यापकांवर कडी त्यांची मग केवि निश्चयें झाली,
आङ्ग्ल तर्‍हेचे कपडे करीत परि केवि शुद्ध खादीचे,
केवी दूर करित ते कोणाकिडुनीहि भय अुपाधीचें,
ओढित विविध पथांनी सुवर्ण किति लोहचुम्कन्यायें,
यांना फिरवायाला हक्काची केवि ‘फोर्ड’कन्या ये,
पाण्डित्यपूर्ण गप्पा मारुनि शिष्यांस केवि झुकवीत,
पर्वा केवि करीत न चुकतां येण्यास नाव सुकवींत,
(ग्रन्थांचिया कितीही रचिता झाला कुणी स. भ. प. राशी
श्रेष्ठ गमे त्यांहुनि यां विद्यापीठामधील चपराशी,)
केवी अवमानित ते अता महाराष्ट्रपरिषदेलाही,
केन्द्र पुण्याचें पाहुनि होय मनाची मनामधे लाही,
अध्यक्ष जाहल्याविण नच आता परिषदेस जाअीन,
हें मनिं दडवुनि बोलत, ‘संस्थेमधि जीर्ण त्या मजाही न,’
स्थापुनि ‘विदर्भवाणीविलास’ संस्था नवीन जोराची,
(थोरांचीच ती असे, नाही हुरहूर-चूर पोरांची,)
झाले कसे वर्‍हाडी पक्के स्थानिक अुदण्ड अभिमानें,
त्वरित वर्‍हाडावरती रचलें राष्ट्रिय कसें म्हणुनि गाणें,
बान्धूनि चान्दमारीमध्ये टुमदार तो ‘वर्‍हाड-व्हिला’
लौकिक केवि विदर्भप्रेमाचा श्रम करूनि वाढविला,
सिन्धप्रान्तापरि हा वर्‍हाड व्हावा न कां बरें सवता
याविण विचार दुसरा काही काळ न मनीं कसा नव्हता,

मिसळून केवि जाया बघतांहि ते ब्राह्मणेतरामाजी
( ये न जरी खरडाया ब्राह्मण्याचा जुना मुलामा जी ),
जाती मोरागिरीला केवि अुन्हाळ्याचिया सुटीमध्ये,
राजांस वाढदिवशीं केवी ते धाडिती त्रुटित पत्रें.
दुसऱ्या विधुरपणिं कशी यांची पाहुनि सुवर्णमञ्जूषा,
गोरी अेक पुणेरीं विधवा करुं ये प्रपञ्चशुश्रूषा,
केवी प्रगति तयांची अजुनी कोठेंहि ना दिसे तटली,
संसारवाटिका कशि यशःसुमांनी दिसन्दिसें नटली,
चरित ‘ अुदात्त ’ जहालें लाभुनि महतीसवेंच सम्पत्ती,
( लाभे न श्री ज्याला तोच म्हणे त्याज्य होय विषवत् ती, )
चण्डांशुत्वें रविमुखकलङ्क केवि न दिसेच कोणाला,
( सौम्य सुधाकर, दावुनि बोटें करितात जन नको त्याला; )
षष्ठ्यब्दपूर्ति नुक्ती केली थाटांत साजरी कैशी,
जन केवि साभिनन्दन सस्मित वदले ‘करा पुरी अैशी,’
केवि न घ्यावें लागे तूप चहांतूनि वा निशीं त्रिफळा,
ये स्वस्थ झोप रात्रीं, प्रकृति अैशी विशींतही विरळा,
नकुलांपरी कुणि कसा नाही, नव्हता, पुढे न व्हायाचा,
शालेय शालिवाहन ! होय पराभव न केधवा यांचा,
अुत्तरनकुलचरित जरि न सम्पलें, साङ्गणें नको काही,
( घ्यावा मानवणारा पौष्टिक यांतूनि बोध लोकांही )
बहुशः असेल आलें किर्लोस्करमासिकीं शहाजोग—
तीन अुकार शिकुनि घ्या—अुन्नति, अुत्साह आणि अुद्योग !

## ४३ फलश्रुति

अैका अता फलश्रुति, नाही साङ्गत तुम्हां अलीक वच,
स्फूर्तीच्या सामर्थ्यें चरित्र हें जाय बनुनि कलि-कवच.
हें काव्य शून्यभावें वाचायाला कुणी न लागावें,
मग मिळतां तुम्बीफल चुम्बीतच तें 'तरावया' घ्यावें. १०६५
हें अेकदाच वाचा, वैधम्र्याचा नुरेल मनिं दाह,
झुरती काव्य रचाया होतकरू ते करोत सप्ताह.
पैका हवा तयानें वाचावा ग्रन्थ हा चतुर्मास,
वाचील वर्षभर जो वाढत जाअील तत्समुल्लास.
पण यायोगें व्हाया विवाह, व्हायास आणि तो सफल,
प्रेमग्रन्थि घडवुनी आणाया ग्रन्थ हा न परि सबल.
शिकवूनि ये न विद्या प्रेमाची शिकवितां जिवेंभावें,
घेअूनि 'कुट्टिनीमत' कुणीहि वात्स्यायनाकडे जावें.
दर्शन या ग्रन्थाचें घ्यावें अगदी न मत्सरग्रस्तें;
जाया सुरक्षितपणें असती अुरगास त्या बहुत रस्ते. १०७०

---

## ४४ शेवटचे चार शब्द

गोष्ट भविष्यपुराणीं साङ्गितली नारदाप्रती विधिने
नारद म्हणे शुकास न, तर काकाला, 'गड्या अुचल निधि ने.'
काकाने शकुनींना कथिली, शुनकास साङ्गतां शकुनी
शुनकें जगत्प्रकाशित केली हीचा करो न नाश कुणी.
झाली परम्परेने प्राप्त पुढे प्राकृतांत पैशाची,
फुकट जनांस मिळाली, न कवीला त्या ददात पैशाची.

नावाचीही चिन्ता नव्हती, कविचें अुरे कुठे नाव ?
आता काव्य गुणाढ्य न, नाव टिको कविस ही सुटे हाव.

रद्दींत गवसलें तें रचिलेलें जें अनाम कविरत्नें
दिधलें रूप मराठी त्याला मी आणि तेंहि अतियत्नें.

बरवें बोलुनि जाणें, नलगे मागूनि आळ चोरीचा,
होतां होवो बभ्रा कल्पकतेच्या दिवाळखोरीचा.

तितकी भीति नसे जरि कीं झालें मूळ नामशेष पुन्हा;
न गुन्हा सिद्ध ठरे तर सुटका आरोपिला असे अधुना.

रूपान्तरें सजावट ज्याने केली परी मराठीची
पुञ्जी पुण्याअीची त्याची सोडूनि घ्या न गाठीची.

सोनें कुठीलहि असो, घडले ज्याने परी अलङ्कार
सोनार तो म्हणुनि का शिम्प्यापरि त्यास चोर म्हणणार ?

त्याच्या कृतींतहि वसे काही स्वातन्त्र्य आणि कौशल्य,
नाकारतां तया तें सलेल हृदयीं नको नको शल्य !

येअूनि पञ्चगङ्गाकाठीं हे काव्यकष्ट लेखक घे,
अज्ञातवास जावा अुद्योगीं हेतु हाच अेक बघे;

अगदी स्वस्थ न बसवे गेला हातास लागुनी चाळा,
घरखेळ पाहिजे ना नाही तर ये अुगीच कण्टाळा.

कोणी म्हणेल कोती दृष्टी घटना जगांतली न बघे.
साम्राज्यमदें अिटली जिङ्कुनि हब्साणराष्ट्रवैभव घे,

होअुनि अुदार अपुल्या जीवावर झुन्जतो अहा चीन !
प्राचीन राष्ट्र काढी अकीर्तिकर गोष्ट ती तहाची न.

निज हातपाय पसरी आज्ञापक जर्मनींतला तिकडे.
स्वास्थ समाजाचें का जगताचें या गमे अता बिघडे.

ऐशा समयीं रुचती काव्यकथा कां कवींचिया क्षुद्र ?
दर्दुर थिल्लरांतिल, रुचावयाचाच त्यास न समुद्र.
पण [1]सरसीकुलसङ्कुल दक्षिण काशींत कोल्हपुरतीर्थी
शान्ति मिळे तर मिळुं द्या, चळवळींतली नको मधुर कीर्ती.
अस्तु! कृतिला प्रस्तुत नकुलालङ्कार नाव शोभेल,
साध्या नावावर कां ललिताहङ्कारभाव लोभेल ?
प्राचीन मूळ सारें दोष न द्यावा म्हणूनि आधुनिकें,
जें जें पुराण त्याला लोकीं गणिती नमूनि साधु निकें.
'ब्रह्मार्पणमस्तुच' हें अुत्तम मध्यम असो, असो अधम!
'अिति शम्' म्हणण्यापूर्वी म्हणतों पुनरपि 'अहो! अिदं न मम.'

१०९०

---

१ अमानवजनस्थाने सरसीकुलसङ्कुले
रमा कोल्हपुरे क्षेत्रे वसतीति किमद्भुतम्
कविराजतीर्थकृत तीर्थयात्राप्रवन्ध

# अधिक टीपा

आर्याक्रमाङ्क.

१४ " गेल्या ३० वर्षांत खरें काव्य होऊं लागलें आहे हें मी सप्रमाण सिद्ध करावयास तयार आहें "—राम गणेश गडकरी.

३० " कागविष्ठेचे झाले पिम्पळ। तयांसि निन्द्य कोण म्हणे ? " व्यङ्कटेश स्तोत्र.

३४ गो ( गोविन्दराव टेम्बे ), स्वामी ( पूरक केवळ ), मा ( मामा—स. बा. हुद्लीकर ), न ( नरहर गणेश कमतनूरकर ), व ( वसन्त शान्ताराम देसाअी ), प्र ( प्रल्हाद केशव अत्रे ), का ( काळे पु. श्री. ), शम् ( शङ्कर कृष्ण देवभक्त ) मिळून होणाऱ्या मण्डळाने ' कावळा ', ' लखू लक्तऱ्या ', ' मास्तर ' नि ' पाञ्चजन्य विशेषाङ्क ' हीं पुस्तकें निर्माण केलीं आहेत.

७३ " गङ्गे, गोदे, यमुने, माझा नोहे तुझाचि हा बाळ,
जतन करी गे यातें स्वाधिन केला न कापितां नाळ '
ही सुपरिचित आर्या कोणाची आहे ?

१०९ कलावन्त आणि नायक या आडनावाच्या स्त्रिया या नियमाला अपवाद होत.

११७ मोगरेकृत पदवीचा पाडवा आर्या १११ वी पहा.

२८९ ' श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः ' रघुवंश १४–७०.

४६५ ' केल्याने देशाटन, पण्डितमैत्री, सभेंत सञ्चार,
शास्त्रग्रन्थविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार '
ही जुन्या क्रमिक पुस्तकांतील आर्या कोणाची आहे ?

५८३ नरसिंह हा वराहाच्या पुढील अधिक पूर्ण असा अवतार आहे.

६१७ सदारङ्ग अदारङ्ग हे दोन सङ्गीतांत प्रसिद्ध चीजकार आहेत.

७१७ ' सारस्वतसारमेय ' हा शब्द श्रीकृष्ण—टांकसाळींतील आहे.

REFBK-0005908

REFBK-0005908